सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | बुधवार, २३ जुलै २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक २५४ । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


**तरुण भारत**

**आज सदाफुली पुरवणी नाही!**

तांत्रिक अडचणीमुळे आजच्या अंकासमवेत सदाफुली ही आठ पानांची पुरवणी देण्यात आलेली नाही. याची वाचक व विक्रेत्यांनी नोंद घ्यावी.

- व्यवस्थापक

## विचारपुष्प



निआर्थिक उन्नती म्हणजे सर्वांगीण उन्नती नाही. तिचे महत्त्व आहेच. आर्थिक उन्नती हवीच, आम्ही तर आमच्या मातृभूमीला पूर्वीसारखी स्वर्णभूमी बनवू इच्छितो. पण त्या बरोबरच मानसिक स्वास्थ्यही तेवढेच महत्त्वाचे आहे. मानवाचा नैतिक विकास होणे महत्त्वाचे आहे. ते काम संघ संस्कारातून घडते.

**प्रो. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या**
रा. स्व. संघाचे चतुर्थ सरसंघचालक

## विनम्र अभिवादन



लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची आज जयंती

# शहरी माओवाद्यांकडून विदेशी निधीचा वापर

### मुख्यमंत्री फडणवीस यांचा घणाघात




लॉयड मेटल्स प्रकल्पांच्या उद्घाटनफ्रसंगी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

◆ **गडचिरोली, २२ जुलै**

बंदुकीचा माओवाद संपत चालला असताना, शहरी माओवाद सुरू होत आहे. गडचिरोलीचा विकास रोखण्यासाठी हे शहरी माओवादी विदेशी निधीचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहेत. या माओवादापासून लोकांनी सावध राहिले पाहिजे. कारण, हे माओवादी समाजात 'जमिनी हिसकावल्या', 'जंगलतोड' केली, अशा अफवा पसरवत असून, लोकांची दिशाभूल करीत आहेत. या मानसिकतेला कुणीही थारा देऊ नये, असा स्पष्ट इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिला.

लॉयड मेटल्सच्या वतीने कोनसरी येथे आज विविध प्रकल्पांचे उद्घाटन व भूमिपूजन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी ते बोलत होते. गडचिरोलीच्या विकासावर बोलताना नक्षलवाद आता संपत चालला असून, लोकं संविधानावर विश्वास ठेवून मुख्य प्रवाहात येत आहेत. लॉयड मेटल्सने आत्मसमर्पित नक्षल्यांना रोजगार दिला आहे. त्यामुळे जंगलातील नक्षलवाद संपत आहे, पण सरकारविरोधात लोकांना भडकवण्याचे काम शहरी नक्षलवादामार्फत आता सुरू झाले आहे, असे ते म्हणाले.

हे शहरी नक्षलवादी इतर राज्यांमध्ये बसून महाराष्ट्रातील लोकांची दिशाभूल करीत आहेत. या लोकांना दुष्कृत्य घडविण्यासाठी विदेशातून निधी मिळत आहे. जनसुरक्षा कायदा याच शहरी नक्षलवादाविरोधात काम करेल, असेही फडणवीस म्हणाले.

गडचिरोलीने प्रगती सुरू केली आणि येथे पोलाद प्रकल्पाची पायाभरणी झाली, तेव्हा दुसऱ्या दिवशी आदिवासींना मारले जात आहे आणि त्यांच्या जमिनीवर पोलाद प्रकल्प उभारला जात आहे, असा दावा करणारी मोहीम आणि पोस्ट सुरू झाल्या. मोठ्या प्रमाणात जंगलतोड होत असल्याचा दावाही करण्यात आला. सरकारने काहीही केले नसताना आणि सर्वांना सोबत घेऊन विकासासाठी काम करीत असताना अशी मोहीम कशी सुरू झाली, याचे आश्चर्य वाटल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

सरकारने पोलिस विभाग आणि नक्षलविरोधी अभियानाचे पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील यांना यामागील लोकांचा शोध घेण्यास सांगितले. ते महाराष्ट्रातील नव्हते, हे ऐकून तुम्हाला आश्चर्य वाटेल. त्यातील दोन कोलकात्यात, दोन बंगळुरूत बसून विदेशी निधीवर काम करीत होते. ते समाज माध्यमांवर पोस्ट टाकून लोकांना चिथावणी देण्यासाठी विदेशी निधी वापरत होते, असे फडणवीस म्हणाले. ◂(तभा वृत्तसेवा)

### शस्त्र ठेवून संविधान स्वीकारा

माओवाद्यांनो, शस्त्र खाली ठेवा, संविधानाचा स्वीकार करा, असा स्पष्ट इशारा फडणवीस यांनी दिला. गडचिरोली आता बदलत आहे. गडचिरोलीत माओवाद्यांनी हिंसाचाराचा मार्ग सोडून संविधान स्वीकारल्यामुळेच आज आपण इथे विकासाबाबत बोलू शकतो. उरलेल्यांनी देखील मुख्य प्रवाहात यावे, असे आवाहनही त्यांनी केले. ■

# बॉम्बस्फोटातील बळींना न्याय द्या

**महाराष्ट्र सरकारची सर्वोच्च न्यायालयात धाव**

### सर्व आरोपींच्या सुटकेच्या निर्णयाला आव्हान ● उद्या सुनावणी



◆ **नवी दिल्ली, २२ जुलै**

७/११ मुंबई लोकल बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व १२ आरोपींची मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्दोष सुटका करण्याच्या निर्णयाविरुद्ध महाराष्ट्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. यावर सर्वोच्च न्यायालय २४ जुलै रोजी सुनावणी करणार आहे.

मुंबईतील उपनगरीय रेल्वेमध्ये २००६ मध्ये घडवलेल्या साखळी बॉम्बस्फोट खटल्यातील सर्व १२ आरोपींची सबळ पुराव्यांअभावी सोमवारी उच्च न्यायालयाने निर्दोष सुटका केली. या स्फोटात १८९ जणांचा मृत्यू झाला होता, तर ८०० हून अधिक लोक जखमी झाले होते. दरम्यान, खंडपीठाच्या या निकालाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली जाईल, असे राज्य सरकारकडून सांगण्यात आले होते.

त्यानुसार खंडपीठाच्या या निर्णयाविरुद्ध स्पेशल लिव्ह पिटीशन सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी दाखल केले. त्यांनी सरन्यायाधीश भूषण गवई प्रमुख आणि न्या. के. विनोद चंद्रन आणि न्या. एन व्ही अंजारिया यांचा समावेश असलेल्या न्यायासनासमोर हे प्रकरण सुनावणीसाठी तातडीने सूचीबद्ध करण्याची मागणी केली. ही एक गंभीर बाब आहे. त्यावर तातडीने सुनावणीची आवश्यकता आहे, असे मेहता म्हणाले. उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध राज्य सरकारने आधीच अपिल दाखल केले असल्याचे त्यांनी नमूद केले.

निर्दोष सुटका झालेल्या १२ आरोपींपैकी ८ जणांना आधीच तुरुंगातून सोडण्यात आले आहे, असे न्यायालयाने निर्दशनास आणून दिले. यावर उत्तर देताना मेहता म्हणाले, हो, त्यांची सुटका करण्यात आली आहे. तरीही, या प्रकरणाची तातडीने सुनावणी होणे आवश्यक आहे, अशी विनंती त्यांनी केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी या निर्णयावर आश्चर्य व्यक्त केले होते. हा निर्णय खूपच धक्कादायक आहे. आम्ही या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देऊ, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले होते. ◂(तभा वृत्तसेवा)

# उपराष्ट्रपती धनकड यांचा राजीनामा मंजूर



**नवी दिल्ली, २२ जुलै**

उपराष्ट्रपती जगदीप धनकड यांचा राजीनामा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंगळवारी स्वीकारला आहे. धनकड यांचा राजीनामा स्वीकारण्यात आल्याबाबतची अधिसूचना गृहमंत्रालयाने नंतर जारी केली. संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी रात्री जगदीप धनकड यांनी तडकाफडकी उपराष्ट्रपती पदाचा राजीनामा देत राजकीय वर्तुळात खळबळ उडवली होती. प्रकृतीच्या कारणास्तव आपण राजीनामा देत असल्याचे धनकड यांनी राष्ट्रपती मुर्मू यांना सादर केलेल्या पत्रात म्हटले होते. राष्ट्रपती मुर्मू यांनी धनकड यांचा राजीनामा मंजूर करीत तो पुढील कारवाईसाठी गृहमंत्रालयाकडे पाठवला होता. त्यानंतर गृहमंत्रालयाने राजीनामा मंजूर केल्याबाबतची अधिसूचना जारी केली. ऑगस्ट २०२२ मध्ये धनकड यांची उपराष्ट्रपती पदावर निवड झाली होती. उपराष्ट्रपती म्हणून त्यांचा दोन वर्षांचा कार्यकाळ बाकी होता. राज्यसभेत देण्यात आली माहिती एकदा स्थगित झाल्यानंतर दुपारी १२ वाजता राज्यसभेचे कामकाज आज सुरू होताच पीठासीन उपाध्यक्ष घनश्याम तिवाडी यांनी जगदीप धनकड यांचा उपराष्ट्रपती पदाचा राजीनामा मंजूर करण्याबाबतची गृहमंत्रालयाची अधिसूचना वाचून दाखवली. भारतीय घटनेतील अनुच्छेद ६७ ए नुसार उपराष्ट्रपती हाताने लिहलेला राजीनामा राष्ट्रपतींना सादर करू शकतात आणि हा राजीनामा तत्काळ मान्य समजला जातो, असे तिवाडी यांनी अधिसूचनेतील मजकूर वाचून दाखवत स्पष्ट केले.

# अदानीला वीज वितरण परवाना देण्यास महावितरणचा विरोध

◆ **मुंबई, २२ जुलै**

अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लि., अदानी इलेक्ट्रिसिटी नवी मुंबई लि. यांनी महाराष्ट्रात समांतर वीज वितरण परवाना देण्याबाबतची याचिका महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे दाखल केली होती. याचिकेवर मंगळवारी झालेल्या सुनावणीत महावितरणने अदानींच्या मागणीला जोरदार विरोध केला.

अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लि., अदानी इलेक्ट्रिसिटी नवी मुंबई लि., टोरंट पॉवर लि. व टाटा पॉवर कंपनी लि. यांनी राज्यात समांतर वीज वितरण परवाना देण्याबाबतच्या याचिका महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे दाखल केल्या आहेत. यापैकी केवळ अदानी समूहाच्या याचिकेवर सुनावणी झाली.

खाजगी वीज कंपन्याच्या मागणीला विरोध करताना महावितरणने वेगवेगळे दाखले दिले. महावितरणने सध्याची मागणी व आगामी काळातील २०३५ पर्यंतची मागणी ध्यानात घेऊन वीजखरेदीचे करार केले आहेत. आमचे ग्राहक दुसऱ्याला दिल्यास 'फिक्स्ड कॉस्ट'चा वाढीव बोजा उरलेल्या ग्राहकांवर येईल. महावितरणचे आर्थिक स्थैर्य धोक्यात येईल, असा दाखला आयोगापुढे दिला.


महावितरणने या व्यतिरिक्त चांगले मोठे ग्राहक औद्योगिक व व्यावसायिक ग्राहक त्यांच्याकडे जातील आणि गरिबांसाठीची व इतर घरगुती ग्राहकांसाठीची 'क्रॉस सबसिडी'धोक्यात येईल, एकूण मागणी व ग्राहक ध्यानात घेऊन आरडीएसएसची कामे व गुंतवणूक केली आहे. ग्राहक अचानक कमी झाले, तर ती गुंतवणूक अडचणीत येईल. मुख्यतः मोठे ग्राहक गमावल्यामुळे महावितरणपुढे अडचणी येतील, महावितरणला आर्थिक दुर्बल घटकांसाठी 'क्रॉस सबसिडी'ची सुविधा करावी लागते. तसे बंधन खासगी कंपन्यांवर नाही. त्यामुळे समान पातळीवर स्पर्धा होणे शक्य नाही, महावितरणने पायाभूत सुविधा व मनुष्यबळात गुंतवणूक केली आहे. ती निरर्थक ठरेल, असे विविध दाखले देत महातरणने व्यापक जनहित राखण्यासाठी खाजगी कंपन्यांची ही मागणी मान्य करू नये, अशी बाजू वीज नियामक आयोगासमोर मांडली. ◂(वृत्तसंस्था)

### टाटांनी खरेदी केली ११७ वर्षे जुनी कंपनी

**नवी दिल्ली** : टाटा समूहातील घड्याळ बनवणारी कंपनी टायटनने दुबईतील एका मोठ्या ज्वेलरी ब्रॅण्डची खरेदी केली आहे. टायटनचा हा व्यवहार जागतिक स्तरावरील सर्वात महागडा करार ठरला आहे. ■

## महत्त्वाचे

### चढ-उतारानंतर किरकोळ घसरण




**मुंबई** : दिवसभरातील चढ-उतारानंतर भारतीय शेअर बाजारात दिवसअखेरीस किरकोळ घसरण नोंदविण्यात आली. मंगळवारी सकाळी बाजार उघडताच ३०० अंकांची वाढ झाली होती. मात्र, दिवसअखेर तो लाल रंगात गेला आणि अवघ्या १३ अंकांची का होईना, घसरण झाली. निफ्टीचीही सुरुवात सकारात्मक राहिली. दिवसअखेरीस त्यात २९ अंकांची घसरण होऊन तो २५,०६० वर बंद झाला. बाजारात घसरण झाली असली, तरी झोमॅटोची मूळ कंपनी इटरनलच्या शेअर्समध्ये जोरदार खरेदी झाली. निर्देशांकावरील या कंपनीच्या शेअर्सनी दहा टक्क्यांची झेप घेतली. ■

### स्वस्त इलेक्ट्रिक बाईक लाँच करणार होंडा

**मुंबई** : होंडा मोटरसायकल अ‍ॅण्ड स्कूटर इंडिया भारतात परवडणाऱ्या इलेक्ट्रिक बाईक लाँच करण्याची तयारी करीत आहे. कंपनीने अलिकडेच भारतीय पेटंट ऑफिसमध्ये इलेक्ट्रिक बाईकच्या पेटंटसाठी अर्ज केला आहे. यावरून असे दिसून येते की, कंपनी इलेक्ट्रिक मोटरसायकलवर काम करीत आहे. ■

# शेतकऱ्यांना नव्हे, शासनाला भिकारी म्हटले : कोकाटे



**मुंबई, २२ जुलै**

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे हे चांगलेच अडचणीत सापडले आहेत. विरोधकच नाही तर सत्ताधारी पक्षातील आमदारांनी आणि स्वत: मुख्यमंत्र्यांनीही त्यांच्याविषयी नाराजी व्यक्त केली आहे. मात्र, यावर स्पष्टीकरण देण्यासाठी पत्रकार परिषद बोलावल्यानंतर कोकाटे यांनी पुन्हा एकदा वादग्रस्त विधान केले आहे.

मी राज्यातील शेतकऱ्यांना भिकारी म्हणालो नव्हतो, तर शासनाला भिकारी असल्याचे कोकाटे यांनी म्हटले आहे. त्यांच्या या विधानामुळे आता पुन्हा एकदा वादंग उठले आहे. यावेळी बोलताना माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांच्या एक रुपयात पीक विमा संदर्भात देखील आपण केलेल्या वक्तव्यावरून झालेल्या वादावर स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला.

मात्र, हे स्पष्टीकरण देत असताना त्यांनी मी शेतकऱ्यांना भिकारी म्हणालो नव्हतो, असे सांगितले. ले. वास्तविक शेतकरी नाही, तर शासनच भिकारी असल्याचे म्हटले आहे.

# भारतीय कुटुंबांची बचत सवय मोडली

### संजय मल्होत्रांनी व्यक्त केली चिंता ● ५० वर्षांतील सर्वांत कमी बचत दर

◆ **मुंबई, २२ जुलै**

२०२३ च्या आर्थिक वर्षात भारताची निव्वळ घरगुती बचत जीडीपीच्या ५.३ टक्क्यांपर्यंत घसरली. रिझर्व्ह बँकेच्या मते, ही गेल्या जवळजवळ ५० वर्षांतील सर्वांत कमी बचत आहे. एका दशकापूर्वी, जेव्हा सकल देशांतर्गत बचत दर ३४.६ टक्के होता, त्याची आता २९.७ टक्क्यांपर्यंत घसरण झाली आहे, जो चार दशकांमधील सर्वांत कमी आहे.

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनीही यावर चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी म्हटले की, पारंपरिक बँक ठेवींपेक्षा बचत कमी होत असल्याने नियमांवर पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे. गेल्या नऊ वर्षांत, बँक ठेवींमध्ये ठेवलेल्या कुटुंबांच्या बचतीचा वाटा ४३ टक्क्यांवरून ३५ टक्क्यांपर्यंत कमी झाला आहे. हे फक्त आकडे नाहीत, तर ते लोकांच्या वागण्यात आणि विचारांमध्ये झालेला एक मोठा बदल दर्शवतात.




भारत, एक उदयोन्मुख आर्थिक शक्ती म्हणून जागतिक पटलावर चमकत आहे. सध्याच्या जागतिक अनिश्चितता आणि संकटांमध्येही आपली अर्थव्यवस्था चैतन्यशील आणि लवचिक राहिली आहे. भारतीय आणि परदेशी लोकही आशावादी दिसत आहे.

मात्र, या मजबूत आणि स्थिर वाढीच्या चमकदार आवरणाखाली एक शांत पण चिंताजनक बदल दडलेला आहे. एकेकाळी भारतीय कुटुंबांमध्ये खोलवर रुजलेली बचतीची सवय आता हळूहळू लोप पावत चालली आहे, ज्यामुळे आपल्या आर्थिक भविष्यावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. ◂(वृत्तसंस्था)

### गुंतवणुकीचा प्रकार बदलला

मजेची गोष्ट म्हणजे, भारतीय लोक अजूनही गुंतवणूक करत आहेत. फक्त वेगळ्या पद्धतीने. आर्थिक वर्ष २०२१ ते आर्थिक वर्ष २३ दरम्यान, इक्विटी आणि म्युच्युअल फंडांमधील घरगुती गुंतवणूक जवळजवळ दुप्पट झाली, ती १.०२ ट्रिलियन (१०.२ लाख कोटी) वरून २.०२ ट्रिलियन (२०.२ लाख कोटी) झाली. सोन्याची बचत ६३३.९७ अब्ज (६.३३ अब्ज) वर पोहोचली, जी २०११-१२ नंतरची सर्वाधिक आहे. कोरोनानंतर स्थावर मालमत्ता क्षेत्रातही तेजी दिसून आली. ■



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे...



### वैराग येथे मुख्यमंत्री फडवणीस यांच्या वाढदिवसानिमित्त २५६ जणांचे रक्तदान

**वैराग, दि. २२ जुलै-**

वैराग येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या ५२ व्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी वैराग यांच्या वतीने आयोजीत शिबीरात २५६ जणांनी रक्तदान केले. शिबीराचे उद्घाटन माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या हस्ते झाले. यावेळी मा. जिल्हा परिषद सदस्य संतोष निंबाळकर, मा. जिल्हा परिषद सदस्य मदन दराडे, मेजर जगन्नाथ आदमाने, आण्णा ग्रुपचे वैजीनाथ आदमाने, बाबासाहेब माने रेड्डी, महेश पन्हाळे, महेंद्र निंबाळकर, सतीश करंडे, नाना धायगुडे, मेजर सुखदेव जगताप यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

### यावलीच्या सरपंचाविरूध्द अविश्वास ठराव मंजूर; ग्रामसभेद्वारे घेतले मतदान

**मोहोळ, दि.२२ जुलै-**

यावली (ता. मोहोळ) येथील लोकनियुक्त सरपंच वर्षा सिद्धेश्वर राऊत यांच्याविरुद्ध ग्रामपंचायत सदस्यांनी दाखल केलेला अविश्वास ठराव मंजूर झाला असून त्यांचे सरपंच पद गेले आहे. लोकनियुक्त सरपंचावर अविश्वास आणण्याची ही बहुधा मोहोळ तालुक्यातील पहिलीच वेळ असल्याची चर्चा आहे. सरपंच वर्षा राऊत यांच्याविषयी गावामध्ये अनेक तक्रारी वाढल्या होत्या. विशेष करून त्यांना निवडून येण्यात मदत करण्यात आलेल्या कार्यकर्त्यांनाही त्या विश्वासात घेत नसल्याची चर्चा होती.यामुळे त्यांच्यावर अविश्वास आणण्याच्या हालचाली गेली सहा महिने सुरू होत्या. त्यानुसार अध्यासि अधिकारी म्हणून तहसीलदार सचिन मुळीक यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायतीची सभा पार पडली. त्यामध्ये सरपंचाविरुद्ध ११ सदस्य तर सरपंचाच्या बाजूने ० मतदान होऊन पारित झालेला ठराव प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर यांच्याकडे पाठवण्यात आला. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार अध्यासिअधिकारी गट विकास अधिकारी विवेक जमदाडे यांच्या अध्यक्षतेखाली सरपंचावर दाखल अविश्वास ठरावाबाबत विशेष ग्रामसभा दि २२ जुलै रोजी झाली. यावेळी एकूण मतदार ३११२ पैकी ५२५ मतदार सभासद उपस्थित होते. मतदारांची शिरगणतीनुसार मतदान प्रक्रिया पार पडली. सरपंच यांचे बाजूने ३७ व सरपंच यांचे विरुद्ध ४८८ असा सरपंच यांचे वरील अविश्वास ठराव मंजूर झाला . या प्रक्रियेवेळी सचिव म्हणून ग्रामसेविका प्रियांका केवळे यांनी काम पाहिले. तर सहाय्यक गट विकास अधिकारी व्ही .आर देशमुख, विस्तार अधिकारी नागसेन कांबळे, सचिन कदम व इतर ग्रामपंचायत अधिकारी आणि पोलीस स्टेशनचे किरण पाटील व इतर स्टाफ उपस्थित होते.



### राष्ट्रवादीचे सुरज चव्हाण हे दिसतील तिथे छावा स्टाईलने धडा शिकवू : धीरज शेळके

**बार्शी, दि.२२ जुलै-**

सूरज चव्हाणवर ३०७ चा गुन्हा दाखल करुन तात्काळ अटक करा अन्यथा महाराष्ट्रात रस्त्यावर फिरु देणार नाही, राज्यात दिसेल तिथे छावा स्टाईलने धडा शिकवण्याचे आव्हान अखिल भारतीय छावा संघटनेचे बार्शी तालुका अध्यक्ष धीरज शेळके यांनी केले. अजित पवार गटाचे राष्ट्रवादीचे युवक प्रदेश अध्यक्ष सूरज चव्हाण व राष्ट्रवादीच्या अन्य कार्यकर्त्यांनी छावा संघटनेचे प्रदेश अध्यक्ष विजयकुमार घाडगे पाटील यांना जबर मारहाण करत हल्ला केला. सूरज चव्हाण यांच्यावर ३०७ चा गुन्हा दाखल करुन तात्काळ अटक करा, त्याच्यावर कठोर कारवाई करा, अन्यथा छावा संघटना रस्त्यावर उतरुन तीव्र आंदोलन छेडेल आणि त्यावेळी होणाऱ्या परिणामास सर्वस्वी शासन जबाबदार राहील, असे निवेदन छावा संघटनेच्यावतीने बार्शी तहसीलदारांना देण्यात आले आहे. याप्रसंगी अखिल भारतीय छावा संघटनेचे बार्शी तालुका अध्यक्ष धिरज शेळके, शहराध्यक्ष निलेशराजे पवार, विनायक घोडके, प्रविण पवार, सचिन मोरे, बजरंग पवार, अक्षय पाटील, किसन घोडके, अभिजित शिराळ, अतिष थोरात उपस्थित होते.



### जीवन गौरव पुरस्काराने ॲड. नागेश खर्डीकर सन्मानित

**सांगोला, दि.२२ जुलै-**

सूर्योदय परिवार, सांगोला यांच्यातर्फे अहिल्यादेवी होळकर सभागृहात आयोजित ज्येष्ठ नागरिक स्नेहसंवाद मेळाव्यात सांगोला शहरातील ज्येष्ठ विधिज्ञ आणि पहिले नोटरी वकील ॲड.नागेश खर्डीकर यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर हास्यसम्राट अशोक देशमुख, ज्येष्ठ निरूपणकार सुभाष लऊळकर, मेडशिंगी भूषण डॉ. मच्छिंद्र सोनलकर, आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव, सूर्योदय फाउंडेशनचे अध्यक्ष अनिलभाऊ इंगवले, उपाध्यक्ष जगन्नाथ भगत, सूर्योदय दूध विभागाचे चेअरमन डॉ. बंडोपंत लवटे, एलकेपी मल्टीस्टेटचे व्हा.चेअरमन सुभाष दिघे उपस्थित होते. ॲड. नागेश खर्डीकर हे हिंदुत्ववादी कार्यकर्ते असून त्यांनी आणीबाणीच्या काळात कारावास भोगला होता. सांगोला शहरातील एक नामवंत विधिज्ञ म्हणून त्यांची ख्याती असुन त्यांचे सुपुत्र ॲड. अमित कुलकर्णी हे न्यायक्षेत्रात श्रीगोंदा येथे न्यायाधीश म्हणून कार्यरत आहेत.

# स्व. महेश कोठेंचा लढा मुलगा प्रथमेश लढणार

- विजयकुमार देशमुख यांच्याविरुद्ध दाखल केली होती याचिका
- निवडणूक याचिकेच्या बाबतीत भारतातील पहिलाच प्रयोग

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २२ जुलै-**

महेश विष्णुपंत कोठे यांच्या मृत्यूनंतर त्यांनी दाखल केलेल्या निवडणूक याचिकेला नवीन वळण मिळालेले आहे.

उत्तर विधानसभा मतदारसंघातून भाजपच्या विजयकुमार देशमुख यांच्याकडून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) महेश कोठे यांचा पराभव झाला होता. जीवित असतांना महेश कोठे यांनी विजयकुमा देशमुख यांच्या विजयला आव्हान देणारी निवडणूक याचिका ॲड. असीम सरोदे व ॲड. श्रीया आवले यांच्या मार्फत मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली होती. लोकप्रतिनिधित्व कायद्यातील कलम ११२ नुसार जेव्हा याचिका कर्त्याचा मृत्यू होतो तेव्हा दाखल केलेली निवडणूक याचिका रद्द होते आणि ती सुनावणीसाठी न घेता खारीज केली जाते.



परंतु त्याच कलम ११२ मधील एका तरतुदीनुसार जो कुणी अशी निवडणूक याचिका दाखल करण्यास पात्र असतो त्याने जर न्यायालयात विनंती केली की 'मृत याचिकाकर्त्याच्या जागी माझे नाव पिटिशनर म्हणून घ्यावे आणि मला याचिका चालवायची आहे तर त्या नवीन व्यक्तीचे नाव याचिकाकर्ता म्हणून घेण्याचे अधिकार न्यायालयाला असतात'

चुकीच्या पद्धतीने निवडणुकीत विजय संपादन केलेल्या प्रवृतींविरुद्ध न्यायालयीन लढा लढावा अशी आपल्या वडिलांची इच्छा होती आणि त्यामुळे स्व. महेश कोठे यांचे





चिरंजीव प्रथमेश कोठे यांनी हस्तक्षेप अर्ज करून निवडणूक याचिकेत त्यांच्या वडिलांच्या ऐवजी पिटिशनर म्हणून त्यांचे नाव समाविष्ट करावे आणि निवडणूक याचिकेची सुनावणी व्हावी असा अर्ज ॲड. असीम सरोदे यांच्या सूचनेनुसार केला. आणि उच्च न्यायालयाने तो मान्य केल्याने आता प्रथमेश महेश कोठे विरुद्ध विजयकुमार देशमुख अशी निवडणूक याचिका सुनावणीसाठी घेण्यात येईल. भारतात अश्या प्रकारे प्रथमच मृतक वडिलांची निवडणूक याचिका मुलगा स्वतःच्या नावाने चालविणार आहे अशी माहिती ॲड. असीम सरोदे यांनी दिली.

मूळ याचिकाकर्ते महेश कोठे यांचे निधन झाल्याचे १४ दिवसात ऑफिशिअल गॅझेट मध्ये प्रसिद्ध करावे आणि त्यानंतर स्व. महेश कोठे यांच्या ऐवजी पिटिशनर म्हणून नाव लावून घेण्यासाठी त्यांचे पुत्र प्रथमेश कोठे यांनी रीतसर स्वतंत्र अर्ज करावा अश्या सूचना न्यायमूर्ती अभय आहुजा यांनी दिल्या आहेत.



## विद्यार्थ्यांनी संशोधन क्षेत्रात झेप घ्यावी

### मनोज धस : सांगोला विद्यामंदिरात विद्यार्थी सत्कार

> संस्थेच्या माध्यमातून बंधू प्रफुल्लचंद्र झपके आयआयटीतून इंजिनियर, सोहेल काझी आयआरएस तर किरण धायगुडे एमबीबीएस झाला. विद्यार्थ्यांनी ध्येयकेंद्रीत परीक्षेत यश मिळवावे.
> **- प्रबुद्धचंद्र झपके, संस्थाध्यक्ष**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२२ जुलै-**

देशाची व्यवस्था बदलण्याचे सामर्थ्य डॉक्टर्स-इंजिनियर्सपेक्षा आयएएस-आयपीएस दर्जाच्या अधिकारी आणि संशोधकांमध्ये असते त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षा व जिज्ञासा वृत्तीवर लक्ष केंद्रित करावे असे मत प्राथमिक विभाग बीडचे उपशिक्षणाधिकारी मनोज धस यांनी व्यक्त केले.

सांगोला विद्यामंदिर प्रशालेतील शिष्यवृत्तीधारकांच्या सन्मानावेळी बोलत होते. यावेळी संस्थाध्यक्ष प्रबुद्धचंद्र झपके, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापिका शाहिदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, उत्तम सरगर, काकासाहेब नरुटे उपस्थित होते. कै.बापूसाहेब झपके यांच्या १०३ व्या जयंतीनिमित्त तैलचित्रास पुष्पहार समर्पण करत अभिवादन करण्यात आले. प्राचार्य अमोल गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. यावेळी शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी व त्यांच्या पालकांना रोख रुपये १ हजार ट्रॉफी, प्रशस्तीपत्रक, अभिनंदनपर पत्र, गुलाब पुष्प व पेढे भरवून सन्मानित करण्यात आले. शिक्षिका शुभांगी पलसे यांनी प्रत्येकी रोख रुपये पाचशे पारितोषिक स्वरूपात दिले. पालक सागर चंदनशिवे यांचेकडून प्रशालेस भेटवस्तू व जगन्नाथ भगत यांचेकडून मार्गदर्शक शिक्षकांचा गुलाबाची रोपे देऊन सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन आशुतोष नष्टे तर पारितोषिक वाचन चैतन्य कांबळे यांनी केले. आभार प्रदीप धुकटे यांनी मानले.

## मोहोळमध्ये २०७ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.२२ जुलै-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मोहोळ तालुक्यात तीन ठिकाणी झालेल्या रक्तदान शिबिरात मोहोळ कुरुल आणि कामती बु।। अशा तीन ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या शिबीरात एकूण २०७ जणांनी रक्तदान केले.



मोहोळ मधील शिबिराचे उद्घाटन करोडपती विमा एजंट नागनाथ गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी तालुका संघटन सरचिटणीस आणि मोहोळ तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष महेश सोवनी, प्रज्ञावंत आघाडीचे जिल्हा सहसंयोजक अविनाश पांढरे, जिल्हा उपाध्यक्ष सुशील क्षीरसागर, शिबीर संयोजक मोहोळ उत्तर मंडलाचे अध्यक्ष सतीश काळे,माजी शहराध्यक्ष अरविंद माने यांच्यासह प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते *या ठिकाणी ६१ जणांनी रक्तदान केले.

तर कुरुल येथे आयोजित करण्यात आलेल्या शिबिरामध्ये ९१ जणांनी रक्तदान केले. या शिबिराचे उद्घाटन मोहोळ दक्षिण मंडळाचे अध्यक्ष आणि पेनुरचे माजी सरपंच रमेश माने यांनी केले. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष शंकरराव वाघमारे, जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, जिल्हा सरचिटणीस विकास वाघमारे, सौ . दीपाली कोरे, अमरनाथ सरवळे, प्रमोद जाधव, लिंगदेव निकम, माजी तालुकाध्यक्ष सुनिल चव्हाण, लिंगराज शेंडगे, माऊली भगरे, साहेबराव घोडके, यशवंत नामदे, गणेश मुळे, काका यादव आदिसंह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. तर *कामती बुद्रुक येथे घेण्यात आलेला शिबिरात ५५ जणांनी रक्तदान केले. याचे उद्घाटन भाजयुमोचे तालुकाध्यक्षअंकुश आवताडे यांनी केले.

**कोर्टातील केस दाखल केल्याच्या कारणावरून**

## आई-मुलास मारहाण; दीर, सासूसह चौघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

कोर्टात केस दाखल केल्याच्या कारणावरून आई-मुलास मारहाण करून खल्लास करण्याची धमकी दिली,याप्रकरणी दीर,सासूसह चौघांवर फौजदार चावडी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना घर नं ८० शुक्रवार पेठ,भांडी गल्ली सोलापूर या ठिकाणी घडली आहे.




अनुपमा महेश नरखेडकर (वय ४६ रा. घर नं ८० शुक्रवार पेठ,भांडी गल्ली सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून उमेश हरिभाऊ नरखेडकर, रुक्मिणी हरिभाऊ नरखेडकर(दोघे रा.११७ उमा नगरी मुरारजी पेठ सोलापूर),शोभा कापसे व दोन अनोळखी व्यक्ती यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १२ जुलै रोजी दुपारी दिडच्या सुमारास फिर्यादी व मुलगा असे घरी होते. त्यावेळी अनुपमा यांचे दीर उमेश नरखेडकर , सासू रुक्मिणी व त्याच्या घरात काम करणारी शोभा कापसे इतर दोन अनोळखी व्यक्ती फिर्यादीच्या घरी आले. उमेश यांनी फिर्यादी अनुपमा यास तु माझ्या विरुध्द कोर्टात केस का केली असे म्हणत शिव्या देण्यास सुरुवात केली. त्यावेळी फिर्यादीने त्याचे सोबत असलेल्या दोन अनोळखी इसमांना आमच्या घरात कशाला आलात अशी विचारणा केली. त्या अनोळखी दोघांनी फिर्यादीचा मुलगा श्रीकांत या पकडले. उमेश नरखेडकर याने स्टीलच्या झाराने श्रीकांत च्या हात पाय वर मारले. त्यावेळी श्रीकांत खाली पडला तरीही मारहाण करीत होते. अनुपमा घरातील मधल्या गेटमध्ये गेल्या असता, उमेश यांने फिर्यादीचा पदर ओढल्याने त्या खाली पडल्या. त्यामध्ये फिर्यादीच्या गळ्यातील मंगळसूत्र तुटून गहाळ झाले. तसेच उमेश याने अनुपमा व श्रीकांत यास कोर्टात केलेली केस परत घ्या नाहीतर तुम्हाला खल्लास करेन अशी धमकी दिली. त्यावेळी श्रीकांत यांने डायल ११२ ला फोन केला पोलिस घटनास्थळी दाखल झाले होते. त्यावेळी घरातून सर्व आरोपी निघून गेले होते. या प्रकरणाचा तपास पोलिस हवालदार कसबे करीत आहेत.



## श्री विठ्ठलाचा पालखी सोहळा अरणला दाखल

### मोडनिंब येथेही उत्साही स्वागत

### चार दिवस अरणमध्ये विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.२२ जुलै-**

रविवारी पंढरपूरहून प्रस्थान झालेल्या श्री विठ्ठलाच्या पालखीचे मंगळवारी दि.२२ रोजी अरण येथे आगमन झाले. उद्या दि.२३ रोजी संत शिरोमणी सावता महाराजांचा ७३० वा संजीवन समाधी सोहळा आहे. गुरवारी श्रीफळ हंडी सोहळा होणार आहे. शुक्रवार दि.२५ जुलै रोजी ग्रामप्रदक्षिणा होईल. तर शनिवार दि. २६ रोजी पालखीचा परतीचा प्रवास होणार आहे. चार दिवस चालणाऱ्या या धार्मिक कार्यक्रमामुळे अरण परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला आहे.


अरण (ता. माढा) येथील संत सावता माळी यांच्या भेटीसाठी रविवारी पंढरपूरहून प्रस्थान ठेवलेल्या विठुरायाची पालखी अरण येथे दाखल झाली. या सोहळ्याचा पहिला मुक्काम रोपळे येथे होता. त्यानंतर दुसरा मुक्काम आष्टी (ता. मोहोळ) येथे होऊन मोडनिंब (ता.माढा) येथे पालखी दाखल होताच फटाक्यांच्या आतषबाजीत स्वागत झाले. मोडनिंब ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच लक्ष्मी पाटील, माजी सरपंच कैलास तोडकरी, मनसेचे प्रशांत गिड्डे, संदेश तोडकरी यांनी स्वागत केले. शहरातील पालखी गोल परिसरात भारूड कार्यक्रम पार पडला. येथे सौ व श्री विशाल जाधव, महेश सुर्वे, अजिनाथ सुर्वे परिवाराच्या वतीने महाआरती झाली. श्री विठ्ठल पालखीवर ग्रामस्थांकडून पुष्पवृष्टी करण्यात आली. तीन दिवसांचा पायी प्रवास केल्यानंतर आज पालखी सोहळा अरण येथे पोहोचला. यावेळी केदार यांना मान असतो. श्री विठ्ठल पादुकांना तुकाराम केदार कुटुंबियांच्या वतीने दुग्धाभिषेक व पूजा करण्यात आली. ग्रामपंचायतीच्या वतीने स्वागत करण्यात आले. त्यानंतर प्रसादाचे वाटप करण्यात आले. दरम्यान संत सावता माळी समाधी सोहळ्यानिमित्त पारंपरिक भक्ती, श्रद्धा आणि सेवा यांचे प्रतीक असणारा हा अनोखा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडतो.

आषाढी सोहळ्यानिमित्त सर्व संतांच्या पालख्या पंढरपूरला जातात. मात्र स्वतः पांडुरंग अरण (ता. माढा) येथील संत शिरोमणी सावता महाराज यांच्या भेटीस येतात आणि तीन दिवस मुक्कामी असतात, अशी आख्यायिका आहे. यामध्ये संत सावता महाराज यांची पालखी पुढे व श्री पांडुरंगाची पालखी पाठीमागे, यात संत सावता महाराज श्री विठ्ठलाला भक्तीचा मळा दाखवितात, अशी आख्यायिका आहे.

## सावता पांडूरंग स्वरूपी मिळाला । देह समर्पिला ज्याचा त्यासी ।।

**कांदा, मुळा, भाजी, विहीर तसेच शेतातील प्रत्येकात श्री विठ्ठलाला पाहणाऱ्या संत श्री सावता महाराजांचा समाधी सोहळा आषाढ वद्य चतुर्दशीला असतो. यंदा २३ जुलै रोजी हा सोहळा आहे, त्यानिमित्त...**

संत शिरोमणी सावता महाराजांचा जन्म श्रीक्षेत्र अरण (ता. माढा) येथे शके ११७२ मध्ये शुभ नक्षत्रावर परसोबा व नांगिताबाई यांच्या पोटी झाला. वडील परसोबा पंढरीचे वारकरी होते. पंढरीची वारी आहे माझे घरी । आणिक न करी तीर्थव्रत ।। याप्रमाणे दुसरे व्रत न करता फक्त पांडूरंगाची भक्ती ते करत. एकदा भगवंत परसोबाला म्हणाले, नित्य वारी करण्यातून तुम्हाला काय मिळते. शिवाय तुम्ही देवाकडे काही मागतही नाही. परसोबा काही तरी माग. तेव्हा परसोबा म्हणतात. काही मागणे आम्हा अनुचित । वडिलांची रीत जाणतसे ।। त्यांना भगवंतांच्या कृपाप्रसादानेच पुत्रप्राप्ती झाल्याचे मानून आईला रात्रंदिवस देवाचे वेड लागले. एकदा सावता महाराजांना भगवंतभेटीची इच्छा झाली. तेव्हा वेगाने प्रत्यक्ष भगवंत त्यांच्या समोर उभे राहिले. सावताला भगवंताने विचारले, 'मला का बोलाविले. वास्तविक तू तर ज्ञानमूर्ती आहेस.' महाराज म्हणतात, 'भगवंता, गुरुकृपेशिवाय जिवाचा उद्धार होत नाही.' हे ऐकून देवाला आनंद झाला. प्रत्यक्ष देवानेच देवपण सोडून सावता महाराजांचे गुरुत्व स्वीकारले. त्यांच्या मस्तकावर हात ठेवून त्यांना आत्मानुभुतीच्या शिखरावर पोहोचवले. विठ्ठलाने संतांच्या भेटीला जाण्याचे ब्रीद पाळले आहे. तुका म्हणे संतसेवा । हेची देवा उत्तम ।। म्हणून देवापेक्षा संतांची सेवा श्रेष्ठ मानली आहे.



गुरुकृपेमुळे महाराजांना दिव्य दृष्टी प्राप्त झाली. त्यांना कांदा, मुळा, मोट, विहीर, दोरी यातच पांडुरंग दिसू लागला. कांदा, मुळा भाजी। अवघी विठाई माझी। लसूण, मिरची, कोथिंबिरी। अवघा झाला माझा हरी।। मोट नाडा विहीर दोरी। अवघी व्यापिली पंढरी। सावता म्हणे केला मळा । विठ्ठलपायी गोविला गव्य ।।

अशा या संत सावताबाबांनी सर्व समयासी सादर व्हावे, देव ठेवील तैसे राहावे, असा संदेश दिला. ते नेहमी ब्रह्मानंदामध्ये तल्लीन असत. नामचिंतनामुळे ते तीर्थच बनले आणि याच जोरावर यम आला तर त्याला परत पाठवू, अशी आत्मशक्ती त्यांना मिळाली. 'समाधीचे वेळी मी अरणला येईल' असे म्हटल्याप्रमाणे पांडुरंग प्रत्यक्ष हजर राहिल्याची वारकऱ्यांची श्रद्धा आहे. आषाढ वद्य चतुर्दशी शके १२१७ (दि. १२ जुलै १२९५) मन्मथ नाम संवत्सरात ग्रीष्म ऋतुत सूर्योदयाला त्यांनी समाधी घेतली. त्यांच्या स्मरणार्थ पंढरपूरहून अरण या गावी पालखी येते. समाधीसोहळा, काला करून परत पंढरपूरला जाते. ती परंपरा आजही सुरू आहे. उठोनी प्रातःकाळी करोनीया स्नान। घालुनी आसन यथाविधी।। नवज्वरे देह झालासे संतप्त । परि मनी आर्त विठोबाची।। प्राणायम करून कुंभक साधिला । वायु निरोधिला मूळ तत्वी ।। बाराशते सतरा शालिवाहन शक । मन्मथ नामक संवत्सर ।। ऋतु ग्रीष्म कृष्ण आषाढ चतुर्दशी । आला उदयासी सहस्त्राकर ।। सांवता पांडूरंग स्वरूपी मिळाला । देह समर्पिला ज्याचा त्यासी ।।

**- श्याम जोशी**
**मो. ७४४७७८८३४९**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# पाकिस्तानला पुराचा तडाखा; २२१ ठार

## गिलगिट-बाल्टिस्तानमध्ये ढगफुटी, भूस्खलनामुळे ५९२ जण जखमी, आठ हजार घरे उद्ध्वस्त

◆ **इस्लामाबाद, २२ जुलै**

पाकिस्तानच्या विविध भागांत ४८ तासांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने धुमाकूळ घातला आहे. पूर आणि भूस्खलनामुळे गेल्या २४ तासांत २२१ जणांचा मृत्यू झाला, तर इमारतींची पडझड आणि भूस्खलनाच्या घटनांमध्ये ५९२ नागरिक जखमी झाले. इस्लामाबादसह विविध शहरांतील आठ हजार इमारती कोसळल्या आणि गिलगिट-बाल्टिस्तानमध्ये ढगफुटीने कहर केल्याची माहिती पाकिस्तानच्या राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अर्थात् एनडीएमएने दिला आहे.



एनडीएमएने म्हटले की, पाकिस्तानमध्ये ढगफुटी आणि सातत्याने मुसळधार पाऊस कोसळत असल्याने पूरस्थिती बिकट बनली आहे. देशभरात पावसाशी संबंधित घटनांमध्ये आतापर्यंत २२१ जणांचा मृत्यू, तर ५९२ पेक्षा जास्त लोक जखमी झाले. मुख्य नद्या आणि उपनद्यांना आलेल्या पुरामुळे अनेक महामार्ग, रेल्वेसेवा बंद करण्यात आल्या.विमानांच्या उड्डाणांवरही परिणाम झाला आहे.

देशाच्या उत्तरेकडील आणि पर्वतीय भागात मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. पंजाब प्रातांत सर्वाधिक पुरात वाहून गेल्याने आणि भूस्खलनामुळे १३५ जणांचा मृत्यू झाला, ४७० जण जखमी आहेत. खैबर पख्तुनख्वामध्ये ४० जणांचा मृत्यू आणि ६९ जण जखमी झाले आणि सिंधमध्ये २२ जणांचा मृत्यू आणि ४० जण जखमी झाले आहेत. पुरात वाहून गेल्याने बलुचिस्तानमध्ये १६ जणांचा मृत्यू झाला, यासोबतच इस्लामाबादमध्ये इमारत कोसळून पाच जण ठार झाले.

**दोन हजार जनावरे वाहून गेली**

एनडीएमएने म्हटले की, दोन दिवसांत देशभरातील विविध भागांत दोन हजार जनावरे पुरात वाहून गेली. इस्लामाबाद, बलुचिस्तान आणि सिंध प्रातांतील दहा पूल वाहून गेल्याने २५ पेक्षा अधिक महामार्गांवरील वाहतूक बंद आहे. व्याप्त काश्मिरातील परिस्थिती बिकट असून, शेकडो पर्यटक विविध अडकले आहेत. त्यांना सुरक्षित स्थळी नेण्यासाठी बचाव पथके तैनात करण्यात आले.

**चार विदेशी पर्यटकांचा मृत्यू, २५ बेपत्ता**

व्याप्त काश्मीरमधील गिलगिट-बाल्टिस्तानमध्ये सोमवारी ढगफुटीनंतर आलेल्या पुरात दिमार जिल्ह्यात चार विदेशी पर्यटक वाहून गेले, यातील दोन जण जर्मनी आणि ब्रिटनचे रहिवासी आहे. पुरात त्यांची वाहनेही वाहून गेली. या भागात आतापर्यंत २५ पर्यटक बेपत्ता असल्याची माहिती गिलगिट-बाल्टिस्तान सरकारचे प्रवक्ते फैजउल्लाह फारक यांनी दिली. ◂(वृत्तसंस्था)

# गाझ्रात इस्रायलकडून नरसंहारच

## २६ देशांचा सुरक्षा परिषदेत निंदा प्रस्ताव

## जर्मनी, अमेरिकेची तटस्थ भूमिका

◆ **लंडन, २२ जुलै**

गाझा पट्टीत २१ महिन्यांपासून इस्रायलचे हल्ले सुरू आहेत आणि यात हजारो पॅलिस्टिनी नागरिक मारले गेले, यात बहुतांश महिला आणि मुलांचा समावेश आहे. गाझ्रात सुरू असलेला संघर्ष नरसंहारचा असल्याचा आरोप करीत संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेत इस्रायलविरोधात २६ देशांनी निंदा प्रस्तावाला पाठिंबा दिला. अमेरिका आणि जर्मनीने तटस्थ भूमिका घेत, इस्रायलला सुरक्षेचा अधिकार असल्याचे म्हटले आहे.

ब्रिटन, फ्रान्स आणि अनेक युरोपीय देशांसह २६ देशांनी गाझ्रातील संघर्ष त्वरित थांबवण्याची मागणी सुरक्षा परिषेदेत केली. २६ देशांनी यावेळी संयुक्त निवेदन जारी केले. त्यात गाझाच्या आरोग्य मंत्रालयाने जारी केलेले मृतकांचे आकडे जारी करण्यात आले. निवेदनात म्हटले की, मागील तीन महिन्यांत इस्रायलच्या हल्ल्यात गाझामध्ये ८०० नागरिकांचा मृत्यू, तर पाच हजारांपेक्षा अधिक जखमी झाले आहेत. इस्रायली लष्कराकडून सुरू असलेले हल्ले, हा एक प्रकारचा नरसंहारच आहे. अन्न आणि पाण्यावाचून लोक तडफडून मरत आहे. मदत केंद्रावर निष्पाप नागरिकांवर गोळीबार करणे मानवतेला काळीमा फासण्याचा प्रकार आहे. यावेळी इस्रायली सैन्याच्या गोळीबारात शेकडो पॅलेस्टिनी ठार झाल्याचाही त्यांनी निषेध केला. या निवेदनावर २० युरोपीय देशांसह कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडच्या परराष्ट्र मंत्र्यांनी स्वाक्षरी केली आहे, तर अमेरिका आणि जर्मनी या यादीत समाविष्ट नाही.

**भयानक मानवी संकट**

गाझाची २० लाखांहून अधिक पॅलेस्टिनी लोकसंख्या भयानक मानवी संकटाचा सामना करीत आहे. येथील लोक अनेक वेळा विस्थापित झाले आहेत. गाझामध्ये सुरू असलेल्या लढाईमुळे या प्रदेशाच्या इतर भागांतही संघर्ष निर्माण झाला आहे. यामध्ये इस्रायल आणि येमेनमधील इराण समर्थित हुथी बंडखोरांमधील संघर्षाचाही समावेश आहे. इस्रायलची युद्धखोर नीती जागतिक शांततेसाठी धोकादायक असल्याचे निवेदनात म्हटले आहे. ■

**हमासच्या खात्म्यानंतरच हल्ले थांबवणार**

सुरक्षा परिषेदेत निंदा प्रस्तावाला प्रत्युत्तर देत इस्रायलच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले की, हमासचा खात्मा झाल्याशिवाय आम्ही गाझ्रातील संघर्ष थांबविणार नाही. हमास आमच्या देशाच्या सुरक्षेसाठी धोकादायक आहे आणि आमचे ५० पेक्षा अधिक नागरिक त्यांच्या ताब्यात आहे. लष्करी कारवाईचा उद्देश हमासवर ओलिसांना सोडण्यासाठी दबाव आणणे आहे. ◂(वृत्तसंस्था)

# बांगलादेश विमान अपघातातील बळीसंख्या २७

◆ **ढाका, २२ जुलै**

काही जखमींचा मृत्यू झाल्यानंतर बांगलादेशात वायुदलाचे प्रशिक्षणार्थी विमान महाविद्यालयावर कोसळून झालेल्या भीषण अपघातातील बळीसंख्या २७ झाल्याची माहिती प्रशासनाने मंगळवारी दिली.



चीनमध्ये बनवलेले प्रशिक्षणार्थी लढाऊ विमान एफ-७ बीजीआय सोमवारी ढाक्यातील उत्तरा परिसरातील दियाबारी येथील माईलस्टोन शाळा व महाविद्यालयाच्या दोन मजली इमारतीवर कोसळले. उड्डाणानंतर काही क्षणांतच त्यात यांत्रिक बिघाड झाला होता.

या अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या २७ झाली असून त्यात २५ बालकांचा समावेश आहे, असे बांगलादेश सरकारचे मुख्य सल्लागार प्रा. मुहम्मद युनुस यांचे विशेष सल्लागार सैदुर रहमान यांनी पत्रकारांना सांगितले. या अपघातात १७० जण जखमी झाले आहेत. त्यापैकी काही जणांची प्रकृती गंभीर आहे. यात २० जणांचा मृत्यू तर सात जण जखमी झाल्याचे वृत्त सुरुवातीला होते. ठार झालेल्यांत वैमानिक फ्लाईट लेफ्टनंट मोहम्मद तौकिर इस्लामचाही समावेश आहे. या अपघातात बळी पडलेल्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सरकारने मंगळवारी राष्ट्रीय शोक जाहीर केला. ◂(वृत्तसंस्था)

# खोदकामात सापडले दुसऱ्या महायुद्धातील अवशेष

◆ **इम्फाळ, २२ जुलै**

मणिपूरच्या इम्फाळ पश्चिम जिल्ह्यात मंगळवारी सकाळी बांधकाम कामगारांना दुसऱ्या महायुद्धातील अवशेष सापडले. लंगथाबलमध्ये बांधकामासाठी खोदकाम सुरू असताना जमिनीखाली चार फूट खोलवर या वस्तू सापडल्या, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.



घटनास्थळावरून मोठ्या प्रमाणात गंजलेल्या रिकाम्या पेट्या, पाण्याच्या बाटल्या, एक ग्रेनेड, गोळे, कुदळ आणि गंजलेले टिन कॅन सापडले. १९४४ मध्ये इम्फाळच्या लढाईत मित्र राष्ट्रांच्या सैन्याच्या सैनिकांनी या वस्तू मागे सोडल्या होत्या असे मानले जाते. या भागाजवळील कांचीपूर टेकड्यांवर मित्र राष्ट्रांच्या सैन्याची एक छावणी होती. जपानच्या सैन्याने मणिपूरच्या टेकड्या वेढल्या होत्या. परंतु, इम्फाळ खोऱ्यातील मित्र राष्ट्रांच्या सैन्याच्या छावण्यांवर ते विजय मिळवू शकले नाहीत. इम्फाळची लढाई आणि कोहिमाची लढाई निर्णायक लढाईपैकी एक मानली जाते. इम्फाळच्या लढाईत मित्र राष्ट्रांचा महत्त्वपूर्ण विजय झाला. यामुळे तत्कालीन ब्रिटिश सत्ता असलेल्या भारतात जपानी सैन्याची प्रगती थांबली. इम्फाळच्या लढाईत ५४ हजारांपेक्षा जास्त जपानी सैन्य मारले गेले आणि जखमी झाले, तर १२ हजारांपेक्षा जास्त मित्र राष्ट्रांचे सैनिक मृत्युमुखी पडले आणि जखमी झाले होते. ◂(वृत्तसंस्था)

# जिरीबाममध्ये ७६ कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त

◆ **इम्फाळ, २२ जुलै**

आसाम रायफल्सने मणिपूर पोलिस आणि सीआरपीएफ यांच्या संयुक्त कारवाईत जिरीबाम जिल्ह्यातून ७६ कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त केले, असे निमलष्करी दलाने सोमवारी एका निवेदनात म्हटले आहे.

एका गुप्त माहितीच्या आधारे सुरक्षा दलांनी जिल्ह्यात ६१६ साबणाच्या पेट्यांमध्ये लपवलेले हेरॉइन आणि ५० हजार बंदी घातलेल्या मेथाम्फेटामाइन गोळ्या जप्त केल्या. जिरीबाम जिल्ह्यातील बराक नदीवर बोटीतून अंमली पदार्थांची वाहतूक केली जात होती. या प्रदेशात मोठ्या प्रमाणात ड्रग्ज तस्करीचे प्रयत्न हाणून पाडण्यात आसाम रायफल्सने केलेल्या निर्णायक कारवाईबद्दल मी त्यांचे कौतुक करतो, असे आसाम रायफल्सचे अमली पदार्थ जप्त केल्याबद्दल कौतुक करताना, माजी मुख्यमंत्री एन. बिरेन सिंग यांनी एक्स वरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे.

सिंह यांनी निमलष्करी दलाला सीमापार तस्करीवर कारवाई सुरू ठेवण्याचे आवाहनही केले. आमचे सीमावर्ती क्षेत्र ऐतिहासिकदृष्ट्या ड्रग्ज तस्करीचे मार्ग म्हणून वापरले जात असल्याने, नवीन कॉरिडॉर उदयास येण्यापासून रोखण्यासाठी सतत आणि तीव्र दक्षता घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे ते म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता


### कामाच्या 'शिफ्ट'बाबत विद्याचे दीपिकाला समर्थन



**मुंबई** : हिंदी चित्रपटसृष्टीत अभिनेत्रींच्या 'शिफ्ट'चा वाद सध्या चर्चेत आहे. दीपिका पदुकोणने मुलगी जन्माला आल्यानंतर आठ तासच काम करणार म्हटल्याने तिला चित्रपटातूनच काढून टाकले. त्यानंतर यावर अनेक उलटसुलट प्रतिक्रिया उमटल्या. आता अभिनेत्री विद्या बालनने दीपिकाला या मुद्यावर समर्थन दिले. विद्या स्वत: आई झाली नसली, तरी तिने दीपिकाच्या म्हणण्याला अनुमोदन दिले. ती म्हणाली, आजकाल प्रत्येक क्षेत्रात महिलांच्या शिफ्टमध्ये सूट दिली जात आहे. मग सिनेसृष्टी त्यात मागे कशी राहील. एका आईला काम आणि कुटुंब यात ताळमेळ साधावा लागतो. त्यामुळे कामाच्या तासांमध्ये सवलत दिलीच पाहिजे. माझ्यावर सध्या अशी कोणतीही जबाबदारी नसल्याने मी १२ तास काम करायला तयार असते. पण, प्रत्येक महिलेची स्थिती वेगळी असते. आई झाल्यानंतर स्त्रीच्या शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्यात बदल होतो, तो प्रत्येकाने समजून घेतला पाहिजे. यापूर्वी काजोल आणि सोनाक्षीनेही दीपिकाला समर्थन दिले होते. रश्मिकाने मात्र याला विरोध केला होता. ■

### राकेश रोशनला रुग्णालयातून सुटी


**मुंबई** : राकेश रोशन यांची मुंबईतील कोकिलाबेन धीरूभाई अंबानी रुग्णालयात आपत्कालीन अँजिओप्लास्टी करण्यात आली.



आता त्यांना रुग्णालयातून सुटी देण्यात आली आहे. अलीकडेच त्यांनी आपत्कालीन वैद्यकीय स्थितीबद्दल माहिती दिली. त्यांनी सांगितले की, ते नियमित तपासणीसाठी गेले होते, परंतु डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार सोनोग्राफी केली, तेव्हा मेंदूला रक्त वाहून नेणाऱ्या दोन्ही धमन्यांमध्ये बराच अडथळा असल्याचे आढळले. राकेश रोशन यांनी त्यांच्या अधिकृत इन्स्टाग्रामवर रुग्णालयातील फोटो शेअर केले आणि लिहिले, हा आठवडा माझ्यासाठी खरोखरच डोळे उघडणारा ठरला. योगायोगाने, आम्हाला आढळले की कोणतीही लक्षणे नसली तरी, माझ्या दोन्ही कॅरोटिड धमन्या ७५ टक्क्यांपेक्षा जास्त ब्लॉक झाल्या आहेत. जर याकडे दुर्लक्ष केले असते, तर ते अत्यंत धोकादायक ठरू शकले असते. मला आशा आहे की हा अनुभव इतरांना त्यांचे आरोग्य गांभीर्याने घेण्यास प्रेरित करेल. ■

### पुन्हा अपघातातून बचावला दाक्षिणात्य सुपरस्टार

**हैदराबाद** : इटलीमध्ये कार रेसिंग स्पर्धेत दक्षिणेतील लोकप्रिय अभिनेता अजित कुमारचा अपघात झाला. त्यांची भरधाव गाडी रेलिंगला धडकली. वेग इतका जास्त होता की त्यांची गाडीचे तुकडे-तुकडे झाले. या भीषण अपघातात अजितच्या गाडीचे भाग हवेत उडून ट्रॅकवर विखुरले. तथापि, या अपघातात अभिनेत्याला कोणतीही दुखापत झाली नाही. तो अत्यंत सावधगिरीने गाडीतून बाहेर पडला आणि तिथे उपस्थित असलेल्या टीमला ट्रॅकवरून गाडीचे भाग काढण्यात मदत केली. गाडीची स्थिती इतकी बिकट झाली होती की, क्रेनच्या मदतीने ती ट्रॅकवरून काढण्यात आली. अजित कुमार अपघातातून थोडक्यात बचावण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी दुबईमध्येही त्यांच्या रेसिंग कारचा मोठा अपघात झाला होता. ■





उत्तरप्रदेशात सध्या मुसळधार पाऊस पडत आहे. प्रयागराज येथील संगम क्षेत्राजवळील गंगा व यमुनेच्या पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात वाढली. येथील बुडालेल्या घाटांत नांगरून ठेवलेल्या नौका

# शिलाँगच्या कुलगुरूंकडे सापडली २० कोटींची संपत्ती

## ईडीची मोठी कारवाई

◆ **शिलाँग, २२ जुलै**

अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) पैसे घेऊन नकली प्रमाणपत्र जारी करण्याच्या प्रकरणात शिलाँगच्या कुलगुरूंकडे छापेमारी करत २०.२८ कोटींची संपत्ती अस्थायी स्वरूपात जप्त केली आहे.

यात नवी दिल्लीतील १९.२८ कोटी रुपयांच्या चार अचल संपत्तींचा समावेश आहे. याशिवाय बँकेत एक कोटी रुपयांची चल संपत्ती सापडली. ही सर्व संपत्ती बेकायदेशीर सावकारी प्रतिबंधिक कायद्याच्या अंतर्गत(पीएमएलए) जप्त करण्यात आली आहे. यापूर्वी शिलाँगमध्ये ईडीच्या कार्यालयाने जप्ती आदेश जारी केला होता. या प्रकरणातील कुलगुरूंचे नाव चंद्रमोहन झा असे असून, ते सीएमजे विश्वविद्यालयाचे पीठासीन कुलगुरू आहेत. ईडीने आपल्या वक्तव्यात म्हटले आहे की, या सर्व अचल संपत्ती २०१३ आणि २०२२ दरम्यान खरेदी करण्यात आल्या होत्या. यापूर्वी त्यांच्या कुटुंबीयांकडून बँकेतील रक्कम लपविण्याचा प्रयत्न झाला होता. या प्रकरणी कुटुंबातील एकाला ताब्यात घेण्यात आले होते.

ईडीने मेघालयच्या पूर्व खासी हिल्स शिलाँग जिल्ह्यात सीआयडी पोलिस ठाण्यात दाखल एफआयआरवर तपास सुरू केला होता.

ही तक्रार आयएएस अधिकारी एम. एम. राव यांनी तत्कालीन राज्यपाल आर. एस.मुशाहरी यांच्या निर्देशांवरून दाखल केली होती. झा यांच्या कार्यकाळात पदव्या विकण्याचा प्रकारही झाल्याचे तक्रारीत नमूद होते. शिवाय आर्थिक विषयातही बऱ्याच अनियमितता आढळल्या होत्या. ◂(वृत्तसंस्था)

# तुम्ही बातम्या वाचता अन् खटला दाखल!

## अश्विनी उपाध्याय यांना सुप्रीम कोर्टाने फटकारले

◆ **नवी दिल्ली, २२ जुलै**

देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई आपल्या वाक्पटूतेसाठी ख्यात आहेत. नुकतीच सर्वोच्च न्यायालयात वक्फ अधिनियमांच्या अनेक तरतुदींना आव्हान देणारी याचिका स्थानांतरित करण्याची याचिका आली तेव्हा सरन्यायाधीश याचिकाकर्ता वकिलांवर भडकले आणि त्यांनी वकिलांना असे काही सुनावले की, त्यांनी याचिकाच मागे घेतली.

वरिष्ठ वकील अश्विनी उपाध्याय यांनी ही याचिका दाखल केली होती. त्यांनी वक्फ अधिनियमांच्या अनेक तरतुदींना आव्हान देणारी याचिका दिल्ली उच्च न्यायालयातून सर्वोच्च न्यायालयात स्थानांतरित करण्याची मागणी केली होती. यावर सरन्यायाधीशांच्या नेतृत्वातील न्यायासनासमोर सुनावणी सुरू झाली, तेव्हा अश्विनी उपाध्याय म्हणाले की, या प्रकरणात मी पहिला माणूस होतो... माझ्या याचिकेमुळेच ही बाब समोर आली की वक्फने अशा पद्धतीने जमिनी हडपल्या आहेत.

यावर सरन्यायाधीशांनी व्यंग्यात्मक पद्धतीने म्हटले, तुम्ही तर नेहमीच पहिले असता आणि नेहमीच दोषपूर्णही असता. तुमची याचिका वाचल्यानंतरच संसदेने कायदा बनवला होता का? तुम्ही वाटल्यास या प्रकरणी हस्तक्षेप याचिका दाखल करू शकता. नेहमी वर्तमानपत्र वाचता आणि याचिका दाखल करीत राहता. तुमची याचिका स्वीकारण्याची आमची इच्छा नाही. त्यावर उपाध्याय म्हणाले, मग मी हायकोर्टात वाट पाहू शकतो. त्यावर सरन्यायाधीश पुन्हा म्हणाले, तुम्ही हस्तक्षेप याचिका दाखल करू शकता. मी तुम्हाला सांगितलेच आहे... इथे नाहीच... याचिका फेटाळली.

उपाध्याय यांनी २०२१ मध्ये जेव्हा वक्फ कायद्याला आव्हान दिले, त्यावेळी सर्वोच्च न्यायालयाने त्यांना विचारणा केली की, त्यांची स्वत:ची जमीन वक्फने बळकावली आहे का? त्यावर उपाध्याय यांनी न्यायालयावर भेदभाव करीत असल्याचा आरोप केला होता. असा प्रश्न न्यायालयाने ओवैसी, बुखारी आणि मदनी यांना केला नव्हता, असे त्यांचे म्हणणे होते. ◂(वृत्तसंस्था)

# अंतराळातून परतल्यावर दृष्टीवर होऊ शकतो कायमचा परिणाम

## ७० टक्के अंतराळवीरांना जाणवली समस्या ● नेत्रगोलकाचा बदलू शकतो आकार

◆ **वॉशिंग्टन, २२ जुलै**

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर दीर्घकाळ वास्तव्य केल्यानंतर पृथ्वीवर परतणाऱ्या अंतराळवीरांच्या दृष्टीवर परिणाम होतो आहे. दीर्घकाळाच्या मोहिमांवरून परतलेल्या जवळपास ७० टक्के अंतराळवीरांना दृष्टीची समस्या येत असल्याचे दिसून आले. यामुळे नासाच्या शास्त्रज्ञांना अंतराळातील वजनरहित वातावरणाचा दृष्टीवर कोणता परिणाम होतो यावर संशोधन करीत आहेत. यातील सर्वांत भीतीदायक बाब म्हणजे, दृष्टीवर होणारे हे परिणाम कायम स्वरूपाचे असण्याची शक्यता आहे.

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर सहा महिने वास्तव्य केलेल्या डॉ. सारा जॉन्सन यांना त्यांच्या मोहिमेदरम्यान ही समस्या लक्षात आली. अंतराळात जाण्यापूर्वी जो मजकूर त्यांना अतिशय स्पष्टपणे दिसत होता, तो पृथ्वीवर परतल्यानंतर अस्पष्ट दिसू लागला. अशा प्रकारची घटना केवळ तिच्यासोबतच नव्हे, तर अनेक अंतराळवीरांना दृष्टी अंधुक होणे, वाचण्यास आणि दूरच्या वस्तू दिसण्यास त्रास जाणवू लागला. यातील काही बदल पृथ्वीवर परतल्यानंतरही वर्षानुवर्षे टिकतात, असे निदर्शनास आले.



'स्पेसफ्लाइट असोसिएटेड न्यूरो-ऑक्युलर सिंड्रोम' नावाची ही स्थिती दीर्घकालीन अंतराळ प्रवासातील एक प्रमुख चिंता आहे. मोशन सिकनेस किंवा स्नायूंचे नुकसान यासारख्या इतर अवकाश संबंधित समस्या पृथ्वीवर आल्यावर ठीक होतात. मात्र, दृष्टीचे कायमस्वरूपी नुकसान होऊ शकते. ही समस्या सूक्ष्म गुरुत्वाकर्षणामुळे उद्‌भवते. जिथे गुरुत्वाकर्षणाच्या अभावामुळे शरीरातील द्रव वरच्या दिशेने सरकतात. यामुळे चेहऱ्यावर सूज येते आणि कवटीच्या आत दाब वाढतो. या दाबामुळे नेत्रगोलकाचा आकार बदलू शकतो आणि दृकतंत्रिका (ऑप्टिक नर्व्ह) फुगू शकते. परिणामी, दृष्टीवर परिणाम होऊ शकतो.

**मंगळ मोहिमेत अंतराळवीरांना धोका**

हे बदल कालांतराने स्थिर होतात की आणखी बिकट होतात हे आपल्याला समजून घेणे आवश्यक आहे. गंभीरपणे कमकुवत दृष्टी असलेल्या अंतराळवीरांमुळे संपूर्ण मंगळ मोहिमेला धोका होऊ शकतो, असे नासाचे प्रमुख दृष्टी संशोधक डॉ. मायकल रॉबर्ट्स यांनी या बाबींवर भर देत म्हटले. मंगळ मोहीम दोन ते तीन वर्षे चालू शकते. परिणामी, 'स्पेसफ्लाइट असोसिएटेड न्यूरो-ऑक्युलर सिंड्रोम'कडे लक्ष देणे गरजेचे आहे.

**नासा शोधतोय् विशेष कॉन्टॅक्ट लेन्स**

अंतराळवीरांच्या दृष्टीवर परिणाम होऊ नये, यासाठी नासा विशेष कॉन्टॅक्ट लेन्स, द्रवपदार्थाचा दाब कमी करण्यासाठी औषधे आणि रक्ताभिसरण सुधारण्यासाठी व्यायामाच्या दिनचर्यांसह उपायांचा शोध घेत आहे. ते डोळ्यांसाठी पृथ्वीसारख्या दाबाची नक्कल करण्यासाठी 'व्हिज्युअल इम्पेअरमेंट इंट्राक्रॅनियल प्रेशर चेंबर' (व्हीआयआयपी) नावाच्या उपकरणाची देखील चाचणी करत आहेत. ◂(वृत्तसंस्था)

## अग्रलेख...

# न्यायाची पुढची लढाई तरी नीट लढा!

गेल्या असंख्य पिढ्यांपासून महाराष्ट्रातील आणि देशातीलही लाखो कुटुंबांच्या घरात गुरुपौर्णिमेचा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. सुमारे १९ वर्षांपूर्वी ११ जुलै २००६ या दिवशीही हा सोहळा अनेक घरांत भाविकतेने साजरा होत होता, उत्सवाचा आनंद घराघरांत ओसंडत होता आणि अचानक त्या आनंदावर विरजण पडले. मुंबईची जीवनवाहिनी असे ज्याचे वर्णन केले जाते, त्या उपनगरी रेल्वेच्या गाडीत प्रचंड गर्दीच्या वेळी भीषण बॉम्बस्फोट घडले आणि १८७ निरपराध जीव काही क्षणांतच अनपेक्षितपणे भूतकाळात जमा झाले. तेव्हापासून पुढे दरवर्षी गुरुपौर्णिमेच्या दिवशी मुंबईतील अनेक घरांमधील आपल्या जिवलगाच्या उणिवांच्या जाणिवा जाग्या होतात. त्या घरांमध्ये गुरुपौर्णिमेचा सोहळा साजरा होत नाही, तर गमावलेल्या जिवाच्या स्मृतींना श्रद्धांजली अर्पण करणारे श्राद्धविधी पार पडतात. अगदी १०-१२ दिवसांपूर्वी, १० जुलै रोजीच्या गुरुपौर्णिमेच्या दिवशीही त्या घरांतील गमावलेल्या जिवाच्या आठवणींचा उमाळा येऊन दुःखाला वाचा फुटली. त्याच दिवसाच्या आठवणी ताज्या झालेल्या असताना सोमवारी न्यायालयाच्या एका निर्णयाने या दुःखाला नवा धक्का दिला. उपनगरी रेल्वेगाडीत भीषण बॉम्बस्फोट घडवून १८७ जणांच्या अनपेक्षित आणि अकाली मृत्यूस कारणीभूत ठरल्याच्या आरोपावरून गेली सुमारे १९ वर्षे तुरुंगात असलेल्या १२ आरोपींची मुंबईच्या उच्च न्यायालयाने तपास यंत्रणांच्या बेफिकीर ढिसाळपणावर बोट ठेवत सोमवारी निर्दोष मुक्तता केली. ११ जुलै २००६ रोजी सुरू झालेल्या एका न्यायालयीन लढाईतून निरपराधांच्या मृत्यूला न्याय देण्याच्या एका न्यायालयीन संघर्षाने अनपेक्षितपणे घेतलेल्या या वळणामुळे अनेकांना धक्का बसला आहे. तपास यंत्रणांच्या कुचकामीपणावर बोट ठेवून न्यायालयाने आरोपींच्या मुक्ततेचे आदेश दिल्याने, गुन्हेगारीच्या आरोपातून ते मुक्त झाले असले, तरी बॉम्बस्फोट घडविणाऱ्या गुन्हेगारांना त्यांच्या कृत्याची सजा होऊन मृतांना न्याय मिळवून देण्याची लढाई अजून संपलेली नाही. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशास राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. आता हा संघर्ष नव्या टप्प्यावर पुन्हा सुरू झाला आहे, त्यामुळे अंतिम न्याय मिळेपर्यंत तो संपू नये, ही त्या दुर्दैवी घटनेतील मृतांच्या सुहृदांची अपेक्षा नव्या उमेदीने जिवंत राहणार आहे.

दहशतवादाच्या कोणत्याही कृत्यास दयामाया नाही, प्रत्येक दहशतवादी कारवाईला तडाखेबंद जबाब दिला जाईल, असा मोदी सरकारचा निर्धार आहे. जेव्हा जेव्हा देशात दहशतवादी कारवायांनी डोके वर काढले, तेव्हा त्या विरोधातील शून्य सहनशीलता धोरणाचा अवलंब करून त्या कारवायांचा पुरेपूर बदला घेतला गेला. २००६ मध्ये घडविल्या गेलेल्या भीषण बॉम्बस्फोटात बळी पडलेल्यांच्या कुटुंबांनाही याच धोरणाची अपेक्षा होती. त्यामुळे त्या दहशतवादी कारवाईतील गुन्हेगारांना त्यांच्या कृत्याची ठोस सजा मिळेल व आपल्या गमावलेल्या जिवलगांना त्यांच्या पश्चात तरी न्याय मिळेल या अपेक्षेने ही कुटुंबे उच्च न्यायालयाच्या त्या निर्णयाची डोळ्यात प्राण आणून प्रतीक्षा करत होती. पण न्यायालये निष्पक्ष असतात. समोर असलेला घटनाक्रम, त्यास पुष्टी देणारे किंवा त्या घटनेशी संबंध नसल्याचे दावे करणारे पुरावे, साक्षीदार, कागदपत्रे किंवा आरोप सिद्ध करणारे वस्तुनिष्ठ आणि परिस्थितिजन्य पुरावे या सर्वांची सखोल छाननी करून हे सारे न्यायदेवता न्यायाच्या पारड्यात टाकले जाते आणि त्यानुसार निर्णय घेतला जातो. आता तर, न्यायदेवतेच्या डोळ्यावरील पट्टीदेखील काढली गेली आहे. सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्तींच्या दालनांतील न्यायदेवतेच्या डोळ्यांवर पूर्वी पट्टी बांधलेली असायची. एका हातात न्यायाचा तराजू आणि दुसऱ्या हातात तलवार घेतलेल्या न्यायदेवतेच्या प्रतीकात्मक मूर्तींच्या डोळ्यावरील ती पट्टी हटविली गेली आहे आणि हातातील तलवारीच्या जागी संविधानाची प्रत घेऊन न्यायदेवता उभी राहिली आहे. न्यायव्यवस्थेतील नव्या बदलानुसार, आता दंड संहितेची जागा न्यायसंहितेने घेतली आहे. कोणत्याही गुन्ह्यातील आरोपीस गुन्हेगार ठरवून शिक्षा देणे ही कायद्याची भूमिका नाही, तर गुन्हेगारीचा आरोप असलेल्यावर अन्याय होणार नाही, अशी नव्या न्यायसंहितेची इच्छा आहे. बॉम्बस्फोटाच्या त्या कृत्याच्या आरोपातून या आरोपींची मुक्तता झाली असली, तरी त्या दिवशी उपनगरी गाडीत झालेले बॉम्बस्फोट ही काही नैसर्गिक आपत्ती नव्हती. दहशतवादी कृत्य करून निरपराधांचे जीव घेण्याच्या उद्देशाने पुकारलेले एक छुपे युद्धच होते, हे स्पष्ट आहे. १९ वर्षे तुरुंगवासात असलेले व या कृत्याच्या आरोपावरून शिक्षा भोगणारे १२ जण आता निर्दोष म्हणून मोकळे फिरणार असले, तरी हा गुन्हा घडविला गेलेला आहे, ही बाब निर्विवाद आहे. विशेष न्यायालयाने या १२ जणांपैकी पाच जणांना फाशीची व सात जणांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली होती. न्यायसंहितेनुसार, विशेष न्यायालयाने सुनावलेल्या शिक्षेवर उच्च न्यायालयाचे शिक्कामोर्तब होणे जरुरीचे असते. त्यासाठी राज्य सरकारतर्फे उच्च न्यायालयात धाव घेतली गेली. आरोपींच्या वतीनेही या शिक्षेविरोधात याचिका दाखल करण्यात आली होती. गेल्या वर्षीच्या जुलैपासून सुरू असलेल्या या खटल्यासंदर्भात जवळपास ७५ सत्रांत सुनावणी झाली. सुमारे दीडशे साक्षी नोंदविण्यात आल्या. गुन्ह्याच्या आरोपांस पुष्टी देणारे पुरावे जवळपास १६९ खंडांमध्ये सादर करण्यात आले आणि विशेष न्यायालयाच्या सुमारे दोन हजार पानांच्या निकालपत्राचे पुनरावलोकन करण्यात आले. बॉम्ब बनविणे, रेल्वेगाडीत ठेवणे यासाठी विशेष प्रशिक्षण घेतल्याची कबुली आरोपींनी दिल्याचा तपास यंत्रणांच्या दाव्यावर उच्च न्यायालयाने प्रश्नचिन्ह उमटविले आहे.

आरोपींकडून कबुलीजबाब घेण्यासाठी तपास यंत्रणांनी शारीरिक व मानसिक छळ केल्याचा बचाव पक्षाचा दावा न्यायालयाने मान्य केल्याने, तपास यंत्रणांना मोठी चपराक बसली आहे. गुन्हा घडल्यानंतर आरोपींना अटक करण्यात आली असली, तरी त्याबाबत तातडीने काहीच वक्तव्य न करता, तीन महिन्यांनंतर मकोका लागू होताच आरोपींनी कबुली दिली, ही बाब संशयास्पद असल्याचा दावाही बचाव पक्षातर्फे करण्यात आला होता. साक्षीदारांच्या प्रामाणिकपणावरही उच्च न्यायालयाने शंका व्यक्त केली आहे. वापरलेली स्फोटके किंवा त्यांची वाहतूक करण्यात आल्याबाबतचा कोणताही ठोस पुरावा तपास यंत्रणा देऊ शकल्या नाहीत, असेही न्यायालयाने नोंदविले आहे. आरोपींचा स्फोटाच्या कारवाईशी थेट जोडणारी कोणतीही शस्त्रे किंवा साहित्य सापडले नसल्याने फिर्यादी पक्ष तपासात पूर्णपणे अपयशी ठरला असून फिर्यादी पक्षाकडून तयार करण्यात आलेले कथानकच संशयास्पद असल्याचे नमूद करत न्यायालयाने दिलेला हा निर्णय धक्कादायक असला, तरी या संदर्भातील न्यायालयाकडून असलेल्या अपेक्षेनुसारच आहे. त्यामुळे आता नव्याने सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागताना राज्य सरकारला उच्च न्यायालयाची ही निरीक्षणे गंभीरपणे ध्यानात घ्यावी लागतील. तपास यंत्रणांचा ढिसाळपणा ही अनेक प्रकरणांत न्यायालयासमोर उघडी पडणारी बाजू या प्रकरणातही समोर आली असून तपासातील गांभीर्याच्या अभावामुळे गुन्हेगार मोकळे सुटत असतील, तर अशा गुन्ह्यांमुळे ज्यांना फटका बसतो, त्यांच्यावर अन्याय केल्यासारखे होईल. या प्रकरणात गुन्हा सिद्ध करता न आल्याने गुन्हेगारांना मुक्त करण्यात आले आहे. मात्र, रेल्वेगाडीत बॉम्बस्फोट घडवून अनेकांच्या मृत्यूस व अनेकांच्या शरीरावर व मनावर जन्मभराची जखम उमटविणारे हे कृत्य म्हणजे विघातक व दहशतवादी कारवाईच असल्याचे स्पष्ट असल्याने गुन्हा सिद्ध करून गुन्हेगारास शासन होईल एवढा सज्जड ऐवज न्यायव्यवस्थेसमोर मांडणे ही तपास यंत्रणांची जबाबदारी ठरते. उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे आरोपींना ठोठावलेली शिक्षा रद्द झाली असली, तरी केवळ पुरेशा पुराव्यांअभावी आणि तपासातील ढिसाळ कार्यपद्धतीमुळे न्यायालयाने न्यायाचा तराजू तोलला आहे. सर्वोच्च न्यायालयासमोर नव्याने सुरू होणाऱ्या न्यायाच्या लढाईत या बाबी लक्षात घेतल्या जातील, ही अपेक्षा करावयास हरकत नाही.

## प्रासंगिक

# लोकमान्य टिळक आणि कर्मयोग

**डॉ. विलास चिंतामण देशपांडे**

आपल्याला ज्या आर्यजननीने जन्म दिला तिची ब्रिटिशांनी नागविलेली स्थिती ही लोकमान्यांच्या आंदोलनास प्रेरणादायक ठरली होती. त्यांच्या बालवयात गणेश वासुदेव जोशी ऊर्फ सार्वजनिक काका यांच्या व्याख्यानांनी, विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या स्वदेशाभिमानाने आणि स्वत:मधील प्रखर देशभक्तीच्या जाणिवेने त्यांना देशसेवेस आपली विद्वत्ता व आयुष्य खर्ची घालण्याची प्रेरणा मिळाली.

लोकमान्यांची स्मरणशक्ती प्रचंड व ज्ञान ग्रहण करण्याची वृत्ती दांडगी होती. म्हणूनच त्यांचे काट्यांनी भरलेले देशोद्धाराचे विश्वव्यापी प्रयत्न सुरू असताना त्यांनी इतिहास संशोधन, पंचांग संशोधन, वैद्यक संमेलन इत्यादी कार्य केले. त्यांची सर्वांत गोड कामगिरी ग्रंथ कर्तृत्व आणि सर्वांत भरीव व पोषक सर्वोपयोगी कामगिरी राजकीय चळवळ व लोकजागृती ही होय. ओरायन ऊर्फ अग्रहायणाचा विषय वेदाचा कालनिर्णय ठरविण्याचा होता. याच विषयावरून सुचलेला विषय जो आर्यांचे मूलस्थान, त्याचे विवरण त्यांनी आपल्या 'आर्यलोकांचे मूलस्थान' या ग्रंथात केले आहे. हे दोन्ही ग्रंथ त्यांच्या प्रगाढ संशोधन वृत्तीची साक्ष देतात. त्यांचा तिसरा व अत्यंत महत्त्वाचा व सर्वांना उपयोगी ग्रंथ म्हणजे भगवद्गीता रहस्य ऊर्फ कर्मयोगशास्त्र हा होय. त्याचा जरा तपशिलात जाऊन विचार करायला हवा.

'स्वराज्य हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे' हे लोकमान्यांचे तत्त्व. त्याचा उच्चार करण्यास सुरुवातीस प्रतिबंध होता. त्यामुळेच 'स्वराज्याचे' स्थान त्यांच्या हृदयात खोल घट्ट जम बसवून होते. ते मिळविण्यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले. परंतु स्वराज्य हे काही नुसत्या जपाने मिळत नाही. सर्व हिंदुस्थानच्या संयुक्त बळाची त्याला गरज होती आणि परिस्थिती तर विपरीत होती. सगळीकडे असंघटन, विस्कळीतपणा पसरला होता. स्वराज्य नाहीसे झाल्यानंतर सर्व लोकांतील आत्मप्रत्यय नाहीसा झाला होता. वाघिणीचे दूध म्हणून ज्या इंग्रजी विद्येस म्हणतात त्या विद्येचा असह्य प्रकाशाने नवशिक्षित तरुण दीपून जाऊन भान विसरले होते आणि इंग्रजांनी जे इथे आणले तेच ज्ञान उत्तम आणि येथील विद्या टाकाऊ अशी त्यांची धारणा झाली होती. पाश्चात्त्यांच्या उद्योगप्रियतेने त्यांना भारून टाकले होते. अशा आणि इतर अनेक कारणांनी हिंदुस्थानातील लोकांनी आपले उद्योग, आपली विद्या आपले सर्वस्व कुठलाही प्रतिकार न करता ब्रिटिशांकडे गहाण टाकले होते. सारा हिंदुस्थान कर्तव्यमूढ आणि



अगतिक झाला होता. एकूणच या स्थितीची टिळकांना कीव येत होती. तेव्हा कर्तृत्वशक्तीतच आपला तरुणोपाय आहे त्यातच येथील लोकांची पर्यायाने देशाची उन्नती आहे हे त्यांच्या विचारांती लक्षात आले.

त्यासाठी येथील मंडळींना यथोचित शिक्षित करून कार्यक्षम बनविणे हे त्यांनी मनाशी पक्के केले. या धोरणाला अनुसरून त्यांनी विष्णुशास्त्री यांच्या न्यू इंग्लिश स्कुलात आपला शिरकाव करून घेतला आणि राष्ट्रोपयोगी शिक्षण देण्याचे काम सुरू केले व नंतर ही व्यवस्था नीट लागल्यावर ती दुसऱ्यावर सोपवून त्यांनी लोकांना आपल्या कर्तव्याची जाणीव व कार्यक्षमता जागरूक करण्याच्या हेतूने कर्मयोगशास्त्र नावाचा भगवद्गीतेवर ग्रंथ लिहून लोकार्पित केला. त्या काळात या ग्रंथाने लोकजागृतीचे काम मोठ्या प्रमाणात केले होते.

महाराष्ट्राचा इतिहास लिहिताना महाराष्ट्रीय संतांनी राष्ट्रजागृतीची मोठी कामगिरी केली असे म्हटले जाते. मात्र ही गोष्ट सर्वथा खरी नाही. ज्ञानोबांनी बहुतांशी (निवृत्तिपर) ज्ञानेश्वरीकडे, तुकोबांनी (भक्तिपर) पंढरीकडे बाकी बहुतेक संतांनी निवृत्तीकडेच लोकांचा ओघ वळविला होता. त्याचा परिणाम लोकांस दैववादी करण्याकडे झाला. त्यामुळे आपल्या ऐहिक कल्याणाकडे व हक्काकडे दुर्लक्ष झाले. नाही म्हणायला वामन पंडित, सद्गुरू श्रीपाद वल्लभ आणि समर्थ रामदास यांनी लोकांना कर्मयोगाचा धडा दिला. परिणामी लोकांनी औरंगजेबास महाराष्ट्रात प्रवेश करू दिला नव्हता परंतु ही जागृती फार काळ टिकली नव्हती. लोकांमध्ये पुन्हा राष्ट्रभक्तीचे तेज प्रज्वलित करण्याचे काम टिळकांच्या कर्मयोगशास्त्र या ग्रंथाने केले.

भगवद्गीतेकडे अनेक विद्वानांनी वेगवेगळ्या दृष्टीने पाहिलेले आहे. कोणास ती ज्ञानपर दिसते तर कोणास तीत वासुदेव भक्ती, कोणास मोक्षदायिनी, तर कोणास पातंजल योगप्रदान वगैरे वगैरे. विविध विद्वानांना गीता अशी का वाटते याचे मुख्य कारण निरनिराळ्या आचार्यांच्या वेगवेगळ्या संप्रदायाच्या गीतेवरील भाष्य व टीकालेखनात आहे असे टिळकांना वाटत होते. विद्वानांनी गीतेवर प्रकट केलेली विविध मते विचारात घेतल्याने बुद्धी भ्रमित होऊन गोंधळ होण्याचा संभव असल्याने ही सारी मते बाजूला करून मूळ गीतेवरच चिंतन केल्याने आपले म्हणणे लोकांपर्यंत थेट पोहोचविता येईल असे त्यांना वाटले. त्यामुळे गीता ऐकल्यानंतर अर्जुनावर जसा कर्तव्यकठोर होण्याचा परिणाम झाला तसाच तो येथील लोकांवर स्वच्छपणे साधता येईल हाच गीतेचा खरा समजण्याचा राजमार्ग आहे असे टिळकांचे मत बनले.

टिळकांनी गीतेचा अर्थ समजण्याकरिता वयाच्या १६ व्या वर्षापासून प्रयत्न सुरू केले होते. अखेर मंडालेच्या एकांतवासात त्यांच्या तपश्चर्या पूर्ण होऊन त्यास खऱ्या अर्थाचा साक्षात्कार झाला. उठा जागे व्हा आणि (भगवंताने दिलेले) हे 'वर' समजून घ्या असा सल्ला त्यांनी होतकरू जनतेला दिला. यातच उन्नतीचे, मोक्षाचे, स्वराज्याचे बीज आहे आणि हेच गीतेतील रहस्य आहे, भगवान श्रीकृष्णाचे आश्वासन आहे हे त्यांनी जनतेस पटवून दिले. देशकालानुसार अंगीकृत केलेले कर्म प्रत्येकाने केलेच पाहिजे असे गीतारहस्यात सांगितले आहे. ते निष्काम असल्याने चित्तशुद्धीचे मोठे साधन आहे. ज्ञान, संन्यास, कर्म व भक्ती यांच्या योग्य मिलापाने इहलोकी आयुष्यात कोणता मार्ग स्वीकारायचा त्याप्रमाणे सर्व पंथांच्या लोकांचा संग्रह करून आपल्या कार्यकर्तृत्वाची वाट दाखवून आपल्यातील निष्क्रियतेला पूर्णविराम देण्यास बाध्य करणे, त्यायोगे जनसमूहाची शक्ती एकवटून राष्ट्रकार्यास कामी लावणे हेच लोकमान्यांना सांगायचे होते. त्यांचा हाच उपदेश आपण आज आचरणात आणायला हवा.

९९६००३११४८

## वेध

**विजय निचकवडे**

# रमीत रमलेले 'माणिक'

आम्ही शाळेत जायचो ना, तेव्हा एखाद्या विषयाचा वर्ग सुरू होताच हाताच्या मनगटावरच घड्याळ मिनिटा-मिनिटाला पाहण्याची सवय होती. एकदा शिक्षकांचा ओरडा पडला अन् हाताचं घड्याळ कायमचं निघून गेलं. आता याचा आणि लिखाणाचा काय संबंध, असं आलं असेलच डोक्यात! हे एवढ्यासाठीच की, एखाद्याने एखादी चूक लक्षात आणून दिली की, सुधारली जाऊ शकते. पण कदाचित राजकारण्यांना हे लागू नसावे. आता माणिकरावांचेच पहहा ना, अत्यंत संवेदनशील आणि तेवढ्याच महत्त्वाच्या विभागाचे मंत्री आहेत, पण कायम वादाच्या भोवऱ्यात असतात. समज दिलीही जात असेल, पण ते समजून घ्यायचंच नाही, असा निर्धार त्यांचा असावा! नाहीतर रमीत रमलेले माणिकराव पाहण्याची वेळ आमच्यावर कशाला आली असती! सभागृहात जिथे राज्याच्या कल्याणाचे निर्णय होतात, लोकांच्या व्यथा मांडल्या जातात, त्या ठिकाणी ही असंवेदनशीलता नक्कीच चिंतेचा विषय ठरतो. अप्रत्यक्षपणे याची झळ आपसूकच शासनकर्त्यांनाही बसते. आमच्या लोकप्रतिनिधींकडून अनेक अपेक्षा आहेत. आमच्या व्यथा मांडण्यासाठी त्यांना सभागृहात आम्ही पाठवितो. सामान्यांचा आवाज तेथे उजागर करून कल्याणकारी निर्णयातून समाजाचे भले व्हावे, अशी माफक अपेक्षा या मागची असते. पण आज ही परिस्थिती पाहायला मिळते, ते पाहून राजकारण कुणीकडे चालले असे वाटते. राजकारणातून समाजकारण म्हटले जाते. मात्र जो जोर समाजकारणावर दिला जायला हवा, तो दिला जात नाही. कदाचित लोकांनाही आता खास अपेक्षा राजकारण्यांकडून राहिल्या नसाव्यात. कारण राजकारणात नित्याने जे काही पुढे येत आहे, ते पाहून लोकांपेक्षा स्वहित, आपली प्रतिष्ठा, एकमेकांवर कुरघोडी हाच राजकारण्यांचा धर्म झाला की काय, असे वाटू लागते. याला अपवाद अनेक आहेत; जे अपवाद आहेत, त्यांच्याकडेही पाहण्याचा दृष्टिकोन अशा लोकांमुळे बदलतो, हे तेवढेच खरे!

विधानभवनाला आम्ही लोकशाहीचे मंदिर म्हणून संबोधतो, पण तेथे काय तर वेगवेगळ्या आमदारांकडून एकमेकांवर शाब्दिक चिखलफेक पाहायला मिळते. यापुढे जात आता एकमेकांच्या कार्यकर्त्यांना हाणामारी, आमदार एकमेकांना वाहत असलेल्या शिव्यांची लाखोळी या प्रकारामुळे असे आमदार खरंच आपले प्रतिनिधित्व करण्यास समर्थ आहेत का? असा प्रश्न निर्माण होतो. आता तर राज्याच्या मंत्र्यांचा एक प्रताप पुढे आला आहे. कृषीसारख्या अत्यंत संवेदनशील विभागाचे मंत्री असलेल्या माणिकराव कोकाटे हे चक्क सभागृहात मोबाईलवर जंगली रमी खेळतानाची चित्रफीत व्हायरल झाली आणि हा विषय प्रचंड तापला. मंत्री माणूस आहे, कधी तरी त्यालाही गेम खेळण्याचा मोह होऊ शकतो; मात्र तो कुठे खेळला पाहिजे, याचेही तारतम्य बाळगायला नको का? विधान परिषद सभागृहात प्रश्नोत्तरांचा तास सुरू असताना रमीत रमलेले माणिकराव सध्या चांगलेच अडचणीत आले आहेत. ढेलकांचे पंचनामे करायचे का? कर्जमाफीच्या पैशातून शेतकरी लग्न, साखरपुडे करतात अशा व्यक्तव्यांमुळे आधीच ते लोकांच्या आणि पक्षनेतृत्वाच्या नजरेतून काही अंशी उतरले. आता रमीच्या नादात आणखी अडचणीत आले आहेत. या आधी त्यांना समज दिली असावीच; मात्र ते मंत्री आहेत. मग कुणी सांगायचं आणि त्यांनी ऐकायचं असं होईल का? म्हणून कदाचित त्यांनी रमीचा डाव मांडून पाहिला असावा? पण पत्ते उलटे पडले. कृषी खाते ग्रामीण भागाशी नाळ जुळवून ठेवणारे आहे. शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा हा विषय असल्याने त्या विभागाच्या मंत्र्यांनी तेवढे संवेदनशील राहणे अपेक्षित आहे. नाहीतर देशाचे कृषी मंत्री असलेल्या शिवराज सिंह चव्हाण यांनी कशाला पावसात बाजार समिती आवारातून धान्य वाहून गेलेल्या महाराष्ट्रातील वाशीम जिल्ह्यातील गौरव नावाच्या एका शेतकऱ्याला स्वत: फोन करून त्याचे सांत्वन केले आणि मदत देण्याचे स्पष्ट करीत धीर दिला असता! ते तर देश सांभाळतात, तरी त्यांना महाराष्ट्रातील एका शेतकऱ्याची व्यथा पाहून राहवले नाही! देशाचे कृषी मंत्री आपल्या वागण्या-बोलण्यातून एक आदर्श निर्माण करू शकतात तर राज्याच्या मंत्र्यांनी त्या वाटेने का जाऊ नये! खरं तर माणिकराव कोकाटेंना मंत्रिपद दिलं गेलं ते, ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना डावलून. इतक्या मोठ्या प्रमाणात विश्वास टाकून पक्षनेतृत्वाने जर एक महत्त्वाचं खातं आपल्याकडे सोपविलं असेल तर त्या खात्याचे महत्त्व जपणे काम कुणाचे? गोष्टी काही दिवस चर्चेत राहतील आणि संपतील. तसाच रमीचा गेमही काही दिवसांनी लोक विसरतील. पण मंत्री म्हणून शेतकऱ्यांसाठी केलेली सकारात्मक कामे कायम स्मरणात राहतील. त्यामुळे वादग्रस्त होण्यापेक्षा वादापासून दूर राहणारे मंत्री म्हणून स्वत:ची ओळख निर्माण करण्यास हरकत काय? आज रमीचा हा गेम राज्याचे कल्याण करण्यासाठी पुढे पावले टाकीत असलेल्या सरकारवरही शिंतोडे उडविण्यास पुरेसे आहे. अशावेळी रमीत रमलेल्या माणिकरावांना शिकण्याशिवाय पर्याय नाही!

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# श्री गीता : पहिला अध्याय 'अर्जुनविषादयोग'

**प्रा. दिलीप जोशी**

श्रीमद्भगवद्गीता हा भारतीय संस्कृतीचा पाया आहे. अठरा अध्याय असलेली गीता भक्तियोग, कर्मयोग, ज्ञानयोग, सांख्ययोग असे विविध योग आपल्याला सांगते. श्री गीतेचा पहिलाच अध्याय 'अर्जुनविषादयोग' नावाने संबोधित आहे. योगाचे कोणतेही ग्रंथ धुंडाळून पाहा. इतर सर्व योग प्राचीन योगशास्त्रात आहेत; पण विषाद नावाचा योग आपल्याला कुठेच, कोणत्याही योगाच्या ग्रंथात आढळत नाही. तरीही श्रीगीतेच्या पहिल्याच अध्यायाला श्री व्यासांनी 'अर्जुनविषादयोग' असे का नामाभिधान केले असेल? खरं तर पहिल्या अध्यायाविषयी मला नेहमीच कुतूहल वाटते. श्री गीता सांगितली भगवंतांनी, पण सुरुवात त्यांनी केली नाही. 'धृतराष्ट्र उवाच'ने श्री गीतेचा प्रारंभ म्हणजे दुष्टात्मा धृतराष्ट्र यांनी केला. ज्याचे तोंड पाहू नये त्याचे नाव प्रारंभीच उच्चारावे लागते. असे का? दुसरे म्हणजे पहिल्या अध्यायात पूर्ण अध्यायभर अर्जुन नकारात्मकतेने ग्रासलेला दिसतो. एवढा नितांतसुंदर तत्त्वज्ञानी ग्रंथ, पण सुरुवात अशी नकारात्मक का? हेही कुतूहलच आहे. आज त्याचाच विचार आपण करू.

'विषाद' हा संस्कृत शब्द असून उदासीनता, निरुत्साह, निरसता, निस्तेज, शोक आणि दु:ख असा त्याचा अर्थ होतो. ही आपली मनोअवस्था आहे. यालाच अंतर्मनाची खिन्नता म्हणतात. या अस्वस्थ अवस्थेत कशातच मन लागत नाही. विषाद स्थितीत कोणतीच साधना, अनुष्ठान, अर्चना होऊ शकत नाही. मनाची ही अवस्था कोणालाच नको. कारण विषाद आपल्यातला आनंद नष्ट करतो. म्हणून शक्यतो ही मानसिक स्थिती टाळण्याचा सर्वांचा प्रयत्न असतो. तरीही भगवान व्यासांनी याला विषादयोग म्हटले आहे.

बरं, व्यासांचे कुठलेच शब्द निरर्थक, अकारण नसतात. विषादयोग या शब्दामागेही त्यांचा कुठला तरी हेतू सुनिश्चित आहे. युद्धभूमीवर आल्यावर अर्जुनाने भगवंताला आपला रथ दोन्ही सेनांच्या मध्ये नेण्यास सांगितला आणि त्याची नजर सर्वांवर पडताच तो मोहग्रस्त झाला.

**जेणें संग्रामीं हरु जिंतिला । निवातकवचांचा ठावो फेडिला ।**
**तो अर्जुन मोहें कवळिला । क्षणामाजीं ॥**

त्याचा अहंभाव, अज्ञान आणि ममत्व जागे झाले. भावनांचा अतिरेक होऊन तो मोहग्रस्त आणि शोकाकुल झाला. यालाच विषाद म्हणतात. विषाद झालेल्या अर्जुनाची शक्ती क्षय होऊन तो गलितगात्र झाला. बऱ्याचदा जीवनात आपल्या कुणालाही ही अवस्था सहजपणे येते. त्यासाठी कोणतेही विशेष प्रयास करण्याची गरज नसते. उदा. वाईट बाबींसाठी प्रयत्न करावे लागत नाहीत, त्या आपोआप जडतात. चांगल्या बाबींसाठी मात्र जाणीवपूर्वक झटावे लागते. भगवान व्यासांनी विषादयोग म्हटले. कारण विषाद अनुभवल्याशिवाय निखळ आनंदाचे महत्त्व कसे कळणार? एखाद्याला कोंडून ठेवले तरच त्याला



सुटण्याचा प्रयत्न आणि बाहेर मोकळेपणाचा आनंद मिळणार आहे. साखरेचे महत्त्व कडू गोळी खाल्ल्यावरच समजते. नेमके अर्जुन युद्धाच्या प्रारंभीच मोहग्रस्त झाला म्हणून तर सर्वांगसुंदर श्रीमद्भगवद्गीता उदयास आली आणि त्याच्या ठायी असलेला मी पणा नष्ट झाला.

साधक साधना करतो तेव्हा त्याचे मन उदासीन, खिन्न आणि निराश असेल तर साधना सिद्ध कशी होईल? जमिनीत अंकुर फुटायचा असेल तर त्यासाठी जमीन तयार करणे आवश्यक आहे. तेच मानसिक अवस्थेचे आहे. विषाद प्राप्त झालेल्या अर्जुनाच्या मनातील संभ्रम काढण्यासाठी भगवंताला 'नित्यनूतन असे गीतातत्त्व' सांगावे लागले.

'तो स्वये सर्वेश्वरू प्रत्यक्ष अनुवादीला' यासाठी प्रमुख कारण ठरला तो अर्जुन विषाद. अर्जुनाच्या विषादामुळेच 'स्वमुखे आपण सांगे तो श्रीविष्णू, श्रीगीता हा प्रश्नु अर्जुनेशी' म्हणूनच श्री गीता निर्माणाचे कारण अर्जुनाचा विषाद असल्यामुळे विषादालाही योगत्व प्राप्त झाले. प्रत्यक्ष परमेश्वर सोबत असूनही अर्जुन मोहमायेत गुंतला तिथे आपले काय?

**'आचार्याः पितरः पुत्रास्तथैव च पितामहाः ।**
**मातुलाः श्वशुराः पौत्राः श्यालाः सम्बन्धिनस्तथा ॥**
**ऐसियांतें कैसेनि मारूं? । कवणावरी शस्त्र धरूं?।**
**निजहृदया करूं । घातु केवीं?॥'**

असे म्हणणारा अर्जुन अनेक शंकाकुशंका, अनेक प्रश्नांनी रोमांचित होतो.

**सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति ।**
**वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते ॥**

त्यातून निर्माण होते गीतातत्त्व.

**गुंतलो होतो अर्जुनगुणे, मुक्त जाहलो तुझिया गुणे**
**आता सांगणे पुसणे, काहीच न लगे!**

गीता ऐकल्यावर तो परिपूर्ण अवस्थेपर्यंत येतो.

पहिल्या अध्यायात सांगितलेला अर्जुनगुण म्हणजे अर्जुन विषादयोग आहे. या अध्यायाचे अजून एक वैशिष्ट्य आहे की, विषाद अवस्थेत अर्जुनाने भगवंताला संबोधित करताना विशिष्ट ठिकाणी विशिष्ट नामोल्लेख केला आहे. अच्युत, कृष्ण, केशव, मधुसूदन, जनार्दन अशी ती कार्यस्वरूप संबोधन आहेत. अच्युत म्हणजे जो आपल्या स्व स्थितीपासून कधीही ढळला नाही. कृष्ण म्हणजे सर्व जीवमात्रांचे आनंदस्वरूप आश्रयस्थान, केशव म्हणजे केशी राक्षसाचा वध करणारा, मधुसूदन म्हणजे मधू नावाच्या राक्षसाचा नि:पात करणारा, जनार्दन म्हणजे जगत्पालक परमात्मा होय.

इथे अर्जुनाला स्पष्ट करायचे की, हे भगवंता, केशवा, मधुसूदना, तू ज्यांचा वध केला ते केशी आणि मधू राक्षस तुझ्यासाठी परके होते. माझ्या समोर मात्र माझे स्वकीय आहेत. तूच आनंदस्वरूप आणि सर्वांचे निवासस्थान असलेला तू युद्धासाठी कसा सिद्ध होतो. अर्जुनाची विषाद अवस्था असली, तरी अर्जुन त्याही स्थितीत चतुरपणे देवाला पटवून देण्यासारखे प्रश्न विचारतो. 'जेथ चातुर्य शहाणे झाले' चातुर्याला शहाणपण यावे, अशी तो शंका विचारतोय.

**'न काङ्क्षे विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च ।**
**किं नो राज्येन गोविन्द किं भोगैर्जीवितेन वा ॥'**

कोणत्याही स्थितीत भगवंतांनी त्याला म्हणावे की, 'बरं राहू दे युद्ध ! सोड युद्धभूमी!' पण भगवंत ते! ते उपदेशाने परिवर्तन तर करणारच! असो. पहिल्या अध्यायात स्थान वर्णन, योद्ध्यांची नावे, वाद्यांची नावे, शंखांची नावे असे सगळे वर्णन आहे. श्रीकृष्ण अर्जुनाचा संवाद व्यासांनी महाभारतात दिला आहे. श्री गीता ध्यान मंत्रात हे सुंदर वर्णन आहे.

**'ॐ पार्थाय प्रतिबोधितां भगवता नारायणेन स्वयं**
**व्यासेन ग्रथितां पुराणमुनिना मध्ये महाभारतं ।**
**अद्वैतामृतवर्षिणीं भगवतीमष्टादशाध्यायिनीं**
**अम्ब त्वामनुसन्दधामि भगवद्गीते भवद्वेषिणीं ॥१॥'**

विषादयोग आपल्याला अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारा आहे. मनाच्या खिदन अवस्थेकडून आनंद अवस्थेकडे नेणारा हा अध्याय आहे. अर्जुनाचा अर्जुन गुण म्हणजे अर्जुनाची मोहग्रस्त स्थिती. त्यातूनच त्याची झालेली मनोवस्था म्हणजे विषाद. हा विषादच भगवान श्रीकृष्णाच्या तोंडून जगाचे सर्वांगसुंदर तत्त्वज्ञान श्रीमद्भगवद्गीता निर्मितीचे कारण ठरला. म्हणून विषाद असून विषादयोग म्हटले आहे.

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस २२ तारखेला झाला. आपल्या वाढदिवशी कोणीही बॅनर, पोस्टर, जाहिराती छापू नयेत, याची दरवर्षी काळजी घेतात, तशी ती यावर्षीही घेतल्याचे दिसते. हे त्यांचे वेगळेपण ठरावे. खरे तर असे वेगळेपण जोपासणे हे त्यांचे वैशिष्ट्य ठरते. हे ते मुद्दाम करतात असे नाही तर ते ज्या विचार



परिवारातून येतात, तो विचार ते सहजतेने जगतात. ते राजकारणात असूनही कमी व मुद्देसूदच बोलतात. त्यामुळेच बोललेले शब्द किंवा वाक्य परत घेण्याची वेळ त्यांच्यावर येत नाही किंवा माझ्या बोलण्याचा विपर्यास केला गेला असे स्पष्टीकरण त्यांना कधी करावे लागत नाही. राजकारणात असल्यामुळे आपण सर्वज्ञानी आहोत असे न समजता, कुठल्याही विषयाचा सखोल अभ्यास करूनच ते बोलतात. राजकारणात मुख्य स्थानी असूनही त्यांनी आपल्या पुढच्या पिढ्यांची सोय करण्यासाठी कुठल्याही संस्था निर्माण केल्या नाहीत, उलटपक्षी नागपुरात एक दोन अतिशय चांगल्या संस्थांची निर्मिती करून आपल्या सहकाऱ्यांना त्या चालवण्यासाठी सुपूर्द केल्या. स्वतः निर्माण केलेल्या संस्था दुसऱ्यांना सुपूर्द करणे हे राजकारणातील व्यक्तींना जमतेच असे नाही. उलटपक्षी ते फारच अवघड आहे. तेही त्यांनी सहजतेने केले आहे. विचार हे केवळ समजून चालत नाही तर ते आचरणात आणण्यासाठी असतात, नव्हे त्याची सुरुवात स्वत:पासूनच करणे चांगले असते हेही त्यांना उमगले आहे. राजकारणात असूनही त्यांनी आपली प्रतिमा, चारित्र्य व विश्वासार्हता जपली आहे.

काही जणांना वाटते की त्यांनी आपले स्पर्धक संपविले. हे खरे नाही. एका विचारवंताने म्हटले आहे की आपला विरोधक आत्महत्या करायला निघाला असेल तर त्याला न थांबविण्यातच खरा शहाणपणा असतो. कदाचित हे त्यांनी केले असावे, हा त्यांच्या चातुर्याचा भाग असू शकेल, हा त्यांचा दोष असू शकत नाही. खरे तर मानवी जीवनाचे हे रहस्य आहे की जो दुसऱ्यासाठी खड्डा खोदतो, नियती त्या खड्ड्याच्या बाजूला दुसरा खड्डा त्याच व्यक्तीसाठी खोदत असते. ज्याला हे उमगले आहे, तो त्या वाटेने जातच नाही. देवेंद्रजी हे त्यापैकीच एक आहेत. खरे तर समन्वयवादी भूमिका हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. आजकाल अमुक अमुक त्यांच्याजवळचा आहे, राईट हॅण्ड आहे, लेफ्ट हॅण्ड आहे असे काहींना वाटते, पण ते खरे वाटत नाही. एकाच वेळी सर्व आमदार त्यांच्याजवळचे आहेत व नाहीतही. कारण प्रामाणिकता, विश्वासार्हता, अभ्यासूवृत्ती, सचोटी, अफाट मेहनत करण्याची तयारी, तोलून मापून बोलण्याची सवय, आपल्या विचारातील अविचल निष्ठा, या गोष्टी असलेले तर त्यांच्या जवळचे आहेतच, पण आज ज्यांच्या जवळ या गोष्टी नाहीत तेही त्यांच्या जवळचेच आहेत. कारण त्यांना ते या मार्गावर आणू इच्छितात. असामान्य नेता हा शब्द त्यांच्यासाठी वापरावा असे वाटते, हो पण ही थोडी घाईच ठरेल. कारण आता तर ते आपल्या राजकीय कारकीर्दीच्या ऐन मध्यावर दिसत आहेत.अजून बराच प्रवास बाकी आहे. त्यांना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा.

**प्रा. श्रीकांत पांडे**/नागपूर

### राजकारणातील दोन ध्रुव

राज्यातील मुरब्बी राजकीय नेते म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो असे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार या दोघांचा वाढदिवस मंगळवारी झाला. देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राच्या राजकारणातील एक महत्त्वाचे आणि प्रभावशाली नेतृत्व म्हणून ओळखले जातात. त्यांच्या राजकीय प्रवासाची सुरुवात अगदी सामान्य कार्यकर्त्यापासून झाली. त्यांनी राज्याचे मुख्यमंत्रिपद, उपमुख्यमंत्रिपद आणि विरोधी पक्षनेतेपद अशा प्रमुख भूमिका यशस्वीपणे पार पाडत ते पुन्हा तिसऱ्यांदा राज्याचे मुख्यमंत्री झाले. एकेकाळी महाराष्ट्राच्या राजकारणातील चाणक्य म्हणून ज्येष्ठ नेते शरद पवार यांची ओळख होती. पण त्यांना मागे टाकत सलग तिसऱ्यांदा भाजपासाठी चाणक्य ठरले, ते देवेंद्र फडणवीस. याचे मुख्य कारण, भाजपाला निवडणुकीत १०० पेक्षा जास्त जागा मिळवून देण्याची हॅट्ट्रिक त्यांनी साध्य करून दाखवली आहे. २०१४ मध्ये भाजपा-शिवसेनेची युती नव्हती, तेव्हा फडणवीस भाजपाचे प्रदेशाध्यक्ष होते. पक्षाला १२२ जागा मिळाल्या, सरकार आले आणि फडणवीस मुख्यमंत्री झाले. २०१९ मध्ये युती झाली. भाजपाला १०५ जागा मिळाल्या तर २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत १३२ जागा मिळाल्या. एक अभ्यासू व्यक्तिमत्त्व, प्रशासनावरील मजबूत पकड आणि राजकीय धोरणांची अचूक मांडणी यासाठी ते ओळखले जातात.

उपमुख्यमंत्री अजित पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक वर्षांपासून कार्यरत आहेत. लोकसभा निवडणुकीत त्यांच्या नेतृत्वाखालील पक्षाला अपयश आल्यानंतरही न खचता त्यांच्या पक्षाने विधानसभा निवडणुकीत ४१ मतदारसंघांमध्ये अभूतपूर्व यश मिळविले. याआधीही त्यांनी उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री म्हणून काम पाहिले आहे. प्रशासनावर असलेली त्यांची उत्तम पकड, प्रशासकीय क्षमता आणि स्पष्टवक्तेपणामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात ते एक प्रभावी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. राज्यातील या दोन कर्तृत्ववान राजकीय व्यक्तींचा जन्मदिवस एकाच दिवशी यावा, याला योगायोग म्हणावा की चमत्कार?

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर : राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपाचे आमदार रणजिसिंह मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली अकलूज येथे वह्या वाटप आणि वृक्षारोपण आणि रक्तदान शिबिर घेण्यात आले. याप्रसंगी अर्जुनसिंह मोहिते-पाटील, शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.



## महत्वाचे...

### विपसना दुडे हिची राज्य फुटबॉल संघ चाचणीसाठी निवड

**सोलापूर, दि. २२ जुलै-**

येथील पोदार इंटरनॅशल स्कूलच्या विपसना दुडे हिची सब ज्युनियर महाराष्ट्र फुटबॉल संघ निवड चाचणसाठी निवड झाली. हे प्रशिक्षण शिबीर व निवड चाचणी ४ ऑगस्ट रोजी मुंबई येथे होईल. दुडे हीस क्रीडाशिक्षक करण शिंदे, साक्षी मारेडी व ऐश्वर्या गिरे यांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या निवडीबद्दल मुख्याध्यापक समरेद्र पानिग्राही यांनी अभिनंदन केले.



### जगन्नाथ शिंदे चॅम्पियन चषक बुद्धिबळ स्पर्धा रविवारी

**सोलापूर, दि. २१ जुलै-**

सुशील रसिक सभागृह येथे जगन्नाथ शिंदे चॅम्पियन चषक स्पर्धा क्रमांक ३ रविवार २७ जुलै रोजी सकाळी दहा वाजता आयोजित केली आहे. या स्पर्धेसाठी रोख रक्कम, ९० चषक व मेडल्स मिळून ३२ हजार रुपयांची बक्षीसे देण्यात येणार आहेत. तसेच जगन्नाथ शिंदे चॅम्पियन चषक मालिका दोनमध्ये भाग घेऊन जास्तीत जास्त गुण मिळवून विजयी होणाऱ्या नऊ खेळाडूंना नऊ बुद्धिबळाचे घड्याळ बक्षीस देण्यात येणार आहे. इच्छुकांनी सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनचे सचिव शरद नाईक ९४२३३३७३४६ यांना संपर्क करावा असे आवाहन श्री रमा जगदीश बहुउद्देशीय महिला उत्कर्ष संस्थेचे अध्यक्ष मधुकर नाईक यांनी केले आहे.





### श्रावण मासारंभानिमित्त श्रीमद् दासबोध पारायण कार्यक्रम

**सोलापूर, दि. २२ जुलै-**

सालाबादप्रमाणे यंदाही वर्षी स.स.नागनाथ अल्ली महाराज संस्थानाच्यावतीने श्रावण मासारंभ निमित्त दासबोध पारायण कार्यक्रम आयोजित केलेला आहे. जुना विडी घरकूल येथील सागर चौक, लाईट कंपाऊंड समोरील सत्संग भवन येथे दिनांक २५ जुलै ते १५ ऑगस्टपर्यंत एकूण २१ दिवस सकाळी ७ ते ९ या वेळेत कार्यक्रम आयोजित केलेला आहे. तसेच सायंकाळी ७ ते रात्री ९ वाजेपर्यंत एलईडीद्वारा श्रीकृष्ण लिललू या विषयावर महाराजांचे प्रवचन होणार आहे. दिनांक १५ ऑगस्ट गोकुळाष्टमी निमित्त रात्री ९ ते १२ पर्यंत कार्यक्रम होणार आहे व दिनांक १६ रोजी रोजी गोपाळकाला निमित्त सकाळी ११ ते दुपारी ५ वाजेपर्यंत कार्यक्रम होणार आहे.

### हुंड्यासाठी मागणी करत जीवे मारण्याची धमकी

**सोलापूर, दि. २२ जुलै-**

विवाहितेला माहेरून नवीन चार चाकी वाहन घेण्यासाठी पाच लाख रुपये घेऊन ये व तसेच हुंड्याची मागणी करत जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी सविता विरेश राठीमणी (वय-३६,रा. माशाळ वस्ती) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून विरेश सिद्रामय्या राठीमनी व सोनाली पाटील (पूर्ण नाव पत्ता माहीत नाही) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना ८ जुन २००९ ते आजतागायत पर्यंत फिर्यादी यांच्या सासरी घडली.या घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल जाधव हे करीत आहे.

### श्री सिद्धेश्वर कॉलेजमध्ये २६ जुलै रोजी मार्गदर्शन सत्र

**सोलापूर, दि. २२ जुलै-**

श्री सिद्धेश्वर शिक्षण मंडळाच्या आर्किटेक्चर कॉलेज, सोलापूर यांच्या वतीने पदवी अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तसेच त्यांच्या पालकांसाठी शनिवार दि. २६ जुलै रोजी सकाळी ११ वाजता एक विशेष मार्गदर्शन सत्र आयोजित केले आहे. सेमिनार हॉलमध्ये आयोजित या सत्रात अनुभवी प्राध्यापक व प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शक उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रिया, पात्रता निकष, आवश्यक कागदपत्रे यासह सर्व बाबतीत सविस्तर मार्गदर्शन करतील. या संवादात्मक सत्रातून पालक व विद्यार्थ्यांना संस्थेच्या शैक्षणिक वातावरणाची, आधुनिक सुविधा व भविष्यातील करिअर संधींची थेट माहिती मिळणार आहे. विद्यार्थ्यांचे सर्व शंका समाधानही या सत्रात करण्यात येईल.

# राष्ट्रवादी पक्ष फुटला, नेते बदलले पण गटबाजी जैसे थे

## कडक शिस्तीचे अध्यक्ष असतानाही धाक नाही; प्रदेशाध्यक्षांसमोरच ऐकमेकांवर डागल्या शाब्दिक तोफा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

**शरद पवार आणि अजितदादा पवार यांची एकत्रित राष्ट्रवादी असतानाही पक्षात गटबाजी होतीच, दरम्यानच्या काळात राष्ट्रवादी फुटली पक्ष नेतृत्वात मोठे बदल झाले. कडक शिस्तीचे परखड रोखठोक अजितदादांसारखे अध्यक्ष पक्षाला मिळाल्यानंतरही राष्ट्रवादी काँग्रेसमधील गटबाजी मात्र जैसे थे असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. पक्षातील काही पदाधिकारी नेत्यांसाठी नाकापेक्षा मोती जड असे होवू लागल्याचे चित्र आहे. पक्ष एकत्र असो की फुटलेला या सर्व राजकारणामध्ये पक्षातंर्गत गटबाजीत एक धागा मात्र समान आहे, तो म्हणजे पक्षाच्या वरिष्ठांकडून गटबाजीला खतपाणी घालण्याचा प्रकार होय. यामुळेच सोलापूर जिल्ह्यात बलाढ्य होती अशा एकत्रित राष्ट्रवादीला मोठे दणकेदेखील बसलेले आहेत. अनेक दिग्गज राजकीय घराण्यांनी राष्ट्रवादीला रामराम ठोकल्याचे दिसून आलेले आहे.**


एकत्रित राष्ट्रवादी असतानाच पक्षातंर्गत गटबाजीमुळे मोहिते-पाटील, परिचारक, सोपल, बागल यांनी पक्षाला राम-राम ठोकला. तर पक्षाचे विभाजन झाल्यानंतरही अजितदादांच्या राष्ट्रवादीतील अनेकांनी घड्याळाची साथ सोडली. तर काहींनी पुन्हा शरद राष्ट्रवादीसोबत जाण्याचा निर्णय घेतला. यावरून राष्ट्रवादीमध्ये किती मोठ्या प्रमाणात टोकाची पक्षातंर्गत गटबाजी होती आणि आजही आहे हे स्पष्ट होते. मराठ्याचा पक्ष असा शिक्कामोर्तब असलेल्या राष्ट्रवादीकडे मुस्लिम समाजाचादेखील ओढा असतो. परंतु स्वार्थापुढे पक्षनिष्ठा बाजूला पडते आणि गटबाजी फोफावत असल्याचा मोठा राजकीय फटका राष्ट्रवादीला बसत असल्याचे जाणवत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे आणि प्रदेश पदाधिकाऱ्यांनी राज्यभर दौरा सुरु केला खरा पण लातुरात या दौऱ्याला खऱ्या अर्थाने गालबोट लागले आहे. राष्ट्रवादीचा प्रदेश पदाधिकारी सूरज चव्हाण यांनीच पक्षाला अडचणीत आणण्याचे काम केले आहे. लोकशाहीत म्हणणे मांडण्याचा अधिकार असतानाही केवळ शुल्लक कारणावरून निवेदन देणाऱ्या छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना



बेदम मारहाणीचा प्रकार राष्ट्रवादीकडून घडला आणि परखड नेते अजितदादांनी बेशिस्त सूरज चव्हाण याचा राजीनामा घेतला. पण यामुळे राष्ट्रवादीच्या अडचणीत वाढ झाल्याचे दिसून येत आहे. राष्ट्रवादीचा बेस असणाऱ्या मराठा समाजाचाच रोष चव्हाण यांच्या कृत्याने पक्षावर ओढावला आहे.

प्रदेशाध्यक्ष तटकरे यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर सोलापुरात जल्लोष झाला खरा, मात्र शहर आणि जिल्ह्याच्या राष्ट्रवादीने स्वतंत्र मेळावे घेत शहरातच शक्तीप्रदर्शन करत उणीधुणी काढल्याचे सोलापूरकरांनी पाहिले. राष्ट्रवादीचे नूतन जिल्हाध्यक्ष उमेश पाटील आणि राष्ट्रवादीचे नेते मोहोळचे माजी आमदार राजन पाटील यांच्यातील सख्य सर्वश्रुत आहे. कोणत्या पातळीवर टिका होते हेदेखील वरिष्ठांपासून लपलेले नाही. याच वादामुळे अजित राष्ट्रवादीला मोहोळचा आमदार गमवावा लागला. उमेश पाटलांनी अजितदादांची साथ सोडून ज्या विद्यमान आमदाराला शरद राष्ट्रवादीच्या तिकिटावर निवडून आणण्यासाठी राजकारण केले ते लक्ष्मीपुत्र आमदार राजू खरे हे शरद पवारांचे नव्हे तर एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व मान्य करतात. याचा अर्थ दोन्ही राष्ट्रवादीच्या हातून मोहोळचा एक हक्काचा आमदार निसटल्याचे स्पष्ट होते.



### महायुती होणार का? याबाबत संभ्रमवस्था

सोलापूर शहर आणि जिल्ह्यात ऐककाळी राष्ट्रवादीचे मोठे राजकीय अस्तित्व होते. परंतु आता शहर-जिल्ह्यावर भाजपाने राजकीय कब्जा केलेला आहे. सोलापूर महापालिकेत भाजपाची एकहाती सत्ता होती तर जिल्हा परिषदेतही भाजपाने चांगला जम बसवल्याचे जाणवते. महायुती झाल्यास जागावाटपात भाजपाला शिंदे सेना आणि अजित राष्ट्रवादीला जागा सोडाव्या लागतील अन् सत्ता आल्यास सत्तेत वाटाही द्यावा लागणार आहे. त्यामुळे ज्या शहर व जिल्ह्यात ज्या पक्षाची राजकीय ताकद जास्त तिथे स्वबळाचा अथवा मैत्रिपूर्ण लढतीचा नारा दिला जाण्याची शक्यता अधीक आहे.

प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांच्या उपस्थितीत सोलापुरात झालेल्या मेळाव्यात जिल्हाध्यक्ष उमेश पाटील आणि शहराध्यक्ष संतोष पवार यांच्यात शाब्दिक युध्द रंगल्याचे दिसून आले. ऐकमेकांची उणीधुणी काढत पदाधिकाऱ्यांनीच पक्षशिस्तीला ग्रहण लावल्याची चर्चा मेळाव्यातील कार्यकर्त्यांमध्ये होती. एवढेच काय तर प्रदेशाध्यक्ष भाषण करत असताना प्रदेशाध्यक्षांच्याच खुर्चीवर बसलेल्या जिल्हाध्यक्ष उमेश पाटलांचे तटकरे यांनी कान टोचले. मान रखा करो असे सुनावत पक्षात बेशिस्त खपवून घेतली जाणार नसल्याचाच जणू संदेश तटकरे यांनी उमेश पाटील यांना दिल्याची चर्चाही रंगली आहे.

**प्रशांत माने**
**मो. ९८८११९१४४३**

लोकसभा निवडणुकीत सोलापूर जिल्ह्यातील दोन लोकसभा मतदारसंघात अजित राष्ट्रवादीला स्थान नाही तर विधानसभा निवडणुकीतही अजित राष्ट्रवादीला एकही आमदार विजयी करता आलेला नाही. जिल्ह्यातील ११ पैकी पाच विधानसभा मतदारसंघात शरद राष्ट्रवादीचे आमदार विजयी झाले आहेत. मोहोळमध्ये अजित राष्ट्रवादीचा एक हक्काचा आमदार विजयी झाला असता तो देखील पक्षातील गटबाजीमुळे होवू शकला नाही. अजित राष्ट्रवादीला आता महापालिका, जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत अस्तित्व टिकवावे लागणार आहे. या निवडणुकीत जर अजित राष्ट्रवादीला राजकीय फटका बसला तर थेट अजितदादांवर राजकीय नामुष्की ओढावणार असल्याची चर्चा पक्षातील नेते, कार्यकर्ते सांगत आहेत. पक्षाची लाज राखण्यासाठी प्रदेशाध्यक्षांनी दौरे सुरु केले असताना पक्षबांधणी, आगामी निवडणुकांची रणिती आखणे दूरच पण पक्षातील गटबाजीला मात्र उधाण आल्याची शोकांतिका जाणवत आहे.

एकीकडे कृषीमंत्र्यांमुळे संकटात सापडलेल्या राष्ट्रवादीसमोर मंत्र्यांचे वर्तण सुधारण्याचे आवाहन असतानाच आता पक्षाचे जबाबदार पदाधिकारी यांनाही पक्षशिस्त शिकवण्यासाठी अजितदादांना हातात छडी घ्यावी लागणार आहे. राष्ट्रवादीची अडचण अशी आहे की, भाकरी फिरवायची म्हंटले तरी मोठी पदे सांभाळणारे सक्षम नेतृत्व शोधण्याचे संकट पक्षावर आहे. निवडणुकांच्या तोंडावर भाकरी फिरवायची तरी अडचण आणि पक्षातील गटबाजीमुळे पक्षातच पाडापाडीचे राजकारण होण्याची भितीदेखील पक्षासमोर आहे. राष्ट्रवादीचा इतिहास असा आहे की, राष्ट्रवादीत कार्यकर्ते कमी अन् नेते जास्त आहेत आणि राष्ट्रवादीला विरोधकांपेक्षा राष्ट्रवादीमधून धोका अधिक असतो. अजितदादा आणि तटकरे यांची सोलापूरबाबत परीक्षाच असणार हे निश्चित.

### डिजिटल पोस्टर लावण्यावरून लोखंडी सळईने मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

**तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल**

मोकळ्या जागेच्या भिंतीवर डिजिटल पोस्टर लावू नका असे म्हणून यावरून लोखंडी सळईने डोक्यात मारून जखमी केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना २१ जुलै रोजी दुपारी सव्वा दोन वाजण्याच्या सुमारास बेगम पेठ येथे घडली.याप्रकरणी सफदार इक्बाल अहमद सय्यद (रा.बेगम पेठ,अजिजि प्लाझा समोर) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून जाकीर बडेसाहब सय्यद, शोएब जाकीर सय्यद,मुजीब जाकीर सय्यद (रा.अंबिका नगर,नई जिंदगी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी हे दानिस आरीस या लग्नपत्रिका छापण्याच्या दुकानात असताना चुलत भाऊ वरील संशयित आरोपी यांनी मिळून येऊन फिर्यादी यांना तू या मोकळ्या जागेच्या भिंतीवर डिजिटल पोस्टर लावू नको असे म्हणून फिर्यादी यांच्या डोक्यात प्लास्टिकच्या पाईपने मारून जखमी केले.त्यावेळी फिर्यादी यांचा भाऊ मुहाफिज सय्यद हा भांडण सोडवण्यासाठी आला असता,त्याला मुजीब सय्यद याने हातातील लोखंडी सळईने डोक्यात मारून जखमी केले व तसेच वडील इक्बाल शेख यांना जाकीर सय्यद याने शिवीगाळ करून हाताने मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल मस्के हे करत आहेत.

# 'बोरामणी विमानतळ' चालू करण्याच्या हालचाली

- **मुख्यमंत्र्यांनी घेतली जिल्हाधिकाऱ्यांकडून माहिती**
- **बोरामणी विमानतळाच्या त्रुटीही लवकर काढणार**
- **होटगी रोड विमानतळावर 'नाईट लँडिंग'साठी जागा अपुरी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

गेल्या अनेक वर्षांपासून चर्चेत असलेल्या बोरामणी विमानतळाच्या उभारणीला अखेर राज्य सरकारकडून हिरवा कंदील मिळाला असून, याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच याबाबत जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांच्याकडून अपडेट जाणून घेतले आहे. याचे कारणही तसेच आहे. सोलापूर विमानतळ चालू केले मात्र या विमानतळावर नाईट लँडिंग नसल्याने सध्याही अनेकजण सोलापूरला यायला धजावत नाहीत. यामुळे अनेक महत्वाच्या विमानतळावर स्लॉटही मिळत नाहीत. यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आता सोलापूर विमानतळाचा विषय हाती घेतल्याने हे विमानतळ लवकर चालू होण्याची शक्यता जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज (दि. २२) पत्रकारांशी संवाद साधताना व्यक्त केली. दरम्यान, या विमानतळावरील अतिक्रमण व इतर काही अडचणीही लवकर दूर करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

गेल्या काही वर्षांपूर्वीच केंद्र आणि राज्य सरकारच्या विमानतळ विकास प्राधिकरणाचा या बोरामणी विमानतळासाठी वाटाही निश्चित झाला होता. मध्यंतरी सोलापूर विमानतळाच्या डागडुजीसाठी तब्बल ६५ कोटी रूपये खर्चून सोलापूर-गोवा ही सेवा सुरू केली आहे. दरम्यान, नाईट लँडिंगसाठी होटगी रस्त्यावरील विमानतळाचा विकास करण्यात अडचणी येत आहेत आणि नाईटलँडिंगसाठी आहे ती जागाही खूपच अपुरी आहे. इतकेच कायतर नवीन जमीन भूसंपादनाचा विषयही अतीखर्चिक आहे. यामुळेच पुन्हा शासनाकडून बोरामणी विमानतळाचा विषय समोर आला आहे. मागील काही वर्षात या विमानतळासाठी शासन स्तरावर अनेक बैठका झाल्या. मात्र त्यातून तोडगा निघाला नव्हता. दरम्यान, केंद्र शासनाच्या उड्डाण योजनेत होटगी रोड विमानतळाचा समावेश केला गेला. त्यानंतर या विमानतळावरून प्रवासी सेवा सुरू करण्यासाठी शासनाचे प्रयत्न सुरू झाले आणि बोरामणी प्रकल्प प्रलंबित राहिला होता. यामुळे शासनाने भूसंपादनावर घातलेले १२० कोटी रुपये पाण्यात गेल्याची चर्चाही राजकीय वर्तुळातून सुरू होती. दरम्यान, बोरामणी येथे कार्गो विमानतळाची घोषणा झाल्यानंतर २००९ मध्ये या विमानतळासाठी डीपीआर तयार करण्यात आला होता. त्यावेळी या प्रकल्पाची किंमत ६२५ कोटी इतकी होती. वेळेत प्रकल्प मार्गी न लागल्याने या प्रकल्पाची किंमत आता अनेक पटींनी आता वाढणार आहे. तरीही बोरामणी विमानतळ चालू झाल्यास त्याचा फायदा सर्वस्तरातील नागरिकांना होणार आहे.




### वनविभागाची जागा न मिळाल्याने प्रकल्प प्रलंबित

वनविभागाची ३३ हेक्टर जमीन माळढोक अभयारण्यामुळे मिळाली नसल्याने बोरामणी विमानतळाचा विषय प्रलंबित राहिला आहे. याबाबत विमानतळ प्राधिकरणाने वनविभागाला प्रस्तावही दिला होता. मात्र माळढोकसह या परिसरातील इतर पक्षांचाही वावर असल्याने ही जागा देण्यास वनविभागाने त्यावेळी नकार दिला होता. वनविभागाची जागा संपादित न झाल्याने हा प्रकल्प रखडला होता. दरम्यान, यावरही शासनाकडून काहीतरी तोडगा काढून बोरामणी विमानतळ चालू करण्याच्या हालचाली सध्यातरी दिसत आहेत.

### भविष्यातील गरज ओळखून या विमानतळाचा संकल्प

तत्कालिन केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी सोलापूरकरांची भविष्यातील गरज ओळखून सोलापूर शहरातील टेक्सस्टाईल, गारमेंट व्यापारी, शेतकऱ्यांचे उत्पादन आणि नागरिकांना प्रवासी सेवा, असा तिहेरी मध्य साधण्यासाठी ६२५ कोटींचे बोरामणी विमानतळ उभारणीची घोषणा २००८ मध्ये केली होती. त्यानंतर या विमानतळाच्या भूसंपादनासाठी तीन टप्प्यात १२० कोटी रुपये प्राप्त झाले. या विमानतळासाठी २०१० मध्ये ५८० हेक्टर खासगी जमिनीचे भूसंपादन सुरू झाले. भूसंपादनाची प्रक्रिया तीन टप्प्यात २०१४ पर्यंत सुरू होती. यानंतर २०२० मध्येही हे विमानतळ सुरू करण्याच्या हालचाली झाल्या होत्या.

# ग्रामदैवत सिध्दरामेश्वरांची श्रावणात आराधना

- **श्रावणानिमित्त धार्मिक कार्यक्रमांची मांदियाळी**
- **महिनाभर अलोट गर्दी, भक्तांचे श्रध्दास्थान**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ जुलै-**

सोलापूर शहर हे शिवयोगी सिद्धेश्वर महाराजांच्या कार्यामुळे भू- कैलास म्हणून ओळखले जाते. श्रावण महिन्यात सोलापुरात विविध धार्मिक कार्यक्रमांच्या आयोजनाने भक्तीचा मळा फुलणार आहे. श्री सिद्धेश्वर महाराजांच्या दर्शनासाठी शहर, जिल्हा, आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटकासह महाराष्ट्रातील शिवभक्तांची गर्दी असते. त्यानिमित्त श्री सिद्धेश्वर देवस्थान समितीच्या वतीने जय्यत तयारी सुरू करण्यात आली आहे. गुरुवार, दि. २४ जुलै रोजी अमावास्या असून, शुक्रवार, दि. २५ जुलै रोजी श्रावण महिन्यास प्रारंभ होणार आहे. यंदा श्रावण महिन्यात चार श्रावण सोमवार आले असून, चारही श्रावण सोमवारी सिद्धेश्वर मंदिरातील योगसमाधीस आकर्षक फुलांची मेघडंबरीने सजावट केली जाते. सिद्धेश्वर मंदिरात सकाळी श्रींच्या मूर्तीस आणि योगसमाधीस अभिषेक, रुद्राभिषेक, पारायण, पान पूजा, तांदूळ पूजा असे धार्मिक विधी होणार आहेत. मंदिरात भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेऊन महिला व पुरुष भाविकांसाठी स्वतंत्र दर्शनरांगेची व्यवस्था केली जात आहे. त्यासाठी बॅरिकेटसची व्यवस्था केली जात आहे.

विजापूरर रोडवरील जगद्गुरु रेवणसिद्धेश्वर मंदिरात श्रावण महिन्यात धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.चारही रविवारी भाविकांसाठी महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे. शेवटच्या रविवारी १७ ऑगस्ट रोजी जगद्गुरु रेवणसिद्धेश्वर महाराज यांची जोडबसवण्णा चौक येथील चिद्रे वाड्धापासून रेवणसिद्धेश्वर मंदिरापर्यंत रथोत्सव यात्रा निघते.

**यावर्षी असणार चार सोमवार**
२८ जुलै ४ ऑगस्ट
११ ऑगस्ट १८ ऑगस्ट

### विविध देवतांचे असतात रथोत्सव

श्रावण महिन्यात विविध समाजाच्या वतीने रथोत्सव मिरवणूक निघत असते. नागपंचमीला चिमटेश्वर, नारळी पौर्णिमेला मार्कंडेय महामुनींची तर त्याच्या आदल्या दिवशी जिव्हेश्वर तसेच शेवटच्या सोमवारी निलकंठेश्वर रथोत्सव निघतो. मंगळवारी २९ जुलै रोजी नागपंचमी आहे. त्यानिमित्त विजयपूर रोडवरील नागनाथ मंदिरात विविध कार्यक्रम होणार आहेत.

### पोटफुगीने तरुण बेशुध्द

**सोलापूर :** पोटफुगीचा त्रास होऊन जय मल्हार चौकातील तरुणाची शुध्द हरपली. १५ जुलै पासून त्यास पोट फुगीचा त्रास सुरु झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे. शुभम अनिल रणदिवे (वय २६, रा. जय मल्हार चौक) असे तरुणाचे नाव आहे. खासगी रुग्णालयातील उपचाराने त्रास कमी न झाल्याने २१ जुलै रोजी त्याला शासकीय रुग्णालयात दाखल केले. प्रकृती सुधारत नसून तो बेशुध्द आहे. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी११८६

**सांडिले आचार ।**
**द्विज चाहाड झाले चोर ।।**

सामाजिक व्यवहार योग्यप्रकारे चालण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने विशिष्ट प्रकारचे आचार-विचार जोपासले पाहिजेत. समाजातील एखादा घटकही जर नीती-नियमाच्या विरुध्द वागु लागला तर त्याचा अनिष्ट परिणाम इतरांवर होऊ शकतो. समाजातील प्रत्येक घटकाला नीती-नियम माहितीच असतील असे नव्हे, किंवा माहिती असेल तरी त्याचे पालन कसे करायचे, याची जाणीव असेलच असेही नाही. त्यामुळे योग्य आचार-विचार काय आहेत, किंवा नीती-नियम काय आहेत, आणि ते कसे पाळायला हवेत, याबद्दल समाजाला सातत्याने मार्गदर्शन करण्याची जबाबदारी परंपरेने द्विजांनी उचलली होती. अशा मार्गदर्शन करण्याचा द्विजावर जनतेचा विश्वासही होता. स्वत:च्या वर्तनातून अर्थात स्वत:च अगोदर वागून इतरांना मार्गदर्शन करणारी ही मंडळी समाजाच्या दृष्टीकोनातून पूजनिय होती. आपण स्वत: नीती नियमाचे पालन न करता इतरांना नीती-नियम पाळा म्हणून सांगणाऱ्यांच्या विचाराचा योग्य



तो परिणाम होत नाही. याची जाण द्विजांना होती म्हणून ते नीती-नियमांचे परिपूर्ण पालन करायचे आणि मगच इतरांना सांगायचे. पण आज ती परिस्थिती राहिलेली नाही. द्विज लोकांपैकी अनेकांनी आपले आचार-विचार नीती-नियमाच्या विरुध्द सुरु केले आहेत. अनेक द्विज लोक नितीभ्रष्ट होऊन चोरी चहाडया करु लागले आहेत. या अनुषंगाने सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात, सांडिले आचार । द्विज चाहाड झाले चोर ।। मार्गदर्शक हाच जेव्हा दिशाहीन होतो किंवा रक्षकच जेव्हा भक्षक होतो तेव्हा त्याच्याकडून अपेक्षा करणारी मंडळी आपोआप दिशाहीन होत असते.

आपल्या देशाच्या परंपरेकडे किंवा इतिहासाकडे पाहिले असता आपल्या लक्षात येते की, विशिष्ट समाजातील लोक सर्व सामान्यांना मार्गदर्शक करीत होते. नीती-नियमांचे धडे शिकवून समाज व्यवस्था सुरळीत चालवत होते. पण कलयुगामध्ये हा वारसा नष्ट होत चालला आहे. ज्यांच्याकडे मार्गदर्शक म्हणून पहावे, तेच नको त्या वाईट गोष्टी करीत आहेत. स्वार्थापुढे यांना कांही दिसेनासे झाले आहे. दारु, बिडी, तंबाखू, मांस, मटण यापासून ही मंडळी दूर राहिलेली नाही. समाजात ज व्यवहार हीन किंवा वाईट मानले जातात, त्या व्यवहारात ती मंडळी अग्रेसर झाली आहे. कोणाकडे मार्गदर्शक म्हणून पहावे? हा मोठा प्रश्न जनसामान्यासमोर उभा झाला आहे. द्विजांपैकी जी मंडळी चांगले वर्तन करते आहे, किंवा नीती-नियमांचे तंतोतंत पालन करीत आहे, त्यांच्याकडे लोक शंकात्मक दृष्टीने पाहात आहेत. या मागचे कारण म्हणजे द्विजातील कांही लोकांनी आचार-विचार सोडला आहे, याचा हा परिणाम आहे. वाईटामुळे चांगलेही बदनाम व्हावेत, हे दूर्दैव असूनही असे दूर्दैव चांगल्या द्विजावर ओढवले जात असल्याचे आपण पाहतो आहे. चोहोंकडून बरबटलेल्या वातावरणातही बहुतांश द्विज आपली उत्कृष्ट मार्गदर्शनाची भूमिका बजावत आहेत. त्यामुळे एखादा वाईट वागला म्हणून त्याच्या वाईटपणाचे खापर त्याच्या कुटूंबातील इतरांवर फोडणे चुकीचे आहे. थोडक्यात, कोण देतो त्यापेक्षा काय देतो याकडे लक्ष देणे योग्य असते. महाराजांच्या अभंगांचे अर्थ हे आमच्या अल्पबुध्दीचे असल्याने चूकभूल क्षमा असावी. इतरांकडे वाईट नजरेने पाहण्याअगोदर स्वत:कडेही पूर्णत: पहाणे योग्य असते.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : बुधवार | दिनविशेष- शिवरात्री |
| दि. २३ जुलै २०२५ | लोकमान्य टिळक जयंती |
| विक्रम संवत् २०८१ | संत सावता माळी पुण्यतिथी |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - आषाढ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. चतुर्दशी (२६.२८) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - आद्रा (१७.५४) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - व्याघात (१२.३३) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण -विष्टी (१५.३२) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.

**वृषभ :** अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा. नवीन योजनांची सुरूवात कराल.

**मिथुन:** व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता.

**कर्क:** अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ - लालचे पासून दूर रहा. धंदा मध्यम राहील. कौटुंबिक परिवारात सुख - शांती मिळेल.

**सिंह :** व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल.

**कन्या :** कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. काम काजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील.

**तुळ :** आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल.

**वृश्चिक :** मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल.

**धनु :** योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहाराम ुळे दु:खी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत.

**मकर :** फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील.

**कुंभ :** मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन:** कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल.

# पंढरपुरात बच्चे कंपनीसह नागरिकांची मनोरंजन नगरीत गर्दी

### लाखोंची होतेय उलाढाल

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२१ जुलै-**

पंढरपूरकरांना जेव्हा वारी किंवा यात्रा चांगली होते तेव्हा शहर आणि परिसरातील नागरिकांची देखील मजा किंवा चंगळ असते. कारण पंढरपूरचे अर्थकारण हे बऱ्याचअंशी यात्रांवरच अवलंबून आहे. त्यामुळेच यात्रा चांगली झाली तर शहरवासीयांतून आनंद, समाधानाची भावना व्यक्त होते. सहाजिकच यात्रेनंतर शहरातील नागरिकांचा देखील मौजमजेचा मुड असतो. त्यामुळेच आपल्या बच्चेकंपनी, कुटंबियांसह पंढरपूरकर नागरिकांची येथील मिनी एस्सेल वर्ल्ड अर्थात शहरातील टिळक स्मारक मंदिराच्या मैदानावरील मनोरंजन दुनीयेकडे आपसुकच पाऊले देखील वळतात. सध्या देखील येथील मिनी एस्सेलवर्ल्ड भरलेल्या टिळक स्मारक मैदानावर नागरिकांची आपल्या बच्चेकंपनीसह तुफान गर्दी होताना दिसत आहे.

आषाढी यात्रेसाठी वारकरी भाविकांबरोबरच शहरातील बालगोपाळासह अनेकाचे आकर्षण असलेले मिनी एस्सेल वर्ल्ड पंढरी नगरीत अवतरले असून या मायावी अद्भूत मनोरंजननगरीकडे हजारो भाविकांची पावले आपसूकच वळवत आहे. दरवर्षी आषाढी आणि कार्तिकी वारीमध्ये ही मायावीनगरी येथे येत असते. यात्रेच्या अगोदर पासून अर्थात त्यांच्या मांडणीच्या तयारी पासून साधारण महिना ते दीड महिना येथे त्यांचे वास्तव्य असते.

या मायावी नगरीमध्ये उंचच उंच असणारा आकाश पाळणा हे आकर्षणाचा बिंदू असतो. इलेक्ट्रिक जनरेटरच्या शक्तीवर गोलगोल फिरणारा आकाशपाळणा जेव्हा उंचावर जातो त्यावेळी आसमंतातून स्वप्ननगरी पंढरपूर शहराचे सौंदर्य अलौकिक असते. या बरोबरच गोलाकार आणि मधूनच तिरका होऊन फिरणारा मेरी गो राऊड, गोलात एकमेकाना धडकत जाणाऱ्या डॅशींग कार गाड्या. तसेच काळजाचा ठोका चुकत गोल मृत्युगोलात फिरणाऱ्या दोन वेगवान मोटारसायकल आणि एक मारुती कार, चिमुकल्यांचे आकर्षण असलेल्या पाण्यातील आगबोटी,



### महिनाभर असते मनोरंजन वारी

आषाढी वारी आली की विविध व्यवसायाबरोबर मनोरंजन वारीचेही आगमन होत असते. अनेक व्यवसायीक यात्रा होताच निघून जातात परंतु मनोरंजन वारीतील पाळणे, रेल्वे व इतर व्यावसायिक महिनाभर हा व्यवसाय करतात.

मिनी ट्रेन, जीवनातल्या विविध समस्यांवर आपली भूमिका व्यक्त करणारे पन्नालाल गाढव, अनेक चित्र विचित्र प्रश्न विचारले की हे पन्नालाल महाशय चक्क जाऊन प्रेक्षकांसमोर उभे राहते. हा प्रकार अत्यंत विनोदी तेवढाच आफत आणणारा असतो. पण कुणीही सिरिअस न घेता सर्वचजण हसण्यावारी नेत आपली आपल्या कुटुंबियांची करमणूक करुन घेतात. या पन्नालाल गाढवाच्या प्रयोगातून केवळ मनोरंजन हाच एकमेव हेतू असतो.

### विक्रमी यात्रेमुळे पंढरपूरकर आनंदी

यंदाच्या वर्षी राज्यासह शेजारील कर्नाटक, आंध्रप्रदेश तसेच मध्यप्रदेशा मध्ये चांगला पाऊस झाल्याने आषाढी यात्रेला विक्रमी संख्येने भाविकांनी हजेरी लावलेली होती. प्रशासनाकडून जरी २७ ते २८ लाख भाविकांची संख्या सांगितली जात असली तरी शहरातील जाणकार व्यापारी मंडळींकडून आज पर्यंतच्या त्यांच्या अनुभवानुसार आजयर्पंतची विक्रमी यात्रा यावर्षी भरली असून यात्रेसाठी १८ ते २० लाखांच्या आसपास भाविकांची उपस्थिती असल्याचे त्यांच्याकडून सांगितले जाते आहे. त्यामुळे यावर्षी पंढरपूरकरांना यात्रा चांगली झाल्याने शहरात सर्वत्र आनंद आणि समाधानाची भावना आहे.

## डिजिटल फ्लेक्स लावण्यावरून मारहाण; तिघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

डिजिटल फ्लेक्स लावण्याच्या वादातून हॉकी स्टिकने मारहाण करून जखमी केल्याची घटना २१ जुलै रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास बेगम पेठ येथे घडली.याप्रकरणी शोएब अख्तर जाकीर हुसेन सय्यद (वय-२८,रा.बेगम पेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून इक्बाल सय्यद,महाफीज सय्यद व सफदर सय्यद सर्व राहणार बेगमपेठ यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल राठोड हे करीत आहेत.

# मंगळवेढ्यात अनेकांचा मनसेत प्रवेश; पदाधिकाऱ्यांची बैठक

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि. २१ जुलै-**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मनसेच्या पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील प्रमुख पदाधिकार्यांची बैठक मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी मंगळवेढा येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे पार पडली.



यावेळी मंगळवेढा तालुक्यातील विविध पक्षातील कार्यकर्ते पदाधिकार्यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या उपस्थितीत प्रवेश केला. यावेळी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी सांगितले की, येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये ताकतीने राज ठाकरे यांचा नेतृत्वाखाली सामोरे जाणार असून, गाव तिथे शाखा घर तिथे कार्यकर्ता हे अभियान राबवण्यात येत आहे. विविध पक्षातील लोक मनसेमध्ये प्रवेश करत आहेत. कायम मनसेचे कार्यालय विविध प्रश्न घेऊन येणाऱ्या नागरिकांनी भरलेले असते नागरिकांचा विशास कायम मनसेच्या सोबत असल्यामुळे येणार्या काळात या मतदारसंघातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत मनसेला यश मिळेल, असा विशास व्यक्त करत निवडणुकीसाठी मनसेच्या पदाधिकार्यांनी पूर्ण ताकतीनिशी कामाला लागावे.

पक्ष कायम पाठीशी राहिल असा विशास व्यक्त केला. यावेळी त्यांनी मनसेमध्ये अनेक पक्षाचे नेतेमंडळी पक्ष प्रवेश करत असल्याने आगामी काळात निष्ठावंत महाराष्ट्र सैनिक आणि नवीन लोकांचा मेळ घालून काम करण्याच्या सूचना पदाधिकार्यांना दिल्या. यावेळी व्यासपीठावर मनसेचे जिल्हाध्यक्ष प्रशांत गिड्डे, समन्वयक नारायण गोवे, उपजिल्हाध्यक्ष चंद्रकांत पवार, पंढरपूर तालुकाध्यक्ष शशिकांत पाटील, नूतन मंगळवेढा तालुका अध्यक्ष धनाजी गडदे, सांगोला तालुकाध्यक्ष अनिल केदार, विधानसभा अध्यक्ष अनिल बागल, शहराध्यक्ष संतोष कवडे, संघटक गणेश पिंपळनेरकर, विद्यार्थी सेनेचे शहराध्यक्ष अवधूत गडकरी व उपशहराध्यक्ष प्रदीप परचंडे, उप तालुकाअध्यक्ष कृष्णा ताड इत्यादी उपस्थित होते.

## बायकोशी का भांडतो या कारणावरून मारहाण

### तिघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

तू वारंवार तुझ्या बायको सोबत भांडण का करतो तुला लय मस्ती आली आहे का ? असे म्हणत हाताने लाथा बुक्यांनी मारहाण केल्याची फिर्याद अनिल सिद्राम मुशन (रा.गंगा चौक,नीलम नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे.हि घटना २० जुलै रोजी दुपार चार वाजण्याच्या सुमारास घडली.अनिल मुशन यांनी दिलेल्या फिर्यादीवरून स्वाती अनिल मुशन, कांचन निखिल कांबळे व निखिल साने (रा.नीलम नगर,गंगा चौक) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल गायकवाड हे करीत आहेत.

## 'ऑर्किड'च्या १२ विद्यार्थ्यांची कॉग्निझंट कंपनीत निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

प्रज्ञा निकेतन एज्युकेशन ट्रस्ट, पुणे संचलित नागेश करजगी ऑर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, सोलापूर या नामवंत अभियांत्रिकी महाविद्यालयाने आणखी एक अभिमानास्पद यश प्राप्त केले आहे. महाविद्यालयातील संगणक अभियांत्रिकी व आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स विभागांमधील १२ विद्यार्थ्यांची निवड कॉग्निझंट टेक्नोलॉजी सोल्युशन्स कॉर्पोरेशन या आघाडीच्या बहुराष्ट्रीय कंपनीत झाली आहे.


या विद्यार्थ्यांना जेन-सी प्रोफाईल अंतर्गत वार्षिक चार लाखाचे पॅकेज प्राप्त झाले असून, सिद्धेश शैलेन्द्र वाघमारे या विद्यार्थ्याने उल्लेखनीय यश मिळवत ६.७५ लाखाचे विशेष पॅकेजसह निवड झाली आहे. हे यश महाविद्यालयासाठी अत्यंत गौरवाची बाब असून विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे व शिक्षक अथक प्रयत्नांचे फलित आहे. ऑर्किडने यावर्षीही कॅम्पस प्लेसमेंट ची परंपरा जपत ४०० हून अधिक विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध करून दिली. संगणक व एआयडीएस विभागातील निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे- ऋतेश धीरज क्षीरसागर, मोहम्मद कामील, महम्मद रफी मुलाणी, कुळकर्णी सर्वेश श्रीपाद, अनिल सुरेश माळी, मुबाशीरिन अखलाक अहमद मौलवी, उमा कृष्णात पोरे, सिद्धेश शैलेन्द्र वाघमारे, समर्थ पाटील, रझा खान, रणजित शिंदे, प्रचित अंबालाल भिमनपल्ली, शादाब फर्मानुल्ला खान पठाण. विद्यार्थ्यांनी वेळेवर मार्गदर्शन घेतले, तांत्रिक व संवाद कौशल्ये विकसित केली व सातत्याने सराव केला, यामुळे हे यश शक्य झाले. याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त, प्राचार्य डॉ. बी.के सोनगे, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास मेतन, डॉ. व्ही. के. पत्की व ट्रेनिंग व प्लेसमेंट अधिष्ठाता डॉ. रवींद्र पाटील यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## प्रा. श्रीराम पुजारी जन्मशताब्दी निमित्त शुक्रवारपासून विविध कार्यक्रम

### तबला व पखवाज जुगलबंदीसह बासरी वादन, शास्त्रीय गायन होणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

प्रा. श्रीराम पुजारी जन्मशताब्दी निमित्त श्री हिराचंद नेमचंद वाचनालय व प्रा. श्रीराम पुजारी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २५ ते २७ जुलै दरम्यान चित्रफितीचे उद्घाटन, शास्त्रीय गायन आणि बासरी वादन यासह विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत, अशी माहिती श्री हिराचंद नेमचंद वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.



शुक्रवार दि २५ जुलै रोजी सायंकाळी ५.३० वाजता लोकमान्य टिळक सभागृहात स्व. श्रीराम पुजारी यांच्या जीवनावर आधारित चित्रफितीचे उद्घाटन माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी 'माझ्या आठवणीतले पुजारी सर' या विषयावर सुशीलकुमार शिंदे, सुप्रसिध्द चित्रपट अभिनेते, दिग्दर्शक जब्बार पटेल, विचारवंत व लेखक अच्युत गोडबोले आपले मनोगत व्यक्त करणार आहेत.शनिवार दि.२६ जुलै रोजी किर्लोस्कर सभागृहात सायंकाळी ५.३० वाजता आदरांजली झाकीर हुसेन यांना आदरांजली स्वरुपात यशवंत वैष्णव आणि सुखद मुंडे यांची तबला व पखवाज जुगलबंदी होणार आहे. यावेळी लेहरा अभिषेक शिनकर धरणार आहेत. दुस-या सत्रात ख्यातनाम गायक कैवल्यकुमार गुरव यांचे संध्याकाळी ६.४५ वाजता शास्त्रीय गायन होईल. रविवार दि. २७ जुलै रोजी किर्लोस्कर सभागृहात संध्याकाळी ५.३० वाजता पं. प्रवीण गोडखिंडी (धारवाड) यांचे बासरी वादन आयोजित करण्यात आले असून त्यांना तबल्यावर यशवंत वैष्णव साथ देणार आहेत. त्यानंतर संध्याकाळी ६.४५ वाजता विदुषी सुप्रसिध्द गायिका कलापिनी कोमकली यांचे शास्त्रीय गायन होणार असून त्यांना संवादिनीवर अभिषेक शिनकर व मयंक बेडेकर तबल्यावर साथ देणार आहेत. सर्व कार्यक्रम सर्वासाठी खुले आहेत.

सर्व रसिक श्रोत्यांनी कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस डॉ. नवनीत तोष्णीवाल, ललिता दातार, डॉ. विद्याधर बोराडे, मंजुषा गाडगीळ आदी उपस्थित होते.

## निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना थेट डिबीटी मार्फत अनुदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

शासनाचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून राज्य व केंद्र पुरस्कृत योजनेत समाविष्ट असलेल्या लाभार्थ्यांकरीता यापुर्वी बीम्स प्रणालीवर प्राप्त होणाऱ्या अर्थसहाय्याचे वितरण तहसिल स्तरावरून बँकेत पाठवून संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यावर वर्ग केले जात होते. तथापि शासनाच्या धोरणानुसार माहे डिसेंबर २०२४ पासून संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ राज्य निवृत्ती वेतन या योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या लाभार्थ्यांचे अनुदान राज्यशासनामार्फत डिबीटी प्रणालीद्वारे थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ राज्य निवृत्ती योजनेतील ज्या लाभार्थ्यांनी अद्यापही डिबीटी पोर्टलवर माहिती अपलोड केलेली नाही. त्याची यादी उपविभागीय अधिकारी क्र.१, उपविभागीय कार्यालय, सोलापूर, २, तहसिलदार उत्तर, सोलापूर ३ विभागीय अधिकारी, विभागीय कार्यालय क्र.३, सोलापूर महानगरपालिका,सोलापूर, विभागीय अधिकारी, विभागीय कार्यालय क्र.८, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर, परिमंडळ अधिकारी अ,ब,क, ६. मंडळ अधिकारी कसबे सोलापूर, सतलाठी कसबे सोलापूर. तरी वरील ठिकाणी प्रसिध्द करणेत आलेल्या यादीतील लाभार्थी यांनी तात्काळ आपली माहिती डिबीटी करणेकामी बँक पासबुक, आधारकार्ड, (आधार कार्ड व मोबाईल नंबर बँकेच्या खात्याला लिंक मोबाईल नंबर, आधार कार्डला लिंक असलेले), शिधापत्रिका, अपंग प्रमाणपत्र, विधवा महिलेच्या बाबतीत पती मृत्यू दाखला इ. आवश्यक कागदपत्रासह दि. ३१ जुलै पूर्वी संजय गांधी शहर शाखा कार्यालय, जुने जिल्हाधिकारी कार्यालय आवार येथे संपर्क साधल्यास डीबीटी प्रणालीमध्ये लाभार्थ्यांचे नाव समाविष्ट करण्याची कार्यवाही करण्यात येईल. जे लाभार्थी डीबीटी प्रणालीमध्ये नाव समाविष्ट करणेकामी दि.३१ जुलै पूर्वी आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास जमा करणार नाहीत ते लाभार्थी अनुदानापासून वंचित राहतील. तसेच ज्या लाभार्थ्यांची माहिती विहीत मुदतीत प्राप्त होणार नाही अश्या लाभार्थ्यांची नावे वगळण्यात येतील याचीही नोंद घ्यावी. अशी माहिती संजय गांधी निराधार योजना शहरच्या तहसीलदार शिल्पा पाटील यांनी कळविले आहे.

# इंदापूरच्या स्वामी भक्तांचा समर्थ सेवा पुरस्काराने सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि २२ जुलै-**

इंदापूर (जि. पुणे) येथील श्री स्वामी समर्थ सेवा संघाच्यावतीने तालुक्यातील ३६ गावांमध्ये श्री स्वामी समर्थ महाराजांची आरती आणि नामजपाचे धार्मिक कार्य नियमित सुरू आहे. त्यापैकी १७ गावातील स्वामी भक्तांना येथील श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान कार्यालयात इंदापूर समर्थ सेवा पुरस्काने देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांच्या हस्ते सन्मानीत करण्यात आले.

इंदापूर तालुक्यातील निमगाव केतकी येथील स्वामीभक्त हनुमंत काळे यांनी हा उपक्रम सुरू केला. मंदिर समितीच्या वतीने श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून पुरस्कार प्राप्त स्वामी भक्तांचा सन्मान करण्यात आला. यावेळी श्री स्वामी समर्थ सेवा संघाच्यावतीने महेश इंगळे व प्रथमेश इंगळे यांचाही हनुमंत काळे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. याप्रसंगी बोलताना हनुमंत काळे यांनी इंदापूर तालुक्यातील निमगाव केतकी, कौठळी, निमसाखर, दगडवाडी, व्याहळी, शिरसटवाडी, तरंगवाडी, कळंब, निरवांगी, सराफवाडी, बावडा, काळेवाडी नंबर एक, शेळगाव, काळेवाडी नंबर दोन, रेडा, खोरोची, रेडणी,बोराटवाडी,



चाकाटी, पिठेवाडी, निरनिमगाव, लाखेवाडी, काटी, वरकुटे खुर्द, साखरे वस्ती, खोरोची, घोरपडवाडी, मानेवस्ती, निरवांगी, भगतवाडी, पिटकेश्वर, शहाजी नगर, बोरी, पोंदकुलवाडी, डाळज नंबर एक, सराटी, जाधववाडी काठी, पंधारवाडी इत्यादी गावांमध्ये श्री स्वामी समर्थ महाराजांची नियमीत आरती व दर गुरूवारी नामजपाचा संकल्प कार्यान्वित आहे. पुढे जाऊन एकूण ६५ स्वामी सेवेकरी यांना समर्थ सेवा पुरस्कार प्रदान करण्याचे नियोजन आहे. इंदापूर तालुक्यामध्ये ३६ गावांपैकी १२ गावांमध्ये दर पौर्णिमेला श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पालखीचा सोहळा साजरा केला जातो. इंदापूर तालुका श्री स्वामी समर्थ सेवा संघाने चालू वर्षी निमगाव केतकी ते अक्कलकोट पायी पालखी सोहळा आयोजित केलेला आहे.

या सोहळ्यासाठी लागणारा रथ संघाने विकत घेतलेला आहे. यावेळी मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, प्रा. शिवशरण अचलेर, विद्याधर गुरव, प्रसाद पाटील, खाजप्पा झंपले, प्रसाद सोनार, श्रीकांत मलवे, दर्शन घाटगे, विपूल जाधव, सागर गोंडाळ, महिंद्रकर उपस्थित होते.

## महत्वाचे...



## डिजिटल पत्रकारितेवर भर देण्याची गरज : पत्रकार राजा माने

**मंगळवेढा, दि.२१ जुलै-**

डिजिटल पत्रकारितेचा भविष्यातील मार्ग हा वर्गणी, गुणवत्ता आणि विशिष्ट वाचकवर्गावर केंद्रित असणार आहे. विश्वासार्हता, पारदर्शकता आणि आर्थिक स्थैर्य राखण्यासाठी डिजिटल पत्रकारितेवर भर देण्याची गरज असल्याचे मत डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्रचे संस्थापक अध्यक्ष राजा माने यांनी व्यक्त केले. पत्रकार भवन येथे आयोजित डिजिटल मिडीया महाराष्ट्र राज्य पदाधिकारी निवड व आढावा बैठक प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर शशिकांत देशमुख, सतीश सावंत, दिगंबर भगरे, प्रविण नागणे, सचिन कुलकर्णी, नागनाथ सुतार, कबीर देवकुळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रविण नागणे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन संतोष मिसाळ यांनी केले तर प्रास्ताविक भीमराव मोरे यांनी केले. आभार सचिन हेंबाडे यांनी मानले. यावेळी पत्रकार रजाक मुजावर, ज्ञानेश्वर भगरे, महादेव धोत्रे, प्रमोद बिनवडे, बाबासाहेब सासणे, समाधान फुगारे, मोहन माळी, बापू मासाळ, सुरेश कॅगार, प्रसाद कसबे, राहुल मस्के, दत्ता कांबळे, दादासाहेब लवटे, अमर सावंत, महेश वठारे, येताळा खरबडे, हणमंत शिवशरण उपस्थित होते.



## समर्थ पार्क येथे लक्ष्मी थंडी उत्सव

**अक्कलकोट, दि.२२ जुलै-**

समर्थ पार्क मैंदर्गी रस्ता येथे लक्ष्मी थंडी उत्सव साजरा करण्यात आला. श्री लक्ष्मी देवीला अभिषेक, पूजा, नैवेद्य, आरती, महाप्रसाद वाटप करण्यात आले. यावेळी बिराजदार, हिरकांत जामदार, विश्वनाथ सुतार, सागर इंगळे, मनोज जाधव, वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, प्रविण देशमुख, योगेश बासरकर, संदीप सलगरे, महेश बंदिछोडे, पंचायत समिती माजी सदस्य सिद्धाराम मठपती, धर्मणा गंगनळी, सचिन पवार, बालाजी हादवे, संजय लिंबिटे, महेश लिंबितोटे, संतोष तोकणुरे, मनीषा मोरे, गद्रे गणेश माळी, जयश्री आवळे, सुधाकर काशेट्टी, चन्नवीर स्वामी, रमेश देसाई, स्मिता नंदकुमार जगदाळे, किशोर खरात, रत्नाकर गुरव, गायकवाड, बाळासाहेब मोरे आदी उपस्थित होते .



## संत नामदेव विठ्ठल मंदिरात मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबीर

**सोलापूर, दि. २२ जुलै-**

बाळीवेस परिसरातील संत नामदेव विठ्ठल मंदिरात श्री. संत शिरोमणी नामदेव महाराज परिवार व संत जनाबाई यांच्या ६७५ व्या अमृत महोत्सव संजीवनी समाधी सोहळा प्रित्यर्थ मिश्रीबाई गुलाबचंद तोष्णीवाल नेत्रपेढी व नामदेव विठ्ठल मंदिर विश्वस्त मंडळ यांच्यावतीने मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबीर घेण्यात आले. सद्‌गुरु श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या उपस्थितीत शिबीर घेण्यात आले. डॉ. नवनीत तोष्णीवाल डॉ. निखील तोष्णीवाल, व डॉ. ऋषभ शहा यांनी नेत्र रुग्णाची तपासणी केली. शिबीरात १५० पेक्षा जास्त लोकांनी सहभाग नोंदविला व त्यापैकी ४० नेत्ररुग्णांची मोफत नेत्र शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली. उपक्रमास २५ वर्षांपासून मोफत योगदान देत असलेले डॉ. नवनीत तोष्णीवाल यांचा सत्कार सद्‌गुरु श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास मंदिराचे अध्यक्ष मुरलीधर रेळेकर उपस्थित होते. सूत्रसंचालन शिवराज नगरकर यांनी केले तर आभार बाळकृष्ण राशिनकर यांनी मानले. यावेळी महेश रेळेकर, दास पतंगे, प्रकाश ढवळे, अनिल बोडगे, नागेश राशिनकर, सचिन बारटक्के, गोवर्धन निकते, वासुदेव सोडाळ, मनोज भस्मे, समर्थ नगरकर, ओम भस्मे यांनी परिश्रम घेतले.

## 'सिंहगड'मध्ये उद्या आंतरराष्ट्रीय कार्यशाळा

**सोलापूर, दि. २१ जुलै-**



सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात येत्या गुरुवारी (ता. २४) भारत आणि दक्षिण कोरिया अशा द्विपक्षीय आंतरराष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन केल्याचे माजी कुलगुरू तथा सिंहगड इन्स्टिट्यूटच्या सीआरटीडीचे संशोधन संचालक डॉ. शिवाजी पवार यांनी सांगितले. रेशीम शेतीसह मूल्यवर्धित औषधी उत्पादने' या विषयावरील एकदिवसीय आंतरराष्ट्रीय कार्यशाळा होणार आहे. याचा विद्यार्थ्यांना खूप फायदा होणार आहे. दक्षिण कोरियातील डोंगगुक विद्यापीठाचे उपाध्यक्ष प्रा. जंग सुक सुंग यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय कार्यशाळेचे उद्घाटन आणि आंतरराष्ट्रीय सामंजस्य करार दस्तऐवजांचे प्रकाशन होणार आहे. यावेळेस कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले यांची उपस्थिती राहणार आहे. तुतीच्या अर्कासह नॅनोकणांचे हिरवे संश्लेषण, औषध म्हणून तुती, तुतीसह रेशीम किड्यांद्वारे रेशीमचे फायटोफॉर्म्युलेशन, शेती ते कापड, रेशमाची गुणवत्ता वाढवण्याचा एक नाविन्यपूर्ण मार्ग आदी विषयांवर मार्गदर्शन मिळणार आहे. त्यानंतर युजीआरएससाठी खुली परीक्षा होणार आहे. तज्ञांसोबत गोलमेज चर्चा होऊन कार्यक्रमाचा समारोप होणार आहे.

# १४ हजार विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती जमा

### संस्थांकडे अजून १४ हजार अर्ज शिल्लक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

विविध शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेत असलेल्या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचे चौदा हजार शिष्यवृत्तीधारकांचे अर्ज संस्थांकडे शिल्लक आहेत. ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज सामाजिक न्याय विभागाच्या कार्यालयात जमा झाले आहेत, अशा १३ हजार ६४५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर झाली असून, त्यांच्या बँक खात्यात पैसे जमा झाले आहेत. शहर-जिल्ह्यातील अनेक शैक्षणिक संस्थांच्या शाळा-महाविद्यालयात अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकारच्या वतीने शिष्यवृत्ती देण्यात येते. या शिष्यवृत्तीचे १४ हजार विद्यार्थ्यांचे अर्ज अद्यापही विविध शैक्षणिक संस्थांकडे शिल्लक आहेत. संस्थांच्या चुकांमुळे अद्याप १४ हजार विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिले आहेत. गत आर्थिक वर्षातील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचे अर्ज शिल्लक राहिले असून ते अर्ज संस्थाकडून वेळेत दाखल केले तर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्यास मदत होणार आहे.

> शिष्यवृत्तीमुळे गरीब व सामान्य विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण करण्यास मदत होते. त्यामुळे ज्या शाळा-महाविद्यालयाकडे अर्ज राहिले आहेत. अशा संस्थांकडून अर्ज देण्याची सूचना दिलेली आहेत. एकही विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाही, याची काळजी घेण्यात येत आहे . पात्रताधारक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचे प्रयत्न सुरू आहेत.
>
> **- सुलोचना सोनवणे,**
> सहायक आयुक्त सोलापूर

# बालाजी चित्रमंदिराचा परवाना रद्दच राहणार

### विभागीय आयुक्तांचा निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथील बालाजी चित्रमंदिरचा परवाना रद्द करण्यासंदर्भातील सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाविरोधातील याचिका विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी फेटाळून लावली आहे. त्यामुळे आता चित्रमंदिराचा परवाना सध्या तरी रद्दच राहणार आहे.

शंकर म्हेत्रे यांनी ही याचिका दाखल केली होती. बालाजी चित्रमंदिराचा परवाना रद्द केल्यामुळे २० कामगार व त्यांच्या कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. दुधनी परिसरात २५ कि.मी. च्या आत दुसरे कोणतेही मनोरंजनाचे साधन नसल्याने बालाजी चित्रमंदिर सुरू ठेवण्याची मागणी त्यांनी केली होती. तसेच राजकीय द्वेषातून आपला परवाना रद्द केल्याचा आरोपही याचिकाकर्त्यांच्यावतीने करण्यात आला होता.

मात्र, जिल्हा प्रशासन आणि पोलीस यांच्याकडून गंभीर आरोप करण्यात आले. पोलीस निरीक्षकांनी अहवालात नमूद केले की, बालाजी चित्रमंदिराच्या वरच्या मजल्यावर जुगाराचे अड्डे सुरू होते. २०२१ साली दोनवेळा छापे टाकण्यात आले असून लाखोंच्या रोख रकमा व साहित्य जप्त करण्यात आले होते. पोलिसांची कारवाई चुकवण्यासाठी संशयितांना तिकिट देऊन चित्रपटगृहात लपवण्याचा दावा सरकारच्यावतीने करण्यात आला. सदर परवाना २०१८ नंतर नूतनीकरणासाठी सादर करण्यात आला नव्हता. तसेच २०२१-२६ या कालावधीसाठी परवाना दोन इतर व्यक्तींना भाडेतत्त्वावर देण्यात आला होता, जे परवान्याच्या अटींचे उल्लंघन होते, असा युक्तिवाद सरकार पक्षातर्फे करण्यात आला.

या सर्व बाबींचा विचार करून विभागीय आयुक्तांनी जिल्हाधिकाऱ्यांचा परवाना रद्द करण्याचा आदेश योग्य आहे. अपील क्रमांक SR/०१/२०२५ फेटाळण्यात आला.

## मंद्रुपजवळ टमटम पलटी होऊन चालक जखमी

**सोलापूर, दि. २२ जुलै-**

टमटम पलटी होऊन झालेल्या अपघातात ३५ वर्षीय तरुण जखमी झाला. हा अपघात मंगळवारी दुपारी १.३० च्या सुमारास मंद्रुपपासून तीन किलोमीटर अंतरावर घडला. या अपघातात टमटम चालक जखमी झाला. मोहम्मद युसूफ खान (वय ३५, रा. मंद्रुप ता द सोलापूर) असे जखमी टमटम चालकाचे नाव आहे. मंगळवारी दुपारी दीडच्या सुमारास मोहम्मद हा टमटम चालवित कुसूरहून मंद्रुपच्या दिशेने येत होता. मंद्रुपपासून तीन किलो मीटर अलिकडे काळेवस्तीजवळ अचानक टमटम पलटी झाली. या अपघात चेह-याला आणि डोक्याला जखम झाल्याने मंद्रुप येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून मित्र आसिफ नदाफ याने ३.१० वाजता शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## नई जिंदगी परिसरात एकाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

अज्ञात कारणातून नई जिंदगी परिसरातील विजय लक्ष्मी नगरात मंगळवारी दुपारी एकच्या सुमारास राहत्या घरात साडीने गळफास घेऊन एकाने आत्महत्या केली. महेबूब अब्दुलहक कुरेशी (वय ४५, रा.बेरिया हॉलजवळ, सध्या- विजय लक्ष्मी नगर, नई जिंदगी, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. महेबूब हे काही दिवसांपासून नई जिंदगी परिसरातील विजय लक्ष्मी नगरात राहण्यास गेले होते.

मंगळवारी दुपारी एकच्या सुमारास त्यांनी तेथील राहत्या घराच्या पहिल्या मजल्यावरील खोलीत, पंख्याच्या हुकाला साडीने गळफास घेतला. ही बाब नातेवाईकांना समजताच, त्यांनी त्यांना खाली उतरवले, त्यांनतर बेशुध्द अवस्थेत एमआयडीसी पोलीस ठाण्यातील हवालदार गायकवाड यांनी उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु उपचारापूर्वी ते मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## एफआरपी वाढीच्या निर्णयामुळे यंदा दरवाढ शक्य

**पिलीव, दि.२२ जुलै-**

राज्यात सर्वाधिक साखर कारखाने असलेल्या सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी महाराष्ट्रात अनेक शेतकरी चांगली ऊस शेती करतात. सोलापूर जिल्हा तर अक्षरशः ऊसाचे मोठे आगरच आहे कारण सोलापूर जिल्हयात सगळयात जास्त साखर कारखाने आहेत.गेलया वर्षीपासून खरेतर ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊसाला चांगला दर मिळत आहे. जवळपास ३००० किंवा त्यापेक्षा अधीक ऊस दर शेतकऱ्यांना मिळाला होता .पण यंदाच्या हंगामात केंद्र शासनाने एफ आरपी दरात प्रती टन जवळपास १५० रुपयाची वाढ केलेली आहे. यामुळे शेतकऱ्यांना यंदाच्या गळीत हंगामात चांगला ऊस दर मिळण्याची शक्यता आहे. या निर्णयामुळे खरेतर शेतकरी मोठ्या प्रमाणात ऊस शेतीकडे वळल्याचे सोलापूर जिल्हयासह माळशिरस तालुक्याचे चित्र आहे. शासकीय कारखाने किंवा खाजगी कारखाने असो शेतकऱ्यांना सध्याच्या काळात होणाऱ्या खर्चाचा विचार करणा चांगला दर देणे अपेक्षित आहे. वाढता मशागतीचा खर्च, नंतर ऊस जाईपर्यंत होणारा खतांचा वापर तसेच बांधणी खर्च या सगळ्यांचा ताळमेळ लावुन उसाला योग्य तो दर शासनाने देणे अतिशय गरजेचे आहे. अन्यथा शेतकऱ्यांना ऊस सध्या च्या काळात अजिबात परवडत नाही. यंदाच्या गळीत हंगामापासुन शासनाने ऊस दराच्या एफ आरपी मध्ये १५० रुपयाची वाढ करुन थोडासा दिलासा दिला आहे. पण सध्याच्या काळात मशागतीपासुन शेतीचा होणारा खर्च काढला तर शेती अजिबातच परवडत नाही. असे विदा रक चित्र सध्या समाजात सर्वत्र पाहवयास मिळत आहे.

## चन्नवीर चिट्टे मित्र परिवारातर्फे वह्या, शालेय साहित्याचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ५५ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून मड्डी वस्ती येथील भारत विकास विद्यालयातल्या विद्यार्थांना वह्या व शालेय साहित्यांचे वाटप चन्नवीर चिट्टे मित्र परिवाराच्या वतीने करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना सामाजिक कार्यकर्ते संजय कणके म्हणाले, सामान्य माणसांच्या व्यथा जाणून संवेदनशीलता जपत आधुनिक विकासाचा जो दृष्टिकोन मुख्यमंत्र्यांचा आहे तोच धागा पकडून सामाजिक बांधिलकी व आपुलकीचं नातं जपत चन्नवीर चिट्टे मित्र परिवाराचं काम सुरू आहे. मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून गरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी वह्या व शालेय साहित्याचे वाटप करून बाळगोपाळांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवल्याबद्दल मित्र परिवाराचे त्यांनी कौतुक करत शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी संजय पुजारी, भिमाशंकर बिराजदार व भारत विकास विद्यालयाचे मुख्याध्यापक राधेशाम ओझा यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पप्पू क्षीरसागर, श्रीनिवास दासरी, कल्याण करजगी, साईनाथ सज्जे, गुरुनाथ कोळी श्रीनाथ संदुपटला, महेश हलसगी, रवी शहापुरकर, रवी कोळी, सोमनाथ कलशेट्टी, आनंद पाटील, सद्दाम कोसगीकर यांनी परिश्रम घेतले.

## श्रावणमासानिमित्त गौडगावच्या जागृत मारूती मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

गौडगांव बु., (ता. अक्कलकोट) येथील दक्षिण मुखी श्री जागृत मारुती मंदिरात श्रावणमासानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमासह भजन, कीर्तन व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. शनिवार व मंगळवार या दिवशी सकाळी ते रात्री उशिरापर्यंत श्री मारुती अन्नछत्र मंडळात महाप्रसाद चालू राहणार आहे. अन्नदान सेवेत सहभाग घेणाऱ्यांनी मंदिराच्या विश्वस्त यांच्याशी संपर्क साधावा, अशी माहिती मंदिर समितीचे अध्यक्ष श्रीकांत खानापुरे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

हेमाडपंथीय रामदास स्वामी स्थापित श्री जागृत मारुती मंदिर हे दक्षिण मुखी आहे. या श्रावण महिन्यात येणाऱ्या प्रत्येक भाविकांच्या मनोकामना पूर्ण होतात. अनेक भाविकांकडून म रुतीस रुद्राभिषेक केला जातो. गौडगांवच्या जागृत मारुती मंदिरात महिनाभर चालणाऱ्या श्रावणमास निमित्त मंदिरात रात्री ७ ते १ वाजेपर्यंत भजन कीर्तन यांच्यासह विविध धर्मिक, कार्यक्रम पार पडणार आहेत. पहाटे ४ वाजेपासुन मारूतीस म हारूद्राभिषेक, अभिषेक, नवग्रह पुजा, शनिपुजा व होमहवन यज्ञाचा कार्यक्रम होणार आहे. राज्य व पराराज्यातून येणाऱ्या भाविक भक्तांना दर्शनाची सुलभ सोय व्हावी म्हणून योग्य ती खबरदारी मंदिर समितीकडून घेतली जाणार आहे. मंगळवार व शनिवार दुपारच्या महाआरतीमध्ये रांगेत प्रथम उभे असणाऱ्यांना आरतीचा मान मिळणार आहे.



नवसाला पावणाऱ्या या मंदिराची महती राज्याच्या कानाकोपर्यात पोहोचल्याने महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश व देश भरातुन भाविक दाखल होणाचा अंदाज आहे. महिनाभर चालणाऱ्या कार्यक्रमात भक्तांना कोणतेही त्रास होऊ नये म्हणून सर्व परीने सुख, सुविधा व व्यवस्था करण्यात येत आहे. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी गौडगांव अन्नछत्र मंडळात सकाळी ७ ते संध्याकाळी ८ वाजेपर्यंत महाप्रसाद दिला जाणार आहे. तरी मारुती भक्तांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष श्रीकांत खानापुरे यांनी केले आहे.



## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त १५५ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ५५ व्या वाढदिवसानिमित्त जनआधार फाऊंडेशनचे संस्थापक आनंद गोसकी यांच्या पुढाकाराने १५५ रक्तदात्यांनी स्वयंस्फूर्तीने उत्स्फूर्तपणे रक्तदान केले.

भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवस जनआधार फाउंडेशनचे संस्थापक आनंद गोसकी यांच्या कल्पकतेतून गेल्या अनेक वर्षांपासून सेवादिवस म्हणून साजरा करण्यात येतो. या सेवा दिवसानिमित्त गरजूंना ब्लॅंकेट वाटप, अन्नधान्य वाटप, आरोग्य शिबीर आणि रक्तदान शिबीर असे विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध होत नाही, अशा वेळी रुग्णांना अनेक कठीण परिस्थितीशी सामना करावा लागतो, याचे गांभीर्य लक्षात घेऊन गरजू रुग्णांना वेळेवर मोफत रक्त मिळावे, या भावनेने आनंद गोसकी गेल्या अनेक वर्षांपासून रक्तदान शिबिराचे आयोजन करीत आले आहेत. यंदाचे हे सातवे वर्ष होते.

# बार्शीत कर्जमाफीसाठी शेतकऱ्यांनी काढला मोर्चा

### तहसीलदारांना दिले निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२१ जुलै-**

अखिल भारतीय किसान सभेच्यावतीने भगवंत मैदानापासून शेतकऱ्यांचा तहसील कार्यालयावर कॉम्रेड प्रा. तानाजी ठोंबरे यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढण्यात आला. यावेळी श्री शिवछत्रपती यांच्या जयजयकाराच्या घोषणा देण्यात आल्या. मोर्चात महिला व पुरुष सहभागी झाले होते.



मोर्चा कचेरीवर जातच सभेत रूपांतर झाले. यावेळी कॉम्रेड तानाजी ठोंबरे, रामराजे पवार, हरी पवार, लहू आगलावे, लक्ष्मण घाडगे, सतीश पाटील यांची भाषणे झाली. सभेचे संचलन कॉम्रेड ए.बी. कुलकर्णी यांनी केले. यावेळी अक्कलकोट येथील संभाजी ब्रिगेडचे प्रवीण गायकवाड यांना तसेच कृषिमंत्री रम्मी प्रकरणात लातूर येथील विजय घाडगे यांना झालेल्या मारहाण प्रकरणाचा मोर्चेकरांनी निषेध नोंदवला. तहसीलदार एफ. आर. शेख यांनी निवेदन स्वीकारले. यावेळी कॉ. प्रविण मस्तुद, अनिरुद्ध नखाते, बालाजी शितोळे, आनंद गुरव, चंद्रकांत मंडलिक, बंकुरे नाना, राहुल ठोंबरे, प्रमिला शिंदे, सुरेश कुंभार, सतीश गायकवाड, शितल करडे, शुभांगी दुधाळ, सुनीता निकम, अशा घळके उपस्थित होते.

निवेदनातील मागण्या पुढीलप्रमाणे : उत्पादन खर्चावर आधारित पिकांना हमीभाव द्या, शेतकऱ्यांचे कर्ज माफ करा व सातबारा कोरा करा, बँकेतून शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करा व सावकाराशाहीतून सुटका करा, गेल्या वर्षीची पिक विम्याची थकबाकी त्वरीत द्या, एक रुपया विमा योजना चालू राहू द्या, स्पिंकलर व सौर ऊर्जा प्रकल्प पूर्णपणे मोफत द्या, उजनी धरणातून बार्शी तालुक्याला शेतीसाठी दोन टीएमसी पाणी द्या, शक्तिपीठ महामार्ग रद्द करा, सुरत चेन्नई संपादित केलेल्या जमिनीला वाढीव दरवाढ द्या, मागेल त्याला वीज कनेक्शन व वीज पुरवठा करा, ग्रामीण भागातील रस्ते दुरुस्त करा, वाहतुकीची एसटीची सोय तातडीने करा, संतनाथ गृहनिर्माण सोसायटी वैरागकडून फसवल्या गेलेल्या शेतकऱ्यांच्या शेतीवरील जप्ती त्वरित थांबवा, योग्य दरात खते बी बियाणे अवजारे यांचा पुरवठा करा, बनावट खते व बी बियाणे विकणाऱ्या विक्रेत्यांवर कठोर कारवाई करा, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची त्वरित भरपाई द्या, रेशन घेतल्यानंतर पावती द्या, ग्रामीण भागात कायदा सुव्यवस्था निर्माण करा स्त्रियांचे संरक्षण करून भयग्रस्त वातावरण दूर करा, स्मार्ट मीटर लावणे बंद करा.

CMYK

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## इमिटेशन फॅशन ज्वेलरीचे शनिवारी प्रशिक्षण

**सोलापूर, दि.२२ जुलै-**

पद्मशाली सखी संघम, कल्पना दिव्यांग महिला उद्यमिता समूह (पुणे) आणि पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने समस्त महिलांसाठी विशेष उपक्रम म्हणून व स्वतःच्या पायांवर उभे राहण्यासाठी इमिटेशन ज्वेलरी (फॅशन) प्रशिक्षण शनिवार २६ जुलै रोजी आयोजन केले आहे,

अशी माहिती, पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी व पद्मशाली सखी संघमच्या अध्यक्षा मेघा इट्टम, सल्लागार ममता मुदगुंडी यांनी दिले आहे. महिलांना स्वयंरोजगार मिळावे या हेतूने हा उपक्रम हाती घेतल्याचे संस्थापक गौरीशंकर कोंडा यांनी सांगितले. कन्ना चौकाजवळील पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयाच्या विणकर सभागृहात शनिवार २६ जुलै रोजी सकाळी १०.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत तर, दुपारी ३ ते ६ अश्या दोन सत्रात होईल.



याचे प्रशिक्षण पुण्याच्या अर्चना कापरे आणि सहकारी देणार आहेत. या प्रशिक्षणासाठी प्रति व्यक्ती रुपये ३००/- शुल्क असून, प्रशिक्षणासाठी लागणा-या वस्तू यातूनच दिले जातील.

इमिटेशन फॅशन ज्वेलरी प्रशिक्षणानंतर (तयार केल्यानंतर) स्वतःच घेऊन जायचे आहे. २०२४ मध्ये झालेल्या पद्मशाली सखी संघमच्या सक्रीय असलेल्या महिला पदाधिकारी व सदस्यांना प्रवेश मोफत असेल. अधिक माहितीसाठी सल्लागार ममता मुदगुंडी ९१७५९८८९४० यांच्याशी संपर्क साधावेत.

## महत्वाचे...



### मोट्याळचे प्रशांत काळे यांची लोहारा बाजार समितीच्या सभापती निवड

**अक्कलकोट दि.२२ जुलै-**

तालुक्यातील मोट्याळचे सुपुत्र प्रशांत उर्फ बच्चन काळे यांची धाराशिव जिल्ह्यातील लोहारा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती पदी बिनविरोध निवड झाली आहे. त्याबद्दल विनोद पवार, रियाज सय्यद मित्र परिवार व मोट्याळ ग्रामस्थ यांच्या वतीने मोट्याळ हनुमान मंदिरात त्यांचा नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी उपसभापती नेताजी शिंदे, संचालक दीपक मुळे, बाबा सूर्यवंशी, हरी लोखंडे तसेच सर्व संचालकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नायब तहसीलदार रियाज कुरणे, हन्नुर ग्रा. पं. सदस्य गौतम बाळशंकर, माजी सरपंच अनिल साळुंखे, ग्रा पं सदस्य आप्पाराव साळूंके, सत्यवान पाटील, दिगंबर साळुंके, तानाजी जंगाले, कांत पवार, बक्षुभाई जमादार, मेजर इस्माईल कुरणे, प्रवीण काळे, सप्नील सपकाळ, राम काळे, महेश सुतार, धनंजय काळे, बाळप्पा जाधव आदी उपस्थित होते. रहूप मुल्ला यांनी सूत्रसंचालन केले. धनंजय पवार यांनी आभार मानले.

### सोजर कॉलेज ऑफ फार्मसीत ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु

**बार्शी, दि.२२ जुलै-**

खांडवी (ता. बार्शी) येथील सोजर कॉलेज ऑफ फार्मसी येथे डी. फार्मसी प्रथम वर्षासाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया ही दि. २३ जुलैपासून संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु झाली आहे. या महाविद्यालयाला तंत्रशिक्षण मंडळाकडून अधिकृत प्रवेश सुविधा केंद्र (FC) म्हणून मान्यता प्राप्त झाली असून विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेतील सर्व सेवा महाविद्यालयातच उपलब्ध आहेत.




विद्यार्थी अर्ज भरताना दोन पर्यायांपैकी कोणताही एक पर्याय निवडू शकतात. ई-स्क्रुटिनी मोडमध्ये विद्यार्थी घरुनच ऑनलाईन अर्ज भरुन आवश्यक कागदपत्रे अपलोड करुन प्रक्रिया पूर्ण करु शकतात. त्यांची अर्ज पडताळणी ऑनलाईनच संबंधित एफसी केंद्रामार्फत केली जाते. फिजिकल स्क्रुटिनी मोडमध्ये विद्यार्थी महाविद्यालयात प्रत्यक्ष येऊन अर्ज भरतात, कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करतात आणि अर्जाची पडताळणी देखील येथेच होते. ऑनलाईन नोंदणी व कागदपत्र पडताळणीची अंतिम तारीख २५ ऑगस्ट आहे. तात्पुरती गुणवत्ता यादी २८ ऑगस्ट रोजी जाहीर होणार असून तक्रार निवारण कालावधी २९ ऑगस्ट ते १ सप्टेंबर पर्यंत आहे. अंतिम गुणवत्ता यादी ३ सप्टेंबर २०२५ रोजी जाहीर केली जाईल. प्रवेशासाठी पात्रता १२ वी (HSC) विज्ञान शाखेतील उत्तीर्ण विद्यार्थी (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र/गणित विषयासह). अर्ज शुल्क सामान्य प्रवर्गासाठी रू. ४००/- आणि राखीव प्रवर्गासाठी रू. ३००/- असून हे फक्त ऑनलाईन पद्धतीने भरायचे आहे. संपूर्ण माहिती, सूचना व कागदपत्रांची यादी अधिकृत संकेतस्थळ https://phd25.dtemaharashtra.gov.in वर उपलब्ध आहे. सर्व इच्छुक विद्यार्थ्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन प्रवेशाकरिता सोजर कॉलेज ऑफ फार्मसी, बार्शी येथे संपर्क साधावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुजित करपे व संस्था अध्यक्ष अरुण बारबोले यांनी केले आहे.



### पालकांनी मुलांवर पर्यावरणाचे संस्कार रुजवावेत : डॉ. हिरेमठ

**सोलापूर, दि. २२ जुलै-**

पालकांनी मुलांवर पर्यावरणाचे संस्कार रुजवावेत. त्यातूनच शाश्वत विकास होऊ शकतो, असे मत पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. राजशेखर हिरेमठ यांनी येथे व्यक्त केले. भाई छन्नुसिंह चंदेले समाजकार्य महाविद्यालय, राष्ट्रमाता इंदिरा प्राथमिक शाळा आणि देशभक्त भाई छन्नुसिंह चंदेले माध्यमिक विद्यालयाच्या वतीने 'एक पेड माँ के नाम' उपक्रमांतर्गत पालकांना रोपांचे वाटप डॉ. हिरेमठ यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी भाई छन्नुसिंह चंदेले स्मृती केंद्राचे अध्यक्ष हेमू चंदेले, विश्वस्त डॉ. रोझा चंदेले-पाराशर, अमेरिकेतील झेवियर विद्यापीठातील प्रा. डॉ. अश्विनी कानडे, प्रा. ज्योती पवार, डॉ. निहाल बुरटे, सुरज गुंगे, विपुल बंकापूरे, राहुल चंदेले, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य एस. बी. गायकवाड, मुख्याध्यापक महादेव तोळणूर आदी उपस्थित होते. डॉ. पराशर यांनी महाविद्यालय शाळेच्या प्रगतीचा आढावा घेतला. त्यांनी विद्यार्थ्यांसाठी संस्था राबवत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. डॉ. अनुराधा जाधव, श्रीदेवी येळमेली यांनी सूत्रसंचालन केले. चंदाराणी गुंड यांनी आभार मानले.

# 'जकराया'चा गॅस निर्मिती प्रकल्प देशात अव्वल

### जकराया शुगरने केले यशाचे आणखी एक शिखर सर

**तभा वृत्तसेवा,**
**वाळूज, दि.२२ जुलै-**

मोहोळ तालुक्यातील वटवटे येथील जकराया साखर कारखाना उपपदार्थ निर्मितीचे वेगवेगळे प्रकल्प यशस्वी करून दाखवीत साखर कारखानदारीत यशाची नवनवी शिखरे पादाक्रांत करणारा म्हणून नावारूपाला आलेल्या आहे. जकराया शुगरने आता सीबीजी प्रकल्पात आणखी एक यशाचे शिखर सर केले आहे.



एका दिवसात रेकॉर्ड ब्रेक सतरा हजार पाचशे किलो गॅस निर्मिती करून प्रतिदिन देशातील सर्वाधिक गॅस निर्मिती करणारा प्रकल्प म्हणून नावलौकिक प्राप्त केला आहे. तंत्रज्ञानातील नाविन्याचा ध्यास घेत जकराया शुगरने केवळ उसाचे गाळप करून साखर उत्पादित करण्यापेक्षा विविध उपपदार्थ निर्मितीला प्राधान्य दिले आहे उदाहरणार्थ, ऑरगॅनिक कार्बनयुक्त पीडीएम पोटॅश खताची निर्मिती सुरू केली.खाताची निर्मिती करणारा जकराया हा राज्यातील पहिला साखर आहे, जकराया शुगरचे संस्थापक अध्यक्ष ॲड.बी.बी.जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली, संचालक राहुल जाधव,सर्व सहकारी, अधिकारी, कामगारांनी केवळ समर्पित भावनेने काम केल्याने विविध उपपदार्थ निर्मितीत यशाचे नवनवे मापदंड तयार केले आहेत. जकरायाने स्पेंट वॉश पासून बायोसिनजी (CBG) Compressed Biogas निर्मितीचा प्रकल्प देशात पहिल्यांदा सुरू करून त्याचे उत्पादन यशस्वीरित्या केले हा सीबीजी प्रकल्प हे त्या यशाच्या मापदंडाचे उत्तम उदाहरण म्हणता येईल. असे कार्यकारी संचालक सचिन जाधव यांनी सांगितले.

> १५ फेब्रुवारी २०२४ ला या प्रकल्पाची सुरुवात झाली. आता देशातील साखर कारखानंदारा समोर पथदर्शी ठरत असलेल्या या प्रकल्पातील सुरूवातील आलेल्या तांत्रिक अडचणीने माझ्या संयमाची परीक्षा घेतली.मात्र सबर का फल मीठा होता है हे ओळखून मी पूर्णवेळ या प्रकल्पावर फोकस ठेवला. अखेर सर्व कामगारांच्या प्रयत्नाला यशाची भरजरी किनार लाभली.वीस हजार किलो प्रतिदिन क्षमता असलेल्या या प्रकल्पातून सतरा हजार पाचशे किलो गॅस एका दिवसात उत्पादन करण्यात आले.शुद्धता आणि उच्च गुणवत्ता या जोरावर लवकरच वीस हजार किलोचाही टप्पा ओलांडू असा विश्वास आहे.
>
> **- सचिन जाधव**
> कार्यकारी संचालक जकराया शुगर, वटवटे

## कामगार कल्याण प्रभारी अधिकारीपदी खानसोळे

**सोलापूर, दि. २२ जुलै-**

महापालिका महिला व बालकल्याण अधिकारी तसेच जनसंपर्क आणि कामगार कल्याण अधिकारी या विभागाचा प्रभारी कार्यभार समाज विकास अधिकारी अजितकुमार खानसोळे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.



पालिका महिला व बालकल्याण अधिकारी तसेच जनसंपर्क आणि कामगार कल्याण अधिकारी या विभागाचा कार्यभार सांभाळणारे ओमप्रकाश वाघमारे यांच्याकडून नूतन प्रभारी अधिकारी खानसोळे यांनी आज पदभार घेतला आहे. ओमप्रकाश वाघमारे यांच्याकडे आता निवडणूक कार्यालय विभागाची जबाबदारी आहे. खानसोळे हे सोलापूर महापालिकेत सरळ सेवा भरतीतून समाज विकास अधिकारी या पदावर रुजू झाले. त्यांच्याकडे आता महिला व बालकल्याण अधिकारी तसेच जनसंपर्क आणि कामगार कल्याण अधिकारी या विभागाचा प्रभारी पदभार सोपवण्यात आला आहे. तसे आदेश महापालिका आयुक्त यांनी काढले आहेत.

## पंढरपूर कॉरिडॉरसाठी ऑक्टोबरपासून भूसंपादन प्रक्रिया

### उपजिल्हाधिकाऱ्यांच्या समितीची बाधितांशी पुन्हा होणार चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

अवघ्या महाराष्ट्राचे आराध्यदैवत असलेल्या श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांची उत्तम सोय व्हावी; यासाठी नव्याने होणाऱ्या कॉरिडॉरकरिता येत्या ऑक्टोबर महिन्यात भूसंपादन प्रक्रिया सुरू होणार असून, यासाठी तीन उपजिल्हाधिकाऱ्यांची समिती गठीत करण्यात आली आहे. ही समिती दि. २५ जुलै ते ५ ऑगस्ट या कालावधीत बाधित मालमत्ताधारकांशी चर्चा करणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.



काशी विश्वेश्वराच्या धर्तीवर पंढरपूर तीर्थक्षेत्राचा विकास करण्यासाठी पंढरपूर कॉरिडॉर तयार होत आहे. यासाठी लागणाऱ्या जागेचे संपादन करण्याची प्रक्रिया येत्या ऑक्टोबरपासून प्रत्यक्ष सुरू होणार आहे. १ ते ३ मे २०२५ या कालावधीत जिल्हाधिकाऱ्यांनी मंदिर परिसरातील बाधितांशी प्रदीर्घ चर्चा करून त्यांच्या भावना जाणून घेतल्या आहेत. यावेळी बाधितांशी पुन्हा चर्चा करूनच पुढील निर्णय घेण्यात येईल, असे सांगण्यात आले होते. याप्रमाणे आता जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी उपजिल्हाधिकाऱ्यांची समिती नेमली असून, ही समिती बाधितांशी चर्चा करणार आहे.

यासंदर्भातील बैठकीची दुसरी फेरी लवकरच सुरु होणार आहे. कॉरिडॉरचा प्रस्ताव तयार झाल्यानंतर उच्चाधिकारी समिती, शिखर समितीच्या मंजुरीनंतर शासन निर्णय होऊन भूसंपादनासाठी आर्थिक तरतूद करण्यात येईल. भूसंपादनासाठी लागणाऱ्या एकूण रकमेच्या तीस टक्के रक्कम पंढरपूर नगरपरिषदेने महसूल विभागाकडे जमा करताच भूसंपादन प्रक्रिया सुरू होईल. यासंदर्भात यापूर्वीही ७ बैठका झाल्या आहेत. अनेक बाधितांचा भूसंपादनासाठी सकारात्मक प्रतिसाद असल्याचे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.

## अक्कलकोट वटवृक्ष मंदिरात डोंबिवली-बदलापूरकरांची कीर्तनसेवा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २२ जुलै-**

डोंबीवलीच्या सद्गुरु अण्णा लिमये यांच्या श्री स्वामी समर्थ नामाचा प्रचार आणि प्रसार या कार्याअंतर्गत पदयात्रा, जप, नामस्मरण, मानसपुजा, कीर्तन, भजन, गायन आदी धार्मिक कार्यक्रमांतर्गत अक्कलकोट स्वामींची १२६ वी मासिक सेवा येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या ज्योतीबा मंडपात संपन्न झाली.



यावेळी ह.भ.प.गणेशबुवा गाडगीळ यांचे नारदीय कीर्तन झाले. तबला वादक सुनिल शेलार आणि संवादिनी वादक मयूर स्वामी यांनी साथसंगत केली. कार्यक्रमाच्या प्रारंभी मंदीर समितीच्यावतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी सोमदत्त आसोलकर व सर्व सेवेकऱ्यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून यथोचित सन्मान केला. अध्यात्मिक उन्नतीसाठी स्वामीसेवकांसाठी हक्काचे व्यासपीठ ध्येय ठेवून मासिक कीर्तन सेवा स्वामी हो ग्रुप आणि डोंबिवली-बदलापूर स्वामीभक्त मंडळीचे सोमदत्त आसोलकर करत आहेत ही सर्वांसाठी पर्वणी असल्याचे चेअरमन इंगळे यांनी यावेळी सांगितले. १२६ व्या या मासिक कीर्तन सेवेदरम्यान सकाळच्या सत्रात जप, नामस्मरण आणि मानसपूजा या सेवा झाली. सूत्रसंचालन भरत डिंगोरकर आणि संतोष रहाटे यांनी केले. यानंतर मासिक कीर्तन सेवा झाली. याप्रसंगी मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रथमेश इंगळे, प्रा.शिवशरण अचलेर, बाळासाहेब एकबोटे, अंकूश केत, संतोष जाधव, श्रीशैल गवंडी, रविराव महिंद्रकर, स्वामीनाथ लोणारी, विपूल जाधव, सागर गोंडाळ, महेश मस्कले, श्रीकांत मलवे, खाजप्पा झंपले, दर्शन घाटगे, स्वामीनाथ मुसळे आदींसह भाविक उपस्थित होते.

### मुख्यमंत्र्यांचा वाढदिवस

## आ. समाधान आवताडेंकडून सेवादिन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २२ जुलै-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधत आमदार समाधान आवताडे यांच्या माध्यमातून पंढरपूर येथील विठ्ठलरखुमाई मंदिरात तुळशीपुजन व नामदेव पायरी येथे महाआरती तसेच मतदारसंघात रक्तदान शिबीर आणि वृक्षलागवड व संवर्धनाच्या संकल्पाने साजरा करण्यात आला.





दरम्यान राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवारी (ता.२२) पंढरपूर येथे आमदार समाधान आवताडे यांनी राज्याचे येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात तुलसी पुजनाच्या माध्यमातून व नामदेव पायरी येथे महाआरतीतून मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दीर्घायुष्याकरिता व निरोगी आयुष्याकरिता मंगलमय वातावरणात मनोकामना केली. या बरोबरच जन्मदिनाचे औचित्य साधत जाहिरात, होर्डिंग, मनोरंजनाच्या कार्यक्रमांवर अनावश्यक खर्च न करता संपुर्ण पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघात आमदार आवताडे यांच्या माध्यमातून महारक्तदान शिबिरे तसेच ५५ हजार ५५५ झाडांचे वृक्षारोपन व संवर्धन असे व यांसारखे अनेक सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत सेवादिन म्हणून हा जन्मदिन साजरा केला जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण मतदारसंघात व राज्यात ही महाराष्ट्र सेवकाचा वाढदिवस हा खऱ्या अर्थाने सेवाभाव व समर्पित कार्यातून साजरा होतो आहे, हीच नेतृत्वाची खरी ओळख आहे असे प्रतिपादन आमदार आ. आवताडे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले.

# पानीवचे सुपुत्र जवान यशवंत बाबर यांना वीरमरण

### बुधवारी सकाळी १० वाजता पानीव येथे होणार लष्करी इतमात अंत्यसंस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ जुलै-**

माळशिरस तालुक्यातील पानीव गावाचे सुपुत्र व भारतीय लष्करातील जवान हवालदार यशवंत भानुदास बाबर (वय ५५) यांना रविवारी (ता. २० जुलै २०२५) मध्यरात्री १ वाजता कोची (केरळ) येथे ड्युटीवर असताना हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने वीरमरण प्राप्त झाले.



गेल्या ३५ वर्षांपासून भारतीय लष्करात सेवा बजावत असलेले यशवंत बाबर सध्या कोची येथील संरक्षण सुरक्षा दलात कार्यरत होते. देशसेवेच्या पवित्र कार्यात तन-मनाने समर्पित राहून त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य राष्ट्रसेवेसाठी अर्पण केले. त्यांच्या निधनामुळे पानीव गावासह संपूर्ण माळशिरस तालुक्यावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या जाण्याने गाव एक शूर, निष्ठावान आणि कर्तव्यदक्ष सैनिक गमावला आहे. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी व भाऊ असा आप्तपरिवार आहे. बाबर कुटुंबावर या घटनेने दु:खाचा डोंगर कोसळला आहे. मंगळवारी सकाळी कोची येथील लष्कराच्या मुख्य कार्यालयात त्यांना



लष्करी मानवंदना दिल्यानंतर त्यांचे पार्थिव विमानाने पुणे येथे रात्री नऊ वाजेपर्यंत पोहोचेल तिथून लष्करी वाहनाने मध्यरात्रीपर्यंत पानीव गावात दाखल होणार असून, बुधवारी सकाळी १० वाजता लष्करी इतमामात पानीव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत, पानीव ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने याबाबतची सर्व व्यवस्था करण्यात आल्याची माहिती प्रकाश पाटील यांनी दिली. हवालदार यशवंत बाबर यांच्या अतुलनीय सेवेबद्दल संपूर्ण गावकऱ्यांना अभिमान आहे.

> **दोन महिन्यांपूर्वीच बदली**
>
> केवळ दोन महिन्यांपूर्वीच त्यांची बदली कोची (केरळ) येथे झाली होती. जिथे त्यांनी १३०७ DSC PL OSS मध्ये सेवा बजावत होती. विशेष म्हणजे, येणाऱ्या एका वर्षातच त्यांची लष्करातून सेवानिवृत्ती होणार होती परंतु त्याआधीच ड्युटीवर असताना त्यांना वीरमरण प्राप्त झाले.
>
> **वीर जवान बाबर यांचा सैनिकी प्रवास**
>
> जम्मू व काश्मीर येथे सलग १५ वर्षे देशसेवा करत देशाच्या संवेदनशील आणि सीमेवरील भागात त्यांनी अत्यंत धैर्याने सेवा बजावली. त्यानंतर जैसलमेर (राजस्थान) येथे शुष्क सीमाभागात पुणे (महाराष्ट्र) येथे प्रशिक्षण व प्रशासकीय जबाबदाऱ्या सिकंदराबाद (आंध्रप्रदेश) येथे दक्षिण भारतातजबलपूर (मध्यप्रदेश) येथे मध्य भारतात या विविध भागांमध्ये त्यांनी कर्तव्य बजावले.

## महत्त्वाचे

### एआयएफएफ तांत्रिक समितीची आज बैठक

**नवी दिल्ली** : माजी कर्णधार आयएम विजयन यांच्या अध्यक्षतेखालील अखिल भारतीय फुटबॉल महासंघ (एआयएफएफ) तांत्रिक समितीची बुधवारी वरिठ पुरुष राष्ट्रीय संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदाच्या नियुक्तीसाठी उमेदवारांची निवड करण्यासाठी बैठक घेणार आहे. या रिक्त पदासाठी महासंघाला १७० अर्ज प्राप्त झाले आहेत. या महिन्याच्या सुरुवातीला, स्पेनचे मनोलो मार्केझ आणि अखिल भारतीय फुटबॉल महासंघाने संघाच्या खराब कामगिरीनंतर परस्पर संमतीने वेगळे होण्याचा निर्णय घेतल्यानंतर, एआयएफएफने १३ जुलैपर्यंत या पदासाठी अर्ज मागवले. या घडामोडींशी जवळच्या एका सूत्राने सांगितले की, तांत्रिक समिती २३ जुलै रोजी बैठक घेईल, अर्जांचा आढावा घेईल आणि एआयएफएफ कार्यकारी समितीला सादर करण्यासाठी यादी तयार करेल. त्यानंतर, एआयएफएफ कार्यकारी समिती नियुक्तीवर अंतिम निर्णय घेईल. सप्टेंबरमध्ये फिफा आंतरराष्ट्रीय सामने असल्याने आणि भारत ९ आणि १४ ऑक्टोबर रोजी सिंगापूरविरुद्ध एएफसी आशियाई चषक पात्रता फेरीचे सामने घरच्या मैदानावर आणि बाहेर खेळणार असल्याने एआयएफएफ लवकर नियुक्तीच्या बाजूने असल्याचे कळते. अशा परिस्थितीत, निवडलेल्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाऊ शकत नाही कारण नियुक्तीसाठी बराच वेळ लागू शकतो. एआयएफएफने आधीच अर्जदारांना लेखी स्वरूपात विचारले आहे की त्यांना किती पगार हवा आहे आणि राष्ट्रीय संघासाठी त्यांचे व्हिजन काय आहे.

# बरोबरी राखण्याचा भारताचा प्रयत्न

### मँचेस्टरमध्ये प्रथमच विजयाची संधी


शुभमन गिल


बेन स्टोक्स

**मँचेस्टर, २२ जुलै**

गेल्या सामन्यातील पराभव आणि काही प्रमुख खेळाडूंना दुखापत झाली असली तरी, भारतीय संघ बुधवारपासून येथे सुरू होणाऱ्या इंग्लंडविरुद्धच्या चौथ्या कसोटी सामन्यात ओल्ड ट्रॅफर्ड येथे मालिकेत पुनरागमन करण्यासाठी आणि पहिल्यांदाच विजय मिळविण्यासाठी कोणतीही कसर सोडणार नाही.

लीड्समधील पहिल्या कसोटीनंतर, भारताने अंतिम अकरा जणांमध्ये तीन अष्टपैलू खेळाडूंचा समावेश केला. यामध्ये नितीश रेड्डी याचा समावेश होता, जो आता गुडघ्याच्या दुखापतीमुळे मालिकेतून बाहेर पडला आहे. रवींद्र जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदरसारख्या दोन फिरकी गोलंदाजांच्या उपस्थितीमुळे, भारताला आठव्या क्रमांकापर्यंत फलंदाजी करण्याची संधी होती, परंतु मँचेस्टरमध्ये असे होऊ शकत नाही, जिथे भारतीय संघ अद्याप जिंकू शकलेला नाही. भारताने आतापर्यंत येथे नऊ सामने खेळले आहेत, त्यापैकी चारमध्ये त्याला पराभवाचा सामना करावा लागला तर उर्वरित पाच सामने अनिर्णीत राहिले.

इंग्लंड सध्या मालिकेत २-१ ने आघाडीवर आहे आणि जर भारताला पाच सामन्यांच्या मालिकेत चुरस कायम ठेवायची असेल तर त्यांना येथे कोणत्याही परिस्थितीत विजय मिळवावा लागेल. मालिकेतील पहिला कसोटी सामना खेळणारा शार्दुल ठाकूर रेड्डीच्या जागी अंतिम अकरा खेळाडूंमध्ये समाविष्ट होऊ शकतो परंतु त्याची फलंदाजीची कामगिरी तितकीशी चांगली राहिलेली नाही. जर त्याला संघात समाविष्ट केले गेले तर त्याला गोलंदाजीमध्ये आपली कामगिरी सुधारावी लागेल कारण रेड्डीने लॉर्ड्सवरील तिसऱ्या कसोटी सामन्यात महत्त्वाच्या क्षणी गडी बाद केले.

भारत पुन्हा लीड्स संघाचा प्रयत्न करू शकतो, जिथे जडेजाच्या रूपात फक्त एक फिरकी गोलंदाज आणि सहाव्या क्रमांकापर्यंत विशेषज्ञ फलंदाज होते, ज्यामध्ये करुण नायर आणि साई सुदर्शन हे दोघेही अंतिम अकरा खेळाडूंमध्ये होते. याशिवाय, नवीन वेगवान गोलंदाज अंशुल कंबोज आणि प्रसिद्ध कृष्णा हे देखील अंतिम अकरा खेळाडूंमध्ये स्थान मिळविण्यासाठी दावेदार आहेत. जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराज हे वेगवान गोलंदाज अंतिम अकरा जणांमध्ये स्थान मिळवतील हे निश्चित आहे.

इंग्लंडमधील इतर ठिकाणांच्या तुलनेत भारताला मँचेस्टरमध्ये खेळण्याची संधी कमी मिळाली आहे. त्यांनी २०१४ मध्ये येथे शेवटचा कसोटी सामना खेळला होता. या मैदानावर भारताकडून शेवटचे शतक सचिन तेंडुलकरने १९९० मध्ये केले होते. भारताचे लक्ष मालिका बरोबरीत आणण्यावर असताना, इंग्लंड अजिंक्य आघाडी मिळविण्याचा प्रयत्न करेल.

बेन स्टोक्सने सामन्यापूर्वी त्याचा अंतिम अकरा खेळाडू निवडला आणि त्याच्या संघात एकमेव बदल म्हणजे दुखापतग्रस्त शोएब बशीरच्या जागी लियाम डॉसनचा समावेश. या डावखुऱ्या फिरकी गोलंदाजाने जुलै २०१७ मध्ये इंग्लंडसाठी शेवटचा सामना खेळला.

**भारत विरुद्ध इंग्लंड**

**चौथा कसोटी सामना**
**स्थळ** : ओल्ड ट्रॅफर्ड क्रिकेट मैदान, मँचेस्टर
**वेळ : दुपारी ३.३० वाजतापासून (भारतीय वेळेनुसार)**
**थेट प्रसारण : सोनी स्पोर्ट्‌वर**

**प्रतिस्पर्धी संघ**

**भारत** : शुभमन गिल (कर्णधार), ऋषभ पंत (उपकर्णधार आणि यष्टिरक्षक), यशस्वी जयस्वाल, केएल राहुल, साई सुदर्शन, अभिमन्यू ईश्वरन, करुण नायर, रवींद्र जडेजा, ध्रुव जुरेल (यष्टिरक्षक), वॉशिंग्टन सुंदर, शार्दुल ठाकूर, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, आकाश दीप, कुलदीप यादव, अंशुल कंबोज.

**इंग्लंड** : बेन स्टोक्स (कर्णधार), जॅक क्रॉली, बेन डकेट, ऑली पोप (उपकर्णधार), जो रूट, हॅरी ब्रूक, जेमी स्मिथ (यष्टिरक्षक), लियाम डॉसन, ख्रिस वोक्स, ब्रायडन कार्स, जोफ्रा आर्चर. *(वृत्तसंस्था)*



सिंगापूर येथे झालेल्या जागतिक जलतरण स्पर्धेत कलात्मक जलतरणाच्या महिला सोलो फ्री फायनलनंतर स्पेनची सुवर्णपदक विजेती आयरिस टिओ कासास (मध्यभागी) चीनची रौप्यपदक विजेती झू हुइयान (डावीकडे) आणि न्यूट्रल ॲथलिट ए ची कांस्यपदक विजेती वासिलिना खांडोष्का

# भारताचा जागतिक कुस्ती स्पर्धेत सहभाग अनिश्चित

### व्हिसा विनंतीला अद्याप प्रतिसाद नाही

**नवी दिल्ली, २२ जुलै**

४७ सदस्यीय पथक शनिवारी रवाना होणार असल्याने २८ जुलै रोजी अथेन्स येथे सुरू होणाऱ्या प्रतिष्ठित १७ वर्षांखालील जागतिक स्पर्धेत भारतीय कॅडेट कुस्ती संघांना संधी न मिळण्याचा धोका आहे, परंतु ग्रीक दूतावासाने त्यांच्या व्हिसा विनंतीला अद्याप प्रतिसाद दिलेला नाही. भारतीय कुस्ती महासंघाने (डब्ल्यूएफआय) १० जुलै रोजी व्हिसासाठी अपॉईंटमेंट मागितली होती परंतु १२ दिवस उलटून गेले आहेत आणि दूतावासाकडून अद्याप कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही.

त्यांच्या विनंतीनंतर सहा दिवसांनीही कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने, डब्ल्यूएफआयने १६ जुलै रोजी परराष्ट्र मंत्रालयाला हस्तक्षेप करण्याची विनंती केली.

भारताच्या ४७ सदस्यीय पथकात अनुक्रमे ७ आणि ८ जुलै रोजी दिल्ली आणि लखनौ येथे झालेल्या निवड चाचण्यांमधून राष्ट्रीय संघात स्थान मिळवणारे ३० कुस्तीगीर आहेत. डब्ल्यूइफआय अध्यक्ष संजय सिंह यांनी सांगितले की, वारंवार विनंती करूनही ग्रीक दूतावासाकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने फेडरेशनला परराष्ट्र मंत्रालय आणि गृह मंत्रालयाकडून हस्तक्षेप करावा लागला. ते म्हणाले, तिकिटे बुक झाली आहेत आणि खेळाडू तयार आहेत. युवा खेळाडूंसाठी जागतिक स्पर्धेत सहभागी होणे महत्त्वाचे आहे. आज मंगळवार आहे, आशा आहे की आता आम्हाला प्रतिसाद मिळेल. आणखी एका अधिकाऱ्याने सांगितले की, पूर्वी आम्हाला ग्रीक दूतावासाकडून चार दिवसांत व्हिसा मिळत असे, परंतु यावेळी खूप वेळ लागत आहे. अलिकडेच आमच्या कुस्तीपटू हर्षिताला हंगेरियन दूतावासाकडून फक्त एका दिवसात व्हिसा मिळाला. यावेळी ग्रीक दूतावास का उशीर करत आहे हे मला माहीत नाही.

आशियाई चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदके जिंकणारे भारतीय संघात अनेक खेळाडू आहेत. या खेळाडूंमध्ये रचना परमार (४३ किलो), मोनी (५७ किलो), अश्विनी वैष्णो (६५ किलो) आणि मनीषा (६९ किलो) यांचा समावेश आहे. जागतिक कुस्ती संघाच्या सर्वोच्च संस्थेचे अध्यक्ष नेनाद लालोविच यांनीही हेलेनिक ऑलिम्पिक समितीला पत्र लिहून या प्रकरणात तत्काळ हस्तक्षेप करण्याची विनंती केली आहे.

लालोविच यांनी रविवारी लिहिले की, दुर्दैवाने, काही पात्र आणि नोंदणीकृत संघांना व्हिसा मिळविण्यात अडचणी येत आहेत. यामध्ये भारत आणि इराणच्या संघांचा समावेश आहे. त्यांनी पत्रात लिहिले की, अर्ज प्रक्रिया योग्यरित्या पाळूनही, या संघांना अद्याप व्हिसा मिळालेला नाही. म्हणून, ही प्रक्रिया सुलभ करण्यासाठी मी संबंधित अधिकाऱ्यांना तुमचे सहकार्य मागतो. *(वृत्तसंस्था)*

# जपानी खेळाडूला हरवून प्रणॉय पुढच्या फेरीत

### लक्ष्यचा चिनी खेळाडूकडून पराभव

### चायना ओपन बॅडमिंटन



**चांगझोऊ, २२ जुलै**

येथे खेळल्या गेलेल्या चायना ओपन बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष एकेरीत भारताच्या एचएस प्रणॉयने शानदार सुरुवात केली. त्याने जपानच्या कोकी वतानाबेचा ८-२१, २१-१६, २३-२१ असा पराभव करून पूर्व उपउपांत्य पूर्व फेरीत प्रवेश केला. लक्ष्य सेन स्पर्धेतून बाहेर पडला आहे. त्याला चिनी खेळाडूकडून पराभव स्वीकारावा लागला.

पहिला गेम गमावल्यानंतर प्रणॉयने पुनरागमन केले. पहिला गेम ८-२१ असा गमावल्यानंतर, प्रणॉयने दुसऱ्या गेममध्ये जोरदार पुनरागमन केले आणि तो २१-१६ असा जिंकला. तिसऱ्या आणि निर्णायक गेममध्ये तो १-७ आणि नंतर १३-२० असा मागे होता, परंतु त्याने उत्कृष्ट कामगिरी केली आणि २०-२० असा गुण मिळवला आणि शेवटी गेम आणि सामना २३-२१ असा जिंकला.

लक्ष्यने शेवटचे दोन गेम गमावले पहिल्या फेरीतच चिनी खेळाडू ली शिफेंगकडून पराभव पत्करल्याने लक्ष्य सेन स्पर्धेतून बाहेर पडला आहे. पहिला गेम २१-१४ असा जिंकल्यानंतर, लक्ष्यने सलग दोन गेम २२-२४ आणि ११-२१ असा गमावले.

**अनुपमा उपाध्याय पराभूत**

महिला एकेरीत, भारताच्या अनुपमा उपाध्यायने चिनी खेळाडू लिन सियांग-तीविरुद्ध २३-२१, ११-२१, १०-२१ असा पराभव पत्करला. अनुपमाने पहिल्या गेममध्ये जोरदार झुंज दिली, परंतु दुसऱ्या आणि तिसऱ्या गेममध्ये चिनी खेळाडूने तिला सहज पराभूत केले.

मिश्र दुहेरीत, रोहन कपूर-रुत्विका गड्डे आणि असित सूर्या-अमृता प्रमुथेश या जोडी पहिल्याच फेरीत बाहेर पडल्या आहेत.

महिला दुहेरीत भारताच्या अमृता प्रमुथेश-सोनाली सिंग, कविप्रिया सेल्वम-सिमरन सिंघी आणि रुतापर्णा पांडा-श्वेतापर्णा पांडा जोडी स्पर्धा करत आहेत. *(वृत्तसंस्था)*

### पारस गुप्ता वर्ल्ड ६ रेड स्नूकर अजिंक्यपदाच्या पुढच्या फेरीत

**मनामा (बहरिन)** : राष्ट्रीय विजेता पारस गुप्ताने मंगळवारी येथे युएईच्या मोहम्मद शेहाबचा ४-० असा पराभव करून आयबीएसएफ वर्ल्ड ६ रेड स्नूकर चॅम्पियनशिपच्या प्री-क्वार्टरफायनलमध्ये प्रवेश केला. आठव्या मानांकित भारतीय खेळाडूने संधींचा पुरेपूर उपयोग केला आणि सरळ फ्रेममध्ये विजय मिळवला. गेल्या महिन्यात कोलंबो येथे झालेल्या आशियाई ६ रेड चॅम्पियनशिपमध्ये उपविजेता राहिलेला पारस गुप्ता प्री-क्वार्टर फायनलमध्ये चीनच्या पेन यिमिंगशी सामना करेल.

### स्मृती मंधाना अव्वल स्थानावर कायम



**दुबई** : इंग्लंडविरुद्धच्या सध्याच्या एकदिवसीय मालिकेतील उत्कृष्ट कामगिरीच्या आधारे दीप्ती शर्माने आयसीसी एकदिवसीय क्रमवारीत १० स्थानांनी झेप घेतली आहे. यामुळे अष्टपैलू दीप्ती शर्मा फलंदाजांच्या क्रमवारीत २३ व्या स्थानावर पोहोचली आहे. मंगळवारी जाहीर झालेल्या आयसीसी क्रमवारीत सलामीवीर स्मृती मंधानाने आपले पहिले स्थान कायम ठेवले आहे. मालिकेतील पहिल्या दोन सामन्यांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे इंग्लंड आणि भारताच्या खेळाडूंना या क्रमवारीत फायदा झाला आहे. पहिल्या एकदिवसीय सामन्यात नाबाद ६२ धावांची खेळी करून दीप्ती शर्माने संघाला विजय मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यानंतर तिने दुसऱ्या एकदिवसीय सामन्यातही नाबाद ३० धावांचे योगदान दिले. पहिल्या एकदिवसीय सामन्यात ९२ चेंडूत ८३ धावा करून सोफिया डंकलीने इंग्लंडला मजबूत धावसंख्येपर्यंत पोहोचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. यामुळे तिला २४ स्थानांची झेप मिळाली. फलंदाजांच्या यादीत ती ५२ व्या स्थानावर पोहोचली. पहिल्या दोन सामन्यांमध्ये २८ आणि ४२ गुणांसह स्मृती मंधाना क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर आहे आणि तिने ७२७ गुणांचे रेटिंग देखील कायम ठेवले आहे. भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौर १७ आणि सात गुणांसह पाच स्थानांनी घसरून २१ व्या स्थानावर आली आहे.


वॉशिंग्टन येथे सोमवारी सिटी ओपन टेनिस स्पर्धेत युजेनी बौचार्ड आणि क्लेर्वी न्गोनू विरुद्ध हेली बॅप्टिस्टसोबतच्या दुहेरी सामन्यात व्हिनस विल्यम्स चेंडू परवताना

# वॉशिंग्टनमध्ये अष्टपैलू बनण्याची क्षमता

### रवी शास्त्री यांचा विश्वास



**मँचेस्टर, २२ जुलै**

वॉशिंग्टन सुंदरमध्ये भारताचा पुढचा कसोटी अष्टपैलू खेळाडू बनण्याची क्षमता आहे कारण तो नैसर्गिकरित्या प्रतिभावान फलंदाज आहे आणि देशांतर्गत परिस्थितीत चांगली गोलंदाजी करतो, असा विश्वास भारताचे माजी मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी व्यक्त केला.

२०२१ मध्ये ब्रिस्बेनमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटी पदार्पण करणारा २५ वर्षीय ऑफ-स्पिनर वॉशिंग्टनला त्यानंतर या फॉरमॅटमध्ये फारशा संधी मिळाल्या नाहीत. त्याने आतापर्यंत ११ कसोटी सामन्यांमध्ये ५४५ धावा केल्या आहेत आणि ३० गडी बाद केले आहेत.

रवी शास्त्री म्हणाले, मला सुरुवातीपासूनच वॉशिंग्टनचा खेळ आवडला आहे. जेव्हा मी त्याला पहिल्यांदा पाहिले तेव्हा मी म्हटले होते की तो एक अद्‌भुत खेळाडू आहे आणि त्याच्यात अनेक वर्षांपासून भारताचा सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडू बनण्याची क्षमता आहे.

त्यांनी विश्वास व्यक्त केला की, वॉशिंग्टनने लाल चेंडूने अधिक सामने खेळायला हवे होते. तो आता फक्त २५ वर्षांचा आहे. मला वाटत त्याने आणखी कसोटी क्रिकेट खेळायला हवे होते. भारतात, जिथे चेंडू वळत असतो, तिथे तो न्यूझीलंडविरुद्धच्या कामगिरीप्रमाणे घातक ठरू शकतो. त्याने काही वरिष्ठ फिरकीपटूंपेक्षा चांगली कामगिरी केली आणि त्यासोबतच तो एक चांगला फलंदाज देखील आहे.

२०२४ च्या न्यूझीलंडविरुद्धच्या घरच्या कसोटी मालिकेत वॉशिंग्टनने चार डावात १६ बळी घेतले. रवी शास्त्री वॉशिंग्टनच्या फलंदाजीचे कौतुक करताना म्हणाले की, त्याला फलंदाजीच्या क्रमानेही वर पाठवता येईल.तो नैसर्गिकरित्या प्रतिभावान फलंदाज आहे. तो फलंदाजीच्या क्रमात आठव्या क्रमांकाचा फलंदाज नाही.

तो लवकरच सहाव्या क्रमांकावर फलंदाजीला येऊ शकतो. वॉशिंग्टनकडे चांगली तंत्रे आहेत, ज्यामुळे तो परदेशी परिस्थितीतही यशस्वी होऊ शकतो. एकदा त्याला आत्मविश्वास मिळाला की, मला वाटते की त्याचा खेळ आणखी सुधारेल. त्याने परदेशातही त्याची लय कायम ठेवली आहे.

तो एक तंदुरुस्त खेळाडू आहे आणि तो लांब स्पेल टाकू शकतो आणि गरज पडल्यास नियंत्रण राखू शकतो. *(वृत्तसंस्था)*

# बीसीसीआय राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयकाच्या कक्षेत

### आज संसदेत होणार सादर

**नवी दिल्ली, २२ जुलै**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) देखील राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयकाचा भाग असेल. हे विधेयक बुधवारी संसदेत मांडले जाईल.

मंगळवारी माहिती देताना क्रीडा मंत्रालयाच्या सूत्रांनी सांगितले की, सर्व राष्ट्रीय महासंघांप्रमाणे, बीसीसीआयचाही त्यात समावेश असेल.

वृत्तसंस्थेने सूत्राचा हवाला देत म्हटले आहे की, सर्व राष्ट्रीय महासंघांप्रमाणे, बीसीसीआयलाही हे विधेयक कायदा झाल्यानंतर देशाच्या कायद्याचे पालन करावे लागेल. २०२८ मध्ये लॉस एंजेलिस येथे होणाऱ्या ऑलिम्पिक खेळांमध्ये क्रिकेटचा समावेश करण्यात आला आहे आणि अशा प्रकारे बीसीसीआय आधीच ऑलिम्पिक चळवळीचा एक भाग बनला आहे.

क्रीडा प्रशासन विधेयकाचे उद्दिष्ट वेळेवर निवडणुका, प्रशासकीय जबाबदारी आणि खेळाडूंच्या कल्याणासाठी एक मजबूत क्रीडा चौकट तयार करणे आहे.

**मांडवीय यांनी समर्थन केले**

क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी म्हटले आहे की हे विधेयक देशातील क्रीडा प्रशासकांसाठी अधिक जबाबदारी सुनिश्चित करण्याच्या दिशेने एक पाऊल आहे. याअंतर्गत, एक नियामक मंडळ स्थापन केले जाईल, ज्याला राष्ट्रीय क्रीडा महासंघांना मान्यता देण्याचा आणि त्यांना निधी देण्याचा अधिकार असेल.

हे सर्व ते सुशासनाशी संबंधित अटींचे किती चांगले पालन करतात यावर अवलंबून आहे. हे मंडळ क्रीडा महासंघ सर्वोच्च प्रशासन, आर्थिक आणि नैतिक मानकांचे पालन करतील याची देखील खात्री करेल. *(वृत्तसंस्था)*

### पंत करणार चौथ्या कसोटीत यष्टिरक्षण

**मँचेस्टर** : भारतीय कर्णधार शुभमन गिलने इंग्लंडविरुद्धच्या बुधवारपासून सुरू होणाऱ्या चौथ्या कसोटीत ऋषभ पंत यष्टिरक्षक म्हणून खेळेल याची पुष्टी केली. तो म्हणाला, वेगवान गोलंदाज आकाशदीप या महत्त्वाच्या सामन्यातून बाहेर पडेल. पंतशी संबंधित ही बातमी भारतासाठी मोठी दिलासा देणारी आहे कारण आकाशदीप व्यतिरिक्त, अष्टपैलू नितीश रेड्डी आणि वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंग यांच्या दुखापतींमुळे संघ आधीच अडचणीत आहे.

रेड्डी आता मालिकेतून बाहेर पडला आहे तर आकाशदीप आणि अर्शदीप ओल्ड ट्रॅफर्ड कसोटीत खेळणार नाहीत.

# दिल्ली प्रीमियर लीग २ ऑगस्टपासून

### महिला स्पर्धा १७ ऑगस्टपासून

**नवी दिल्ली, २२ जुलै**

दिल्ली प्रीमियर लीग (डीपीएल) २ ऑगस्टपासून पुरुषांच्या स्पर्धेने सुरू होईल तर महिला स्पर्धा १७ ऑगस्टपासून सुरू होईल.

पुरुषांचा अंतिम सामना ३१ ऑगस्ट रोजी होणार आहे. पुरुषांच्या गटात प्रत्येकी चार संघांचे दोन गट तयार करण्यात आले आहेत. गट अ मध्ये आउटर दिल्ली वॉरियर्स, सेंट्रल दिल्ली किंग्ज, नवी दिल्ली टायगर्स आणि नॉर्थ दिल्ली स्ट्रायकर्स यांचा समावेश आहे तर गट ब मध्ये वेस्ट दिल्ली लायन्स, ईस्ट दिल्ली रायडर्स, साऊथ दिल्ली सुपरस्टार्स आणि ओल्ड दिल्ली ६ यांचा समावेश आहे.

प्रत्येक संघ त्याच्या गटातील तीन संघांसह प्रत्येकी दोन सामने खेळेल. त्यानंतर, तो दुसऱ्या गटातील चार संघांसह प्रत्येकी एक सामना खेळेल. अशा प्रकारे, प्रत्येक संघ एकूण १० सामने खेळेल. गुणतालिकेत शीर्षस्थानी असलेले चार संघ प्लेऑफमध्ये पोहोचतील. अव्वल दोन संघ क्वालिफायर एकमध्ये एकमेकांशी भिडतील, ज्यामध्ये विजेत्याला थेट अंतिम फेरीत स्थान मिळेल.

तिसऱ्या आणि चौथ्या क्रमांकावर असलेल्या संघांना एलिमिनेटरमध्ये एकमेकांशी सामना करावा लागेल, ज्यामध्ये पराभूत संघ बाहेर पडेल.

एलिमिनेटरमधील विजेत्या संघाला क्वालिफायर दोनमध्ये क्वालिफायर एकमधील पराभूत संघाशी सामना करावा लागेल. विजेत्या संघाला अंतिम फेरीत क्वालिफायर एकमधील विजेत्या संघाशी सामना करावा लागेल.

महिलांची स्पर्धा १७ ते २४ ऑगस्ट दरम्यान खेळवली जाईल. चार संघ यात सहभागी होतील आणि एकमेकांविरुद्ध प्रत्येकी दोन सामने खेळतील. गुणतालिकेतील अव्वल दोन संघ अंतिम फेरीत पोहोचतील. *(वृत्तसंस्था)*

## करुण नायर कर्नाटक संघात परतणार

**बंगळुरू, २२ जुलै**

भारतीय फलंदाज करुण नायर तीन वर्षांनंतर आगामी देशांतर्गत हंगामासाठी कर्नाटक संघात परतणार आहे. विदर्भ क्रिकेट असोसिएशनने (व्हीसीए) त्याला ना-हरकत प्रमाण पत्र दिले आहे. २०२४-२५ हंगामात विदर्भाच्या जेतेपदाच्या विजयात नायरने महत्त्वाची भूमिका बजावली. त्याने ५३ च्या सरासरीने ८६३ धावा केल्या आणि केरळविरुद्धच्या अंतिम सामन्यात शतकही झळकवले. व्हीसीएच्या एका अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला सांगितले की, गेल्या काही हंगामात तो आमच्या संघाचा महत्त्वाचा भाग असल्याने त्याला निरोप देताना कठीण आहे. पण हा त्याचा निर्णय आहे आणि आम्ही त्याचा आदर करतो. त्याला एनओसी देण्यात आली आहे. *(वृत्तसंस्था)*

# बुमराह, झहीर खानच्या श्रेणीत अंशुल कंबोज

### आर. अश्विनने केले भरभरून कौतुक



**मँचेस्टर, २२ जुलै**

भारत आणि इंग्लंडमधील सुरू असलेल्या कसोटी मालिकेदरम्यान भारतीय संघाला दुखापतग्रस्त खेळाडूंच्या समस्येचा सामना करावा लागत आहे. दुखापतीमुळे अष्टपैलू नितीश कुमार रेड्डी उर्वरित दोन कसोटी सामन्यांमधून बाहेर पडला आहे, तर वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगलाही चौथ्या कसोटी सामन्यातून बाहेर काढण्यात आले आहे. अशा परिस्थितीत, संघ व्यवस्थापनाने अंशुल कंबोजला संघात समाविष्ट केले आहे.

आता सर्वांचे लक्ष २३ जुलैपासून मँचेस्टरमध्ये सुरू होणाऱ्या चौथ्या कसोटी सामन्याकडे आहे, जिथे अंशुलला कसोटी पदार्पणाची संधी मिळते की नाही हे पाहणे मनोरंजक असेल. अंशुल कंबोजने अद्याप आंतरराष्ट्रीय पदार्पण केलेले नसले तरी, भारताचा अनुभवी ऑफ-स्पिनर आर. अश्विनने त्याच्या वेगवान गोलंदाजी कौशल्याचे कौतुक केले आहे. अश्विनने त्याला जसप्रीत बुमराह आणि झहीर खान सारख्या समंजस आणि धोरणात्मक गोलंदाजांच्या श्रेणीत स्थान दिले आहे. अश्विन म्हणाला की, अंशुल केवळ तांत्रिकदृष्ट्या मजबूत नाही तर त्याची सर्वात मोठी गुणवत्ता म्हणजे तो त्याची रणनीती खोलवर समजतो. बरेच वेगवान गोलंदाज फक्त असे म्हणतात की त्यांना स्वतःला व्यक्त करायचे आहे, परंतु अंशुलला माहीत आहे की त्याला मैदानावर काय करायचे आहे आणि ते कसे करायचे आहे. अश्विनने म्हटले की, मी आयपीएलमध्ये अंशुलची गोलंदाजी जवळून पाहिली आहे आणि त्याची गोलंदाजी खूप अचूक आहे. तो कौशल्यांची तुलना करत नाही, परंतु ज्या पद्धतीने झहीर खान त्याची रणनीती अंमलात आणत असे, तीच समज अंशुलमध्ये देखील दिसून येते. झहीर खानसारखे खूप कमी गोलंदाज आहेत जे मैदानावर त्यांची योजना आणि रणनीती अंमलात आणू शकले. अंशुल देखील त्याच श्रेणीचा खेळाडू असल्याचे दिसते. जर त्याला मँचेस्टर कसोटीत संधी मिळाली तर भारताकडे एक उत्तम वेगवान आक्रमण असेल, असा विश्वास अश्विनने व्यक्त केला. *(वृत्तसंस्था)*

# दिल्ली सरकारची रोख बक्षीस रकमेत वाढ

**नवी दिल्ली, २२ जुलै**

दिल्ली सरकारने राष्ट्रीय राजधानीतील ऑलिम्पिक आणि पॅरालिम्पिक पदक विजेत्यांच्या रोख बक्षीस रकमेत वाढ केली आहे. ही माहिती मंत्री आशिष सूद यांनी मंगळवारी दिली. गुणवंत विद्यार्थ्यांना मोफत लॅपटॉप देण्यासाठी मुख्यमंत्री डिजिटल योजनेला मंजुरी देण्याची घोषणाही सूद यांनी केली.

मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली दिल्ली सचिवालयात झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हे निर्णय घेण्यात आले. आशिष सूद यांनी येथे सांगितले की, आज मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची बैठक झाली. मुख्यमंत्री क्रीडा प्रोत्साहन योजनेअंतर्गत ऐतिहासिक निर्णय घेण्यात आले. पूर्वी ऑलिम्पिक आणि पॅरालिम्पिक पदक विजेत्यांना ३ कोटी, २ कोटी आणि १ कोटी रुपये देण्यात येत होते, परंतु क्रीडा परिसंस्थेला प्रोत्साहन देण्यासाठी ऑलिम्पिक, पॅरालिम्पिक सुवर्णपदक विजेत्यांना ७ कोटी, रौप्य पदक विजेत्यांना ५ कोटी आणि कांस्य पदक विजेत्यांना ३ कोटी रुपये देण्यात येतील. *(वृत्तसंस्था)*

**महत्वाचे...**

## सहकार भारती जिल्हाध्यक्षपदी श्रीहर्षगौडा पाटील यांची निवड

**विजयपूर, दि. २२ जुलै-**

सहकार भारती कर्नाटक नूतन विजयपूर जिल्हाध्यक्ष श्रीहर्षगौडा पाटील, संघटना कार्यवाह दिपक शिंत्रे, मुख्य कार्यवाह परशुराम चिंचली यांच्यासह जिल्हा कार्यकारिणी सदस्य, तालुका अध्यक्ष व पदाधिकारी महिला प्रमुख व विविध प्रकोष्ट पदाधिकारांचा पदग्रहण समारंभ २५ जुलै शुक्रवार रोजी भावसार सांस्कृतिक भवनात आयोजित केल्याचे बेळगांव विभाग कार्यवाह सुभाष इंडी यांनी कळविले आहे.




याचे उद्घाटन माजी केंद्रीय मंत्री व खासदार रमेश जिगजिनगी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. सहकार भारतीचे राष्ट्रीय संरक्षक रमेश वैद्यजी, राज्य अध्यक्ष प्रभूदेव मगणूर, राज्य मुख्य कार्यवाह नरसिंह कामत, माजी आमदार अरुण शाहपूर, निवृत्त अप्पर निबंधक एम.जी.पाटील, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष राजशेखर गुडदिन्नी, श्री सिद्धेश्वर बँकेचे अध्यक्ष विजयकुमार इजेरी, शांतेश्वर सहकारी संस्थेचे अध्यक्ष श्रीमंत इंडी, भाजपाचे बेळगांव विभाग प्रभारी चंद्रशेखर कवटगी, माजी उपमहापौर राजेश देवगिरी सहकार भारती माजी अध्यक्ष डॉ आर.आर. नाईक यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होईल.

# बसवेश्वर स्मारकासाठी कृष्ण तलावाच्या जागेवरच शिक्कामोर्तब

### स्मारक कृती समितीच्या प्रयत्नाचे फलित




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

थोर समतावादी संत आणि लोकशाही संकल्पनेचे प्रणेते जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्मारक मंगळवेढ्यात निर्मितीसाठी राज्य सरकारने हालचाली गतिमान केल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणून डॉ. बसवराज बगले यांच्या नेतृत्वाखालील स्मारक कृती समितीने मागणी केलेली कृष्ण तलावाची शासकीय जमीन वर्ग करण्याच्या निर्णयावर मंगळवारी शिक्कामोर्तब झाला.

दरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या शिफारसीनुसार डॉ.बसवराज बगले यांची शासकीय स्मारक समितीवर निवड झाल्यानंतर पहिल्याच दिवशी जिल्हाधिकारी यांना भेटून शासकीय जमीन स्मारक समितीच्या नांवे हस्तांतरीत करण्याचा प्रस्ताव तयार करण्याची विनंती त्यांनी २३ मार्च २०२२ रोजी पत्राद्वारे केली होती.

त्यानुसार मंगळवेढ्याचे तहसीलदार आणि प्रांताधिकारी यांनी बसवेश्वर स्मारकासाठी कृष्ण तलावाचीच १८ हेक्टर सरकारी जागा योग्य असल्याचा विहित नमुन्यातील प्रस्ताव सातव्या दिवशी जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार तसेच पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे स्मारकाबाबत सतत पाठपुरावा केला आणि विधानसभेत लक्षवेधी करण्यात आली. त्यामुळेच या स्मारकाविषयी प्रशासन गतिमान झाले आहे.

याबाबत मंगळवार, दि. १५ जुलै रोजी मुंबईत तातडीची बैठक घेऊन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी याबाबत आढावा घेतला आणि स्मारक कृती समितीचे अध्यक्ष डॉ.बसवराज बगले यांनी सुचविलेली कृष्ण तलावाची शासकीय जमीन वर्ग करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याची सूचना केली आहे. यामुळे जिल्हा प्रशासनाकडून याचे गतीने काम चालू आहे.

## स्वराज्य विहार संस्कृती गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी लामकाने

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**



स्वराज्य विहार सांस्कृतिक गणेशोत्सव मंडळा २०२५ च्या अध्यक्षपदी योगिनाथ लामकाने यांची निवड करण्यात आली. मंडाळाच्या बैठकीत भावी कार्याचे नियोजन, गणेशोत्सव साजरा करण्याची रूपरेषा, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांची आखणी या उद्देशाने ही सभा झाली. या निवडीनंतर मंडळाच्या पुढील कार्याचा आराखडा आखण्यात आला असून गणेशोत्सव २०२५ मध्ये अधिक प्रभावीपणे साजरा करण्याचा निर्धार करण्यात आला.

**अन्य पदाधिकारी :** उपाध्यक्ष-किरण काळे, खजिनदार-आनंद अनुसे, सचिव-प्रसाद शिंदे, सहसचिव-शंकर नरहारे, रेवनसिद्ध कोळेकर, मिरवणूक प्रमुख-अमर परदेशी, शुभम चव्हाण, अशोक कोरे, स्पर्धा प्रमुख-अविनाश हिंगणे, महेश शिरसागर, गौरव कोथमीरे, सोहम परदेशी, ओंकार चोरघडे, सुरक्षा प्रमुख सारंग लिगाडे, अतुल क्षीरसागर, सचिन राऊत, महिला समन्वयक- वाकडे मावशी, प्रसिद्धी प्रमुख- गोविंद देवकर, बारगजे, सजावट प्रमुख गणेश मंगुडकर, मोहन जगदाळे, विजय पाटील, अण्णासाहेब कारंडे, भागवत पवार, अरविंद सोनवणे, गोरख शेंडगे, आनंद जाधव, संदीप शिंदे, हरि झाडकर, विशाल गरड, धन्यकुमार गाडे, विजयसिंह पाटील, सज्जन भडकवाड, नितीन शिर्के, सुहास जाधव, प्रवीण बगाडे.

# मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त अकलूजमध्ये रक्तदान शिबीर

- शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांच्यासह ४१७ रक्तदात्यांचा सहभाग



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २२ जुलै-**

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि लोकप्रिय नेते देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. या पार्श्वभूमीवर आ. रणजीतसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अकलूज येथे विजय चौकात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरात अकलूज ग्राम पंचायतीचे माजी सरपंच आणि शिवकीर्ती युवा मंचाचे अध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील यांनी स्वतः रक्तदान करून सामाजिक जाणिवेचा आदर्श घालून दिला. त्यांच्या प्रेरणेतून आणि पुढाकारातून ४१७ रक्तदात्यांनी या शिबिरात रक्तदान करत उल्लेखनीय सहभाग नोंदवला. यावेळी माजी सरपंच किशोरसिंह माने पाटील, बागेवाडी ग्रामपंचायतीचे सरपंच कृष्णराज माने पाटील, फातिमा पाटावाला, शशिकला भरते, सुनीता फुले,



पायल मोरे, सतीश व्होरा, राहुल मोरे, राहुल जगताप, राजेंद्र काकडे, मच्छिंद्र पगारे, दादा तांबोळी, झुलकर शेख, बाळासाहेब वाईकर डॉ.संतोष खडतरे, डॉ.अजित गांधी यांच्यासह अकलूज आणि परिसरातील विविध संस्थांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, ग्रामस्थ, व्यापारी व तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण रक्तदान शिबिर अत्यंत नियोजनबद्ध व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले. रक्तदान शिबिराचे संयोजन हे आरोग्य विषयक जनजागृतीच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरले. तरुण पिढीमध्ये समाजकार्याची भावना रुजवणारा हा उपक्रम संपूर्ण अकलूजमध्ये चर्चेचा विषय ठरला.

शिबिरात सहभागी रक्तदात्यांना प्रमाणपत्र तसेच ऊर्जा व पाण्याची पुरेशी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील ब्लड बँकेच्या वतीने उपस्थित डॉक्टर व वैद्यकीय कर्मचारी यांच्या देखरेखीखाली संपूर्ण प्रक्रिया पार पडली. रक्तदान म्हणजे दुसऱ्याला नवजीवन देण्याचे कार्य असून, प्रत्येकाने नियमितपणे रक्तदान करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन यावेळी शिवतेजसिंह मोहिते पाटील यांनी केले.

तसेच, आ.रणजीतसिंह मोहिते पाटील यांनी या उपक्रमास शुभेच्छा देत सांगितले की, देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून आपण सर्वांनी समाजहिताचे कार्य करणे हेच त्यांना खरी वाढदिवसाची भेट ठरेल.




# पुणे विभागीय तंत्रशिक्षणचे सहाय्यक संचालक किरण कुलकर्णी यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ जुलै-**

पुणे विभागीय तंत्रशिक्षणचे सहाय्यक संचालक किरण कुलकर्णी ३३ वर्षाच्या कारकिर्दीनंतर सेवानिवृत्त होत असलेबद्दल लायन्स क्लब सोलापूर मेट्रो, शासकीय तंत्रनिकेतन सोलापूर , सैनिक स्कूल सातारा सोलापूर शाखा यासह विविध संघटना व व्यक्तींच्यावतीने हिराचंद नेमचंद वाचनालयाचे व देऋग्वेद संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

येथील हॉटेल सूर्या एक्झिक्यूटिव्ह येथे श्री. कुलकर्णी यांच्या सेवापूर्ती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी आमदार शिवशरण पाटील-बिराजदार, भाजपाच्या शहर अध्यक्षा रोहिणी तडवळकर, विविध कॉलेजचे प्राचार्य धरणे, रोंगे, राहुल माने, जोशी, दफेदार, कीर्ती भोसले, मोहन भीम नपल्ली, देऋग्वेद संस्थेचे कार्यवाह श्याम जोशी इतर पदाधिकारी, लायन्स क्लब सोलापूर मेट्रोचे अध्यक्ष विश्वनाथ आवटे, सचिव विश्वनाथ आमने इतर पदाधिकारी, सैनिक स्कूल सातारा शाखा सोलापूरचे अध्यक्ष गंगाधर तळंगे, ग्लोबल व्हिलेज बोरामणीचे संस्थापक अध्यक्ष अनिकेत चनशेट्टी, लक्ष्मी कंदीकटला श्री मोरडे, श्री. मोहळे, सुनील शेटे, रमण गोणेकर, अण्णासाहेब पटकुलकर व सोलापुरातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्राचार्य धरणे, प्राचार्य रोंगे, पोपट शिंदे, सोमनाथ पवार, आहार शेख यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी अनेक संस्थांतर्फे व मित्रमंडळीतर्फे कुलकर्णी व शलाका कुलकर्णी यांचा सत्कार करण्यात आला. कुलकर्णी हे मूलतः इलेक्ट्रिकल इंजिनिअर असून त्यांनी शासकीय तंत्रनिकेतन सोलापूर येथे ३३ वर्षे अधिव्याख्याता व विभाग प्रमुख या पदावर कार्य केले आहे. त्यांच्या शैक्षणिक कारकिर्दित त्यांनी दोन हजार विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण प्रदान केले आहे. सूत्रसंचालन राजू हिबारे यांनी केले. आकाश बचुटे, भाऊसाहेब गेजगे, लव राठी यांनी परिश्रम घेतले. अक्षय कुलकर्णी, प्रीती कुलकर्णी,अर्पिता कुलकर्णी, सौरभ कुलकर्णी व इतर आप्तेष्ट आवर्जून उपस्थित होते.



## पांजरापोळ गोशाळेत देशी गोवंश संवर्धन व वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

सोलापूर पांजरपोळ व शेठ वीरचंद दीपचंद अनाथालय या संस्थेच्या गोशाळेमध्ये शुद्ध देशी गोवंश संवर्धन व जतन दिना निमित्त गोमाता पूजन, वृक्षारोपण व मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

गो मातेचे पूजन करुन कार्यक्रमास सुरूवात केले. प्रस्तावना संस्थेचे सचिव विजयकुमार बरबडे यांनी केले. डॉ. प्रकाश कदम व डॉ. धनाजी गिड्डे यांनी देशी गाईंच्या संख्यात्मक आणि गुणात्मक वाढ करण्यासाठी मार्गदर्शन केले. देशी गोवंश याचे महत्व सांगीतले. संस्थेचे अध्यक्ष गुरूराज माळगे यांनी आभार मानले. त्यानंतर सर्व प्रमुख मान्यवरांच्या हस्ते ५५ विविध बहुपयोगी झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमास धर्मराज काडादी, अध्यक्ष गुरुराज माळगे, सचिव विजयकुमार बरबडे, कृषी विज्ञान केंद्र सोलापूरचे डॉ. प्रकाश कदम, पशुधन विकास अधिकारी पशुसंवर्धन विभाग सोलापूरचे डॉ. धनाजी गिड्डे, डॉ. सुपे , गोसेवक पांडुरंग कुलकर्णी व संस्थेचे विश्वस्त निलकंठप्पा कोनापुरे, सुधीर देशमुख, गोशाळा सेवक बापु सोनटक्के मनोज सोळसे उपस्थित होते.

# खा. तटकरे यांचे ईच्छा भगवंताची मित्र परिवाराच्यावतीने स्वागत

### मोटारसायकल रॅली, हलग्यांच्या निनाद, फटाक्यांची आतिषबाजी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांचे ईच्छा भगवंताची मित्र परिवाराच्या वतीने मोटार सायकल रॅलीने, हलग्यांच्या निनादात, फटाक्यांची आतिषबाजी करीत स्वागत करण्यात आले.

सोमवारी तटकरे हे सोलापूर शहराच्या दौऱ्यावर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या अनुषंगाने राज्यव्यापी दौरा सुरू केला आहे. त्यांचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांनी सोलापूर तुळजापूर रोडवरील चव्हाण फर्निचर समोर भला मोठा हार, शाल,मखमली टोपी, पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी महाराष्ट्र राज्य महिला आयोग अध्यक्ष रूपाली चाकणकर यांचेही स्वागत केले. याप्रसंगी प्रदेश युवक



सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड, माजी नगरसेवक पैगंबर शेख, राष्ट्रवादी महिला जिल्हा पदाधिकारी रुक्मिणी जाधव, महिला उपाध्यक्ष प्रमिला स्वामी, शहर सरचिटणीस लक्ष्मी आठवले, मीना गायकवाड, राजश्री गायकवाड, सुनिता बिराजदार, शहर उपाध्यक्ष उमेश जाधव, सागर कांबळे, शहर सचिव सचिन पिसे, शिवानंद बंडगर, अमोल लकडे, अमोल जगताप, शहर उपाध्यक्ष किरण शिंदे, शहर संघटक माणिक कांबळे, वसंत कांबळे, माऊली जरग, ऋषी येवले, हुलगप्पा शासम, उत्कर्ष गायकवाड, महादेव राठोड, जयेश शिवा पाटणकर, किरण शिंदे, फिरोज पठाण, आनंद गाडेकर, काशिनाथ व्हनकोळे, शहाजान शेख, समद मिस्त्री, हरून शेख ,बाबर सय्यद, ल्याकत सय्यद आदींसह शेकडो कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव हे माजी खासदार आनंद परांजपे यांच्या समवेत दिवसभर सहभागी झाले होते. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अव्वल स्थानी राहील यासाठी पक्ष संघटन मजबुतीसाठी आपण सर्वांनी कामाला लागावे अशा सूचना यावेळी तटकरे यांनी जाधव यांना दिला.



## फुफ्फुस विकारग्रस्तांना प्राणवायू उपकरण संचांची भेट

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

'प्रतिभा प्रभाकर पल्मोनरी रिहॅबिलीटेशन सेंटर'च्या वतीने श्वसन संस्थेचे आरोग्य आणि प्राणवायूचे महत्त्व अधोरेखित करणारा एक कार्यक्रम नुकताच गोरेगावमध्ये आयोजित करण्यात आला. समाजोपयोगी उपक्रमांना मदतीचा हात देणारे सुप्रसिद्ध उद्योजक मसालाकिंग डॉ.धनंजय दातार या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते.

फुफ्फुसाच्या विकाराने ग्रस्त, परंतु आर्थिक असहाय्यतेमुळे प्राणवायू पुरवठा उपकरणे खरेदी न करु शकणाऱ्या ६ गरजू रुग्णांना दातार यांनी स्वखर्चाने असे उपकरण संच भेट दिले. प्रत्येक संचात घरात हवा तेव्हा प्राणवायू पुरवठा करणारे ५ ते १० लिटर्स क्षमतेचे ऑक्सिजन कॉन्संट्रेटर या उपकरणांचा समावेश होता. याआधी गेल्या वर्षीही ८ रुग्णांना दातार यांनी अशीच मदत केली आहे.याप्रसंगी बोलताना डॉ. दातार म्हणाले, गेल्या वर्षी आणि यंदाही पैशाअभावी प्राणवायू उपकरणे खरेदी करु न शकणाऱ्या रुग्णांना आम्ही प्राणवायू संच भेट दिले आहेत आणि यापुढेही गरीब गरजूंना अशीच मदत करत राहणार आहोत.

# स्वराज्याचे शिल्पकार : लोकमान्य टिळक

भारताच्या इतिहासात असे काही पुरुष होऊन गेले, की ज्यांच्या विचारांनी पिढ्या घडतात. अशा विभूतींपैकी एक अग्रणी नाव म्हणजे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक. २३ जुलै १८५६ या दिवशी रत्नागिरी जिल्ह्यातील चिखली या गावात जन्मलेल्या या बालकाचे नाव पुढे संपूर्ण भारतात आदराने घेतले गेले लोकमान्य टिळक म्हणून. लोकांनी त्यांना मान्यता दिली, म्हणूनच ते 'लोकमान्य' बनले. ही मान्यता केवळ त्यांच्या कर्तृत्वाला नव्हे, तर त्यांच्या आत्मविश्वासाला, देशभक्तीला आणि जनतेसाठी लढण्याच्या ध्यासाला दिलेली होती.

लोकमान्य टिळकांचे बालपण शिस्तप्रिय वातावरणात गेले. वडील गंगाधरपंत हे संस्कृतचे अभ्यासक व शिक्षक होते. त्यामुळे घरातच शिक्षणाचे बाळकडू मिळाले. टिळकांनी पुण्याच्या डेक्कन कॉलेजमधून बी.ए. (गणित) व एल.एल.बी. ही पदवी घेतली. पण त्यांनी या शिक्षणाचा उपयोग केवळ नोकरीसाठी केला नाही. उलट शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे साधन आहे, या विश्वासाने त्यांनी शिक्षणात नवचैतन्य आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी 'न्यू इंग्लिश स्कूल' व पुढे 'फर्ग्युसन कॉलेज'ची स्थापना केली. ते शिकवायचे, विचार द्यायचे, आणि युवकांना राष्ट्रकार्यासाठी प्रेरित करायचे.लोकमान्य टिळकांनी 'केसरी' आणि 'मराठा' ही दोन वृत्तपत्रे सुरू केली, जी केवळ बातम्या देणारी माध्यमे नव्हती, तर ती नवजागृतीची मशाल होती. त्यांच्या लेखांनी इंग्रज सत्तेला हादरवून सोडले. टिळक स्पष्ट सांगायचे, ''जर न्याय मिळत नसेल, तर तो मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागेल.'' त्यांनी भारतीय जनतेला एका महत्त्वाच्या गोष्टीची जाणीव करून दिली की आपण फक्त राज्याचे प्रजे नाही, तर राष्ट्राचे जबाबदार नागरिक आहोत. लोकमान्य टिळक हे पहिले भारतीय नेते होते, ज्यांनी स्पष्टपणे आणि निर्धारपूर्वक ''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच'' अशी गर्जना केला. पण लोकमान्य टिळकांचा राष्ट्रवाद केवळ राजकीय नव्हता, तो सामाजिक आणि सांस्कृतिक पातळीवरदेखील क्रांतिकारी होता. त्यांनी सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंती या उत्सवांचे



रूपांतर जनजागृतीचे व्यासपीठ म्हणून केले. लोकांना एकत्र आणणे, चर्चा घडवणे, राष्ट्रप्रेम निर्माण करणे हे त्यांच्या या उपक्रमांचे उद्दिष्ट होते. ते म्हणत, ''धर्म हा समाजसंघटनेचे साधन असावे, समाजविघातक नसावे.'' त्यांची ही दूरदृष्टी आजही आपल्या समाजासाठी मार्गदर्शक ठरते. टिळक फक्त राजकारणात धगधगते नव्हते, तर ते एक उत्कृष्ट तत्त्वज्ञ, धर्मप्रज्ञ व अध्यात्मिक विचारवंत देखील होते. त्यांचे 'गीतारहस्य' हे पुस्तक केवळ धर्मग्रंथाचे भाष्य नाही, तर जीवनाचे चिंतन आहे. भगवद्गीतेतील कर्मयोग त्यांनी नव्याने समजावून दिला निष्क्रिय भक्तीपेक्षा सक्रीय, कर्तव्यनिष्ठ कर्म श्रेष्ठ आहे. 'धर्म म्हणजे परमार्थ नव्हे, तर कर्तव्याची पूर्णता' असे त्यांचे तत्त्वज्ञान होते.टिळकांचा संघर्ष केवळ इंग्रजांविरुद्ध नव्हता, तर भारतीय समाजातील अंधश्रद्धा, अज्ञान, अन्याय आणि परावलंबनाविरुद्धही होता. त्यांनी धर्माच्या नावाने होणाऱ्या शोषणाचा विरोध केला. त्यांनी स्त्रीशिक्षणासही पाठिंबा दिला. ते म्हणत, ''शक्तीशाली राष्ट्र उभे करायचे असेल, तर स्त्रीशक्तीला शिक्षित करायलाच हवे.''

लोकमान्य टिळक अनेकदा जेलमध्ये गेले. मंडाले, येरवडा, आणि दूर म्यानमारमधील मंडाले येथे त्यांनी वर्षानुवर्षे तुरुंगवास भोगला. पण त्यांनी हा काळ वाया घालवला नाही. 'गीतारहस्य' याच काळात लिहिले गेले. ते म्हणत, ''तुरुंग हा माझ्या विचारांची प्रयोगशाळा आहे.''टिळक गेले १९२० साली. पण त्यांच्या जाण्याने देशाची लढण्याची भावना अधिक तीव्र झाली. महात्मा गांधी म्हणाले होते ''टिळक हे आधुनिक भारताचे निर्माते होते.'' त्यांच्या विचारांनी नेहरूंना दूरदृष्टी, सुभाषबाबूंना शौर्य, आणि गांधींना जनता जोडण्याची प्रेरणा दिली.

आज आपण लोकमान्य टिळकांची जयंती साजरी करतो. भाषणे देतो, पुष्पहार अर्पण करतो. पण लोकमान्य टिळकांचे विचार कृतीत आणणे गरजेचे आहे. आज आपल्या समाजातही स्वराज्याची गरज आहे विचारांचे स्वराज्य, शिक्षणाचे स्वराज्य, आणि मानसिकतेचे स्वराज्य. आपण अजूनही अनेक गोष्टींत परावलंबी आहोत विचारांच्या बाबतीत, भाषेच्या बाबतीत, संकल्पाच्या बाबतीत.टिळकांच्या जीवनातून शिकण्यासारखी एक गोष्ट म्हणजे 'निर्भीडपणा'. ते कोणाच्याही भीतीने झुकले नाहीत. सत्य त्यांच्या शब्दांमध्ये, त्यांच्या कृतीत आणि त्यांच्या तत्त्वांमध्ये ठासून भरलेले होते. त्यांनी स्वतःच्या आयुष्याचा एकेक क्षण राष्ट्रासाठी जाळला. त्यांनी केवळ विचार दिले नाहीत, तर विचारांनी झपाटलेली पिढी तयार केली. लोकमान्य टिळक हे इतिहासाचे एक पर्व होते. त्या पर्वात ज्ञान होते, ज्वाला होती, कृती होती आणि समाजाला घडवण्याचा दृष्टीकोन होता. आपण या ज्वालामुखीला केवळ स्मरणरूपी हार न अर्पण करता, त्याच्याच ज्वालेत आपले वाईट कार्य वाईट संस्कृती आणि अपयश जाळून टाकले, तरच टिळकांचे खरे स्मरण होईल.त्यांच्या लोकमान्य टिळकांना विनम्र अभिवादन..

*असामान्य कर्तुत्व तुमचे*
*अफाट तुमची संघर्ष गाथा*
*टिळक तुमच्या कार्यापुढे,*
*सदैव लिन होती माथा..*

**- रोहिणी सचिन चौधरी**
सहशिक्षक, नू.म.वि. मराठी शाळा, सोलापूर.

## महत्वाचे...



### सभासदांच्या हितासाठी व्याजदर कमी करण्याचा निर्णय; चेअरमन कल्लप्पा फुलारी

**सोलापूर, दि. २२ जुलै-**

सोलापूर जिल्हा खासगी प्राथमिक शिक्षक शिक्षकेतर सेवक सहकारी पतसंस्थेची सर्वसाधारण सभा पतसंस्थेचे चेअरमन कल्लप्पा फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली डफरीन चौक जवळील नूमवि प्राथमिक शाळेतील शिशु सभागृहात खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाला. सभासदांच्या हितासाठी सदर सभेत व्याज दर कमी करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आल्याने सभासदांना मोठा दिलासा मिळालेला आहे. सर्वसाधारण सभेची सुरवात पतसंस्थेचे चेअरमन कल्लप्पा फुलारी यांच्या हस्ते व संचातक मंडळाच्या प्रमुख उपस्थितीत संस्थेचे आदय संस्थापक कै.चं.का.कोळशेट्टी सरांच्या आणि लक्ष्मीच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी व्यासपिठावर सचिव महादेव होमकर, खजिनदार नूरजहाँ पेरमपल्ली, विश्वजीत माणिकशेट्टी,कृष्णा हिरेमठ, रमेश बेडगे, शरद शिंदे, विदया शिंपी,शोभा चव्हाण, संगीता सक्करगी, आरती गायकवाड आदी संचालक उपस्थित होते. व्यवस्थापक समितीने निर्णय घेतलेल्या कर्जावरील व्याजदर १०.७५ टक्के वरून फक्त ९.५० टक्के केलेला असून व्याजदर कमी करण्याच्या निर्णयाचे ही सभासदांनी स्वागत केले.संचीत ठेवीवरील व्याजदर ८ टक्के वरुन ७ टक्के करण्यात आले असल्याचेही यावेळी स्पष्ट करून त्यास ही सर्वसाधारण सभेनी मंजूरी दिली. नवीन सभासद वाढविणे, कर्ज टेक ओव्हर करणे, ५०% कर्ज फेडलेले असताना नवीन कर्ज अर्ज देणे याबाबत कायदेशीर मागदर्शन घेऊन निर्णय घेण्याचे तसेच सभासदांनी विचारलेल्या हतर विविध विषयावर सविस्तर चर्चा करून संचालक मंडळानी घेतलेले निर्णय सभासदांना कळवणार असल्याचे चेअरमन फुलारी यांनी सांगीतले. राजूदास पवार, श्रीनिवास गुजर, राजश्री तडकासे, करूणा पवार, किरण घाटे, जगन्नाथ धरणे आदिनी विविध विषयाच्या चर्चेत सक्रिय सदभाग नोंदवले. संचालिका शोभा चव्हाण यांनी सूत्रसंचलन केले तर आभार सचिव महादेव होमकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वितेसाठी सर्व संचालकासह सतीश पेरमाळ आणि सिद्राम मायकुंटी यांनी प्रयत्न केले.

**जिल्हा खासगी शिक्षक पतसंस्था सर्वसाधारण सभा**

### सह्याद्रीच्या केंद्रावर डी.फार्मसी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु : डॉ. इंगवले

**सांगोला, दि.२२ जुलै-**

मेथवडे, (ता.सांगोला) येथील सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसीत प्रथमवर्ष पदविका डी.फार्मसी अभ्यासक्रमाच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रिया अर्ज सुविधा केंद्र म्हणून महाराष्ट्र शासनाकडून मंजुरी मिळाली आहे अशी माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार इंगवले यांनी दिली. या सुविधा केंद्रामध्ये विद्यार्थ्यांचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन व मूळ कागदपत्रे पडताळणी, अर्ज निश्चिती होणार आहे. ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत पालक व विद्यार्थ्यांच्या विविध शंका व अडचणी याबाबत मोफत सखोल मार्गदर्शन या महाविद्यालयातील अनुभवी व तज्ञ प्राध्यापकांमार्फत उपलब्ध होणार आहे. तरी सर्व विद्यार्थी व पालकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ. इंगवले यांनी केले आहे. याबाबत अधिक माहितीसाठी डॉ.ए.एम.तांबोळी (९९७५४०२४६५), डॉ. औदुंबर माळी (९९७५९२८३५०), पी.एस.लोखंडे (९८२३१०७३७१) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील यांनी केले आहे.

सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी या सुविधा केंद्रामध्ये बारावी विज्ञान उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे पदविका (डी.फार्मसी) प्रथम वर्ष प्रवेशकरिता ऑनलाईन अर्ज दि.२३ जुलै ते २५ ऑगस्ट दरम्यान स्वीकारले जाणार आहेत व तात्पुरती मेरिट लिस्ट दि.२८ ऑगस्टला तर अंतिम मेरिट लिस्ट दि.३ सप्टेंबर रोजी आहे.

# सार्वजनिक बांधकाम विभागात कोट्यवधींचा भ्रष्टाचार

## अधिकारी, ठेकेदार यांच्या निषेधार्थ आमरण उपोषण



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

सार्वजनिक बांधकाम विभाग या कार्याकडून सन २०२१ ते २०२५ या कालावधीमध्ये कोट्यावधी रुपये भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकारी व ठेकेदार यांच्या निषेधार्थ आर बी दयावान बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभाग या कार्यालयासमोर विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आमरण उपोषणाची सुरुवात करण्यात आली. यामध्ये भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सन २०२१ ते २०२५ या कालावधीमध्ये कोट्यावधी रुपये दुसरीकडे वळवणाऱ्या अधिकारी व ठेकेदार यांच्यावर ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल झाला पाहिजे. महापालिका क्षेत्रातील मूलभूत सुविधा विशेष तरतूद योजना सन २०२१ ते २०२५ झालेले काम दाखवून बोगस बिल उचलणारी अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कायदेशीर गुन्हे दाखल झाले पाहिजे. माजी अधीक्षक अभियंता संजय माळी, कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे, उप अभियंता श्रीकांत गायकवाड माझी शाखा अभियंता विशाल लेंगरे व मक्तेदार गायत्री कंट्रक्शन व यश उमेश हत्ते यांच्यावर ॲट्रॉसिटी ॲक्टनुसार कायदेशीर गुन्हे दाखल झाला पाहिजे. प्रशासनाची दिशाभूल करणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करून मक्तेदारांना देण्यात आलेले बिल वसूल करून घेण्यात यावे व मक्तेदारांना कायमच ब्लॉक लिस्ट यादीत टाकण्यात यावे अशा विविध मागण्या आहेत. यावेळी संस्थेचे सचिव विश्वभूषण कांबळे, अध्यक्ष तुळजाराम आलम, अभिजीत जाधव, रोशन सोनकांबळे, ज्योती शिरकुल, रोहन सकी, साक्षी सोनकांबळे, विश्वरत्न कांबळे आदी उपस्थित होते.



## लोकमंगल महाविद्यालयातर्फे रेशीम उद्योग कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

वडाळा (ता. उत्तर सोलापूर) येथील श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषी महाविद्यालयात मंगळवारी दि. २२ जुलै रोजी रेशीम उद्योग कार्यशाळा घेण्यात आली. यामध्ये दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तुर, वडकबाळ, राजूर, होटगी, होटगी स्टेशन, होनमुर्गीसह अन्य गावातील शेतकऱ्यांचा सहभाग होता.

कार्यशाळेच्या अध्यक्षपदी प्राचार्य डॉ. अमोल शिंदे होते. जिल्हा रेशीम उद्योग केंद्राचे अधिकारी शिवानंद जोजन हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन फुगे आणि लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. सागर महाजन हे मान्यवर कार्यक्रमास लाभले. प्रास्ताविक कीटकशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापक प्रा. अभिजीत नारायणकर यांनी केले. विद्यार्थी प्रतिनिधी प्रेमराज वाघ याने रेशीम शेती या विषयाचे सखोल सादरीकरण चल चित्रफितीच्या माध्यमातून सादर केले. सादरीकरणांमध्ये तुती लागवड, रेशीम अळी व तिच्या वाढीचे टप्पे, अळी संगोपन, कोष निर्मिती, विक्री व्यवस्थापन आणि शासकीय योजना इत्यादी सर्व बाबी त्याने विस्तृत पद्धतीने मांडल्या.

विविध शासकीय योजना आणि रेशीम शेतीतील बारकावे त्यांनी यावेळी विशेषपणे नमूद केले. कार्यशाळेचे अध्यक्ष म्हणून डॉ. अमोल शिंदे यांनी उपस्थित शेतकऱ्यांचे मनस्वी आभार व्यक्त केले आणि भविष्यात देखील महाविद्यालयातर्फे संपन्न होणाऱ्या विविध कार्यशाळेस पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी उल्लेखनीय उपस्थिती दर्शवावी अशी इच्छा देखील त्यांनी प्रकट केली. कार्यशाळेच्या औपचारिक उद्घाटनाचे सूत्रसंचालन कु. वैष्णवी फडतरे आणि आभार प्रदर्शन कु. मयुरी पाखरे यांनी केले. औपचारिक कार्यक्रमानंतर शेतकऱ्यांनी महाविद्यालयाच्या रेशीम शेती युनिटला सदिच्छा भेट दिली आणि प्रत्यक्षरीत्या रेशीम शेतीचा अनुभव घेतला. कार्यशाळेचे आयोजन करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदेंचे मार्गदर्शन लाभले. कार्यशाळेचे यशस्वी आयोजन व संपन्नतेसाठी प्रा. अभिजीत नारायणकर, कृषीविस्तार विभाग प्रमुख प्रा. प्रज्ञा कुदळे आणि अंतिम वर्षातील रावे व मॉड्युलच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. कार्यशाळेस ३० शेतकरी, वद्यार्थी-विद्यार्थिनी आणि सर्व प्राध्यापकवृंद यांची उपस्थिती होती.

# चित्रकला परीक्षेच्या शुल्क वाढीला विरोध

## मंडळाविरोधात संताप; कलाध्यापक संघ महामंडळाचा पाठपुरावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

महाराष्ट्र कलाशिक्षण मंडळ दरवर्षी आयोजित करीत असलेल्या एलिमेंटरी व इंटरमिजिएट चित्रकला परीक्षांचे शुल्क दुप्पट वाढविण्यात आले. अचानक आणि कोणतीही पूर्वसूचना न देता वाढ करण्यात आल्यामुळे विद्याथ्यर्थ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. ही शुल्कवाढ मागे घेण्याची मागणी महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघाने केली आहे.

गेल्या वर्षी एलिमेंटरी परीक्षेसाठी ५० रुपये, तर इंटरमिजिएटसाठी १०० रुपये परीक्षा शुल्क होते. यावर्षी अनुक्रमे १०० रुपये आणि २०० रुपयेइतकी वाढ करण्यात आली. एलिमेंटरी व इंटरमिजिएट चित्रकला परीक्षांमध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी होतात. त्यातील ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांना या परीक्षेचा लाभघेणे शुल्कवाढीमुळे कठीण झाले आहे. खेड्यातील शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शुल्कवाढ अडथळ्याचे ठरणार आहे.



तसेच, या विद्यार्थ्यांना परीक्षेचे रंग साहित्य घेण्यासाठी मोठी रक्कम खर्च करावी लागत असून परीक्षेला जातानाचा प्रवास खर्चही वाढला आहे, अशा स्थितीत विद्यार्थी या परीक्षेपासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ महामंडळाचे राज्याध्यक्ष नरेंद्र बाराई यांनी ही अन्यायकारक शुल्कवाढ तातडीने मागे, घ्यावी, अशी मागणी केली आहे.

विद्यार्थ्यांचे हक्क, संधी आणि आर्थिक अडचणी लक्षात घेता, शासन आणि कला शिक्षण मंडळाने या शुल्कवाढीचा पुनर्विचार करण्याची मागणी राज्य कलाध्यापक संघ महामंडळ जिल्हा पुणे, पुणे जिल्हा विभागीय सहकार्यवाह दीपक कन्ना सोलापूर जिल्हा कलाध्यापक संघाचे अध्यक्ष गणेश तडका, सचिव मुकुंद मोरे तसेच सोलापूर जिल्हा संघाचे सर्व पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

# गांधी फोरमचे राष्ट्रीय अध्यक्ष पुरुषोत्तम बलदवा यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

राष्ट्रीय गांधी फोरमचे अध्यक्ष पुरुषोत्तमजी बलदवा यांच्या ७७व्या वाढदिवसानिमित्त ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर मंदिर येथे दर्शन घेऊन पूजा अर्चा करून उत्साहात कार्यकर्त्यांच्या समवेत त्यांचा सत्कार समारंभ झाला.

प्रारंभी मंदिर समितीचे दर्गो पाटील यांच्या हस्ते व देवस्थान पंचकमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांच्या हस्ते पुरुषोत्तमजी यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सुनील घंटे म्हणाले की बलदवा यांनी गांधी फोरम च्या माध्यमातून समाजामध्ये मोठ्या प्रमाणात सामाजिक कार्य केलेले आहेत.

धर्मनिरपेक्षता या भावनेने महात्मा गांधीजींच्या विचाराच्या प्रेरणेने त्यांनी आयुष्यभर महात्मा गांधीजींची तत्त्व प्रणाली समाजामध्ये रुजविण्याचे काम केले. स्वर्गीय रंगांअण्णा वैद्य यांच्या विचाराचा वारसा त्यांनी कायमस्वरूपी चालवला. वय झाले तरीही मोठ्या प्रमाणात त्यांचे



कार्य असून. ते अजूनही तरुणाला लाजवेल असे उत्साहाने काम करीत असतात. यावेळी महेश कासट सुनील शेळके. प्रदीप रजपूत आधीसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते सोलापूरचे खासदार प्रणिती ताई शिंदे यांनीही त्यांचा सन्मान केला.

यावेळी जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष श्री सातलिंग षटकार सर राष्ट्रीय गांधी फोरमचे सचिव श्री नंदकुमार यल्ला शिवबाळ मुली नितीन कुलकर्णी चंद्रकांत सपळे जहांगीर शेख बाळ दळवी आधी सह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

# ॲड. सुयश नवले विधी शाखेत प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै -**

येथील सुयश नवले यांनी विधी शाखेच्या वर्षात प्रथमश्रेणीत विशेष प्राविण्यासह यश मिळवून प्रथम येण्याचा मान मिळिवला.

शाळेत असतांना पोरानं चुणुक दाखवली, चौथी, सातवी, दहावी आणि बारावी अव्वल गुणांनी उत्तीर्ण होऊन वकील होण्याचे स्वप्न उराशी बाळगले आणि विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यातील मराठवाडा मित्र मंडळाचे शंकरराव चव्हाण लॉ कॉलेज मध्ये विधी शाखेची पदवी प्रथम श्रेणीत विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण होऊन प्रथम क्रमांक मिळिवला.

विधी शाखेचा अभ्यास करत असतांनाच टॅक्सेसन-लॉ व सायबर लॉ अशा अतिशय महत्वाचे कोर्सेस मध्ये विशेष प्राविण्य मिळवून विद्यापीठात चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला. एवढेच नव्हे तर महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागामार्फत कायदयाच्या विद्यार्थ्यांना कायदेविषयक कामाचा अनुभव मिळावा यासाठी चालविल्या जाणा-या 'लेजिस्लेशन इंटर्नशिप प्रोग्राम' 'महाराष्ट्र शासन' मध्ये सुयश यांची निवड झाली व त्यात त्यांनी कायदे तयार करणे, कायदे दुरूस्ती व कायदे विषयक संशोधन यावर विशेष अभ्यास केला आणि त्या अंतर्गत विधी मंडळाच्या पावसाळी अधिवेशनात सहभाग नोंदविला.



तसेच विविध राष्ट्रीय व राज्यस्तरीय मुट कोर्ट (अभिरुप न्यायालय) स्पर्धेत वेळोवेळी भाग घेऊन त्यांनी देशपातळीवर प्रथम व द्वितीय क्रमांक मिळिवला व त्यांना १७ व्या कै. ॲड. डी व्ही जयभावे मेमोरियल नॅशनल लेवल मूट ट्रॉयल मध्ये उत्तम युक्तीवाद केलेला अभिवक्ता म्हणून प्रथम क्रमांकाचा बहुमान मिळाला. या व्यतिरिक्त त्यांनी कायदयाच्या विविध विषयात लिहिलेले २ शोध निबंध प्रसिध्द झाले आहेत व शिक्षण घेतांना स्टुंडट कौन्सिलचा सदस्य म्हणून त्यांनी उत्तम नेतृत्व केले.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः मौजे वैराग, लाडोळे, ता. बार्शी येथील लोकांना कळविण्यात येते की, वैराग हद्दीतील गट नं. ६८/१ क्षेत्र १ हे ९४ आर, लाडोळे हद्दीतील गट नं. ३१७/१ क्षेत्र ७ हे ४१ आर व लाडोळे हद्दीतील गट नं. ३१७/२ क्षेत्र १ हे ४९ आर या जमीनी आमचे खाली सही करणारे आशिल व अशोक बापुराव शिलवंत यांचे एकत्र हिंदु कुटुंबाचे असुन त्यांची वरील नमुद मिळकती एकत्रात कब्जे वहिवाट आहे. कोणतीही कायदेशीर गरज नसताना अशोक बापुराव शिलवंत हा वर नमुद जमीनीचे क्षेत्र त्रयस्त इसमास विक्री करण्याची भाषा करत आहे. आमचे आशिल वर नमुद मिळकतीबाबत वाटपाचा दावा दाखल करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीबाबत अशोक बापुराव शिलवंत यांच्याशी कोणतीही, कसल्याही प्रकारचा हस्तांतरणाचा व्यवहार करु नये. केल्यास तो आमचे आशिलाच्या हक्कावर, हिश्यावर बंधनकारक राहणार नाही व मुलतः रद्दबातल ठरेल. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून हि जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. दि.१९/०७/२०२५

सही/-
ॲड. श्री. मिलिंद जे. खुपसरे
रा. वैराग, ता. बार्शी
सौ. अनुराधा नागराज तळवाड
रा. कलबुर्गी तर्फे ॲडव्होकेट




**स्व. मुकेश यांच्या मधुर गंध मोहक स्वरांची मैफल...**
सोलापूर : व्यंकटेश संगीत विद्यालयाच्या वतीने लोकमान्य टिळक सभागृहात मंगळवारी सायंकाळी कै. मुकेशकुमार यांच्या जन्मदिननिमित्त मधुर गंध मोहक स्वरांचा कार्यक्रम सादर करताना सोलापुरातील गायक-कलावंत.


## IDFC FIRST Bank Limited

(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)
CIN : L65110TN2014PLC097792
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>कर्ज खाते क्रमांक</th><th>कर्जाचे प्रकार</th><th>कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे</th><th>कलम १३ (२) सूचना तारीख</th><th>कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम</th></tr>
<tr><td>1</td><td>125182984</td><td>मालमत्तेवर कर्ज</td><td>१. राहुल उत्तम मदने<br>२. उत्तम सयप्पा मदने</td><td>09/04/2025</td><td>रुपये 9,71,207.86/-</td></tr>
<tr><td colspan="6">मालमत्तेचा पत्ता : ग्रामपंचायत पुळुजवाडीच्या रजिस्टरमध्ये मालमत्ता क्रमांक ३२ कडे नोंदणीकृत असलेला सर्व तुकडा आणि पार्सल, एकूण जमीन क्षेत्रफळ ८७५ चौ. फूट, दगड, विटा आणि काँक्रीटने बांधलेले निवासी घर ज्याचे क्षेत्रफळ तळमजला : ८७५.00 चौ. फूट. एकूण बांधलेले क्षेत्रफळ = ८७५.00 चौ. फूट., गाव येथे स्थित: पुळुजवाडी, ता.: पंढरपूर, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४, आणि पूर्व : मिळकत क्रमांक ३० पश्चिम: रस्ता उत्तर : मिळकत क्रमांक ३५ दक्षिण : मिळकत क्रमांक ३०/१.</td></tr>
<tr><td>2</td><td>137674942</td><td>मालमत्तेवर कर्ज</td><td>१. संदीप दिलीप घाडगे<br>२. शुभांगी संदीप घाडगे</td><td>05/07/2025</td><td>रुपये 10,62,587.44/-</td></tr>
<tr><td colspan="6">मालमत्तेचा पत्ता : निवासी घर मालमत्तेचे सर्व तुकडे आणि पार्सल बोरगाव गावात आहेत, तालुका: माळशिरस, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३११२, एनए गट क्रमांक ३६९ क्षेत्रफळ ७२.00.00 आर, चौ. मीटर (७२00.00 चौ. मीटर) विक्री करारानुसार प्लॉट क्रमांक ११ क्षेत्रफळ २.00.00 आर, चौ. मीटर. (२00.00 चौ. मीटर) उत्तर बाजूच्या क्षेत्राबाहेर 0 एच ०१ आर (१00.00 चौ. मीटर) त्यात बोरगाव ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ८२७/२ मध्ये खालीलप्रमाणे एकत्रित सीमा आहेत: विक्री करारानुसार सीमा: पूर्व : कॉमन कॉलनी रोड पश्चिम : गट क्रमांक ३५९ उत्तर : प्लॉट क्रमांक १० दक्षिण : प्लॉट क्रमांक १२</td></tr>
<tr><td>3</td><td>64621139</td><td>मालमत्तेवर कर्ज</td><td>१. तानाजी शिवाजी आठवले<br>२. शिवाजी दामू आठवले<br>३. शैलजा तानाजी आठवले</td><td>05/07/2025</td><td>रुपये 5,23,931.32/-</td></tr>
<tr><td colspan="6">मालमत्तेचा पत्ता : ग्रामपंचायत मिल्कट क्र. १०३ चा सर्व तुकडा आणि पार्सल, एकूण मोजमाप क्षेत्र १०६४ चौ. फूट., ग्रामपंचायतीच्या हद्दीत स्थित: शंकरगाव नळी, उप-विभाग: पंढरपूर, विभाग: सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४, आणि सीमा: पूर्व : रेखा साधू प्रकाशे पश्चिम : धीरज शिखरेचे जनरल स्टोअर उत्तर : विष्णू धर्म चंदनशिवे दक्षिण : रस्ता</td></tr>
</table>

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**
**(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)**

**दिनांक : २३/०७/२०२५**
**ठिकाण : सोलापूर, महाराष्ट्र**



### जाहिर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली ग्रामपंचायत मिळकत ही यापूर्वी लक्ष्मी उत्तम गाटे व आशा भारत गाटे यांचे नावे होती तदनंतर लक्ष्मी उत्तम गाटे व आशा भारत गाटे यांनी सदरील मिळकत ही दत्तात्रय प्रभाकर भोसले यांना नोंदणीकृत हक्कसोडपत्र क्र.१०४१/२०१५ दिनांक ०६.०५.२०१५ अन्वये हस्तांतरीत केली याप्रमाणे दत्तात्रय प्रभाकर भोसले हे खालील संपूर्ण मालमत्तेने मालक व कब्जेवहिवाटदार आहेत. दत्तात्रय प्रभाकर भोसले यानी आमचे अशिल पिरामल फायनान्स लि. यांचेकडे कर्ज मागणी केलेली आहे व त्याकरिता तारण महणून (मॉरगेज) ठेवून घेऊन आमचे अशिल कंपनीने कर्ज देण्याची तयारी दर्शविलेली आहे. सदर परिशिष्टात नमूद केलेली मिळकत ही पूर्णपणे निर्वेध, निजोखमी असलेचा भरवसा सदरील विद्यमान वहिवाटदार मालक यानी आमचे अशिल कपनीस दिलेला आहे.

तरी सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही, कसल्याही प्रकारचा मालकी हक्क, वारसा हक्क, हितसंबध, गहाण, दान, लिज, लिन, भाडेपट्टा, मुख्त्यार, पोटगी, खंड, नोकरनामा, अदलाबदल, करारनामा, बक्षीसपत्र इत्यादी कोणत्याही प्रकारचा हक्क वा अधिकार असल्यास त्यांनी त्या बाबतीत खालील पत्त्यावर सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून सात दिवसाचे आत सर्व संबंधित कागदपत्र व पुराव्यासह आमचेकडे लेखी हरकत कळवून पोहोच घ्यावी. सदरील मुदतीत कोणतीही हरकत न आलेस सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी व बोजारहित असल्याचे आणि त्या कोणाचा हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे गृहीत धरून आमचे अशिल कंपनी सदर मिळकत कर्ज प्रकरणाकरिता तारण म्हणून गहाणखताचा दस्त पूर्ण करतील व तनंतर आलेली कोणाचीही कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

**मिळकतीचे वर्णन :-**
मौजे रऊळगाव ता.बार्शी, जि. सोलापूर येथील ग्रामपंचायत मालमत्ता क्र. २८२ क्षेत्र १५०८ चौ. फुट ज्याची चतु:सिंमा पुर्वेस ग्रामपंचायत रोड , पश्चिमेस तुकाराम भोसले यांची जागा, दक्षिणेस - धोंडीराम भोसले यांची जागा व उत्तरेस- अशोक भोसले यांची जागा, येणेप्रमाणे आहे.
**येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली.**
**दिनांक २१/०७/२०२५**

**अशिलातर्फे विधिज्ञ**
**ॲड. विष्णू डी. मोरे**
लक्ष्मी निवास, घर क. १९१८, कोर्ट कॉलनी, सांजा रोड, धाराशिव,ता.जि. धाराशिव ४१३५०१
**मो.नं. ९४२३७६६०२४**


# एमसीए ब संघाची ४०५ धावांची 'हर्ष' कामगिरी

## २३ वर्षाखालील राज्य संघ निवड चाचणी क्रिकेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या सोलापूर जिल्हा क्रिकेट संघटनेच्या सौजन्याने येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियम आणि दयानंद कॉलेज मैदानावर राज्यातील २३ वर्षाखालील मुलांसाठीच्या संघ निवडीसाठी ३ दिवसीय क्रिकेट सामन्यांच्या दुसऱ्या फेरीतील पहिल्या दिवशी नाणेफेक जिंकून बी संघाच्या ३ हर्ष खेळाडूंनी धमाकेदार कामगिरी करत ४०५ धावा


हर्ष ओसवाल


हर्ष मोगावीरा

झोडपल्या. त्यात हर्ष मोगावीरा चे दीडशतक तर हर्ष ओसवाल ७०, हर्षल हाडके ५५ धावा केल्या तर डी संघाकडून निमीर जोशीने ६१ धावांत ७ बळी मिळविले.

दयानंद कॉलेजच्या मैदानावर कालच्या पावसामुळे उशिरा खेळ सुरू झाला व पुन्हा पाऊस आल्याने १५ च षटकांचा खेळ झाला.

**संक्षिप्त धावफलक :**
**इंदिरा गांधी पार्क स्टेडियम**
एमसीए बी (१): ४०५/१० (७४.२) हर्ष मोगावीरा १७९, हर्ष ओसवाल ७९, हर्षल हाडके ५५, सागर पवार ३४ निमिर जोशी ६१/७ बळी, शुभम खरात यश खळदकर प्रत्येकी १ बळी. एमसीए डी(१): ४/० (१)

**दयानंद कॉलेज ग्राउंड :**
एमसीए ए(१): ५२/२ (१५) नीरज जोशी नाबाद २८, कौशल तांबे १० वैभव टेहळे निलय संगवी प्रत्येकी १ बळी

## महत्वाचे...



### पंचमुखी हनुमान मंडळाच्या अध्यक्षपदी वैभव गुर्रम

**सोलापूर, दि. २२ जुलै-**

जूना वालचंद कॉलेजसमोरील श्री पंचमुखी हनुमान सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी वैभव गुर्रम यांची निवड झाली. वार्षिक सर्वसाधारण बैठकीत संस्थापक अध्यक्ष पवन बोम्मा यांच्या अध्यक्षतेखाली ही निवड सर्वानुमते करण्यात आली. अन्य पदाधिकारी असे : उपाध्यक्ष- प्रविण परकीपंडला, राम सिंगम, रमेश बोलली, गणेश सिंगम, सचिव-श्रीयश गुज्जर. सहसचिव -हरिप्रसाद बोम्मा, खजिनदार-श्रीनाथ चिंताकिंदी, सह खजिनदार-प्रविण इप्पलपली. मिरवणूक प्रमुख- भालचंद्र मच्छा, पुंडलिक गुर्रम.



### शहर वाहतूक शाखेच्यावतीने जप्त ५२५ सायलेन्सरवर फिरवला बुलडोजर

**सोलापूर, दि. २२ जुलै-**

शहर वाहतूक शाखेच्या वतीने मंगळवारी जप्त करण्यात आलेल्या ५२५ सायलेन्सवर बुलडोझर फिरवला. शहरात दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत आहे. नागरिकांकडून आणि विशेषतः तरुण मुलांमध्ये बुलेट सारखी दुचाकी वाहन वापरण्याचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे सदर वाहनांना मॉडीफाईट सायलेन्सर बसवून अशी दुचाकी वाहने मोठ्याने सायलेन्सरचा आवाज करीत मिरवणुकीमध्ये अथवा कॉलेज समोरुन जाण्याचे तक्रारी वारंवार वरीष्ठांना प्राप्त झाले होते. या अनुषंगाने पोलीस आयुक्त एम राज कुमार यांचे निर्देशानुसार पोलीस उप-आयुक्त (मुख्यालय) गौहर हसन, सहाय्यक पोलीस आयुक्त सुधीर खिरडकर यांचे मार्गदर्शनाखाली सोलापूर शहरात बुलेट सायलेन्सर व मॉडीफाईड सायलेन्सर बाबत दैनंदिन विशेष मोहिम राबविण्यात येत आहे.मोहिमदरम्यान शहर वाहतुक शाखा (दक्षिण विभाग) चे पोलीस निरीक्षक रविंद्रनाथ भंडारे यांचे पथकाने अशा मॉडीफाईड सायलेन्सर वापरणाऱ्या दुचाकी वाहनांवर कारवाई करुन एकूण ४१० सायलेन्सर जप्त करण्यात आले होते, तसेच शहर वाहतुक शाखा (उत्तर विभाग) चे पोलीस निरीक्षक सुरज चाटे यांचे पथकाने कारवाई करीता एकूण ११५ सायलेन्सर जप्त करण्यात आले होते, शहर वाहतूक शाखेने सर्व जप्त एकुण ५२५ सायलेन्सरचा बुलडोजरने नाश करण्यात आले. तसेच याप्रसंगी पोलीस उप-आयुक्त (मुख्यालय) गौहर हसन यांनी सोलापूर शहरातील जनतेला वाहतुक नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले व भविष्यात अशाप्रकारे बुलेट सायलेन्सर, मॉडीफाईड सायलेन्सर, ऑटो रिक्षा चालकांकडून वारंवार होणाऱ्या वाहतुक उल्लंघनावर देखील विशेष मोहिम मोठ्या प्रमाणात राबविले जाणार असल्याचे सांगितले. तसेच सोलापूर शहराची वाहतुक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालक व वाहनांवर कठोर कारवाई करण्याची मोहिम शहरात दैनंदिन सुरु राहील अशी माहिती त्यांच्या वतीने याप्रसंगी देण्यात आली.

# पावसाने पंढरपुरात रस्त्यांना महापूराचे स्वरुप

### खड्ड्यांची समस्या पाचवीला पुजलेली
### नागरिकांचा संतप्त सवाल

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि. २२ जुलै -**

पंढरपूर शहरात मंगळवारी अर्धा ते पाऊणतास पावसाच्या सरी बरसल्या. यामुळे शहरातील अनेक रस्त्यांवर महापूरासारखे पाणी साचलेले होते. पंढरपूर नगरपालिकेकडून नालेसफाई, गटारींची सफाई केली जात नाही. त्याचाच हा परिणाम असल्याचे दिसत आहे. या बरोबरच शहरातील रस्त्यांवर जागोजागी पडलेले खड्डे, उपनगरातील रस्त्यांची झालेली दयनीय अवस्था यामुळे पंढरपूरचा विकास हा खरंच भकास होतो आहे का ? असा संतप्त सवाल शहरातील नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

शहरात दोन दिवसांपूर्वी संध्याकाळच्या वेळी काही वेळ पावसाच्या धारा बरसल्या त्या नंतर मंगळवारी (ता.२२) दुपारी देखील पाऊस बरसला, पावसाळा असल्याने पाऊस हा बरसणारच मात्र या अर्धा ते पाऊणतासाच्या पावसाने शहरातील अनेक भागात महापूरा सारखी परिस्थिती रस्त्यांवर निर्माण झाल्याचे दिसुन आले. विशेषत: शहरातील मुख्य असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज चौक ते चौफाळा, शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक ते काळा मारुती,नाथचौक या बरोबरच घोंगडे गल्ली,संतपेठ आदी भागातील रस्त्यांना अगदी महापुर आल्यानंतर ज्या प्रमाणे रस्त्यांवर पाणी भरते तशी रस्त्यांची अवस्था निर्माण झाली होती. वास्तविक हे



दयनीय चित्र पहात असताना सहाजिकच विठ्ठलाची नगरी, तिर्थक्षेत्र पंढरपूरच्या नावाने शासनाकडून लाखो रुपये अनुदान मिळविणारी येथील नगरपालिका शहरात स्वच्छता करते का ? असा प्रश्न सर्वसामान्य पंढरपूरकरांपुढे उपस्थित झाल्या शिवाय रहात नाही. त्यामुळेच ऐरव्ही जावु द्या निदान पावसाळ्या पूर्वी तरी शहरातील मोठे नाले ,ड्रेनेज तसेच उघड्या गटारी यांची नियमित स्वच्छता होणे आवश्यक आहे. कारण जर थोड्याशा पावसामुळे पंढरपूर शहरातील महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या रस्त्यांवर अशा प्रकारे महापुरा प्रमाणे साचलेले पाणी पाहुन खऱ्या अर्थाने पंढरपूरचा विकास होतो आहे की विकासाच्या नावाखाली पंढरपूर भकास होते आहे अशा संतप्त प्रतिक्रिया पंढरपूरकर नागरिकांकडून व्यक्त होताना ऐकावयास मिळाता आहेत.

#### पंढरपूरचा नावलौकीक जपण्याची गरज

पंढरपूर हे राज्यातील महत्वाचे तिर्थक्षेत्र आहे. त्यामुळे सहाजिकच बाहेरगावच्या नागरिकांची देखील दररोज येथे मांदियाळी असते. अशातच पंढरपूरच्या रस्त्यांची अर्ध्या, पाऊणतासाच्या पावसामुळे अशी दयनीय अवस्था पाहिल्यावर राज्यभरात पंढरपूरचा नावलौकीक काय होत असेल हे वेगळे सांगायची गरज नाही. त्यामुळेच येथील पालिकेच्या आधिकाऱ्यांनी, कर्मचाऱ्यांनी गांभिर्याने शहर स्वच्छतेकडे लक्ष देवून तिर्थक्षेत्र पंढरपूरची दैनंदिन स्वच्छता कशी राखली जाईल, पंढरपूर शहर खड्डेमुक्त कसे होईल याकडे जाणिवपूर्वक लक्ष केंद्रीत केले पाहिजे.

#### राजकीय मंडळींचे देखील दुर्लक्ष

कोट्यावधी रुपयांचा शासन निधी मिळवून पंढरपूरच्या विकासाच्या गप्पा मारणाऱ्या सर्वपक्षीय राजकीय पक्षांच्या मंडळींनी देखील पंढरपूर विकासाच्या खोट्या गप्पा मारण्या पेक्षा खरोखर पंढरपूरचा विकास योग्य रितीने होतो आहे काय हे जाणीवपूर्वक लक्ष देवून पाहण्याची आणि जर तसे काम पालिकेच्या आधिकाऱ्यांकडून, कर्मचाऱ्यांकडून होत नसेल तर त्यांना जाब विचारण्याची देखील तयारी दर्शविली पाहिजे. त्यामुळेच पंढरपूर अशी अपेक्षा पंढरपूर वासियांकडून आपसुकच व्यक्त होताना ऐकावयास मिळत आहे.

#### कचऱ्याच्या आकडेवारीचे गौडबंगाल

आषाढी यात्रे अगोदर पालकमंत्री जयकुमार गोरे व जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या पुढाकाराने शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. त्यावेळी शेकडो टन कचरा उचलला गेल्याच्या बातम्या शासकीय स्तरावर प्रसिध्दीस देण्यात आल्या. वास्तविक जर एका दिवशी स्वच्छता करुन शेकडो टन कचरा स्वच्छता अभियानातून उचलला जात असेल तर येथील नगरपालिका दररोज शहरात कोणती स्वच्छता करते ? हा देखील सवाल सर्वसामान्य शहरवासियांकडून उपस्थित होतो आहे.

#### वाहन चालवताना करावी लागते कसरत

शहरातील स्वच्छतेच्या विषया बरोबरच शहरातील रस्त्यांची खड्यांमुळे झालेली दूरवस्था, या खड्यांच्या रस्त्यांवरुन जाताना वृध्द, महिला तसेच लहान मुलांचे हाल, वाहनचालकांना वाहन चालविताना करावी लागणारी कसरत आदी समस्यांकडे देखील पहायला कोणाला वेळ नाही. मंत्री, संत्री येणार म्हटल्यावर तसेच यात्रांच्या अगोदर शहरातील प्रमुख रस्त्यांवरील खड्यांमधून डांबरसदृश्य ऑईल मिश्रीत द्रावणाच्या छिरकाव्यासह कचखडी भरुन ठिगळे लावण्याचे काम ठेकेदार मंडळींकडून पालिकेचे आधिकारी मन लावून करुन घेताना दिसुन येतात.

## महात्मा गांधी प्राणी संग्रहालयाच्या विकासासाठी एनटीपीसी अन् पालिकेचा करार

### २.७९ कोटींच्या सीएसआर निधीतून
### काळवीट, मोरांचे अधिवाससह करणार कामे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी अंतर्गत एनटीपीसी सोलापूर यांनी सोलापूर महानगरपालिकेच्या अखत्यारितील महात्मा गांधी प्राणीसंग्रहालयाच्या विकासासाठी आज २.७९ कोटींचा विकास करार करण्यात आला आहे.

यावेळी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, एनटीपीसी सोलापूरचे कार्यकारी संचालक बी.जे.सी. शास्त्री, एचआर विभागप्रमुख मनोरंजन सारंगी, पर्यावरण विभागप्रमुख रफीक उल इस्लाम, एचआर विभागाचे डीजीएम अमित सिंग, प्राणी संग्रहालय प्रकल्प विभागाचे उपअभियंता अविनाश वाघमारे, कनिष्ठ अभियंता चेतन प्रचंडे आदी उपस्थित होते




या निधीतून प्राणी संग्रहालयामधील काळवीटांचे अधिवास व निवासस्थान, बिबट्या व सिंह यांचे क्राल परिसर तसेच मोरांचे अधिवास उभारण्यात येणार आहेत. या निधीद्वारे प्राणीसंग्रहालयाच्या परिसरातील नैसर्गिक अधिवासाची रचना अधिक सुसज्ज केली जाणार आहे. बिबट्या व सिंहांसाठी आधुनिक व सुरक्षित क्राल उभारणे, काळवीट व मोरांसाठी नैसर्गिक अधिवास तयार करणे हे या प्रकल्पाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

डॉ. ओम्बासे म्हणाले, ''प्राणीसंग्रहालय हे सोलापूर शहराच्या पर्यावरणीय जडणघडणीचा एक महत्त्वाचा भाग आहे. एनटीपीसी सोलापूरकडून मिळालेला निधी प्राणीसंग्रहालयाच्या दर्जात्मक सुधारणा व अभ्यागतांसाठी अनुभव समृद्ध करण्यासाठी उपयुक्त ठरेल.''

संचालक शास्त्री यांनी म्हणाले,'' सीएसआर उपक्रम ांतर्गत आम्ही समाजाशी नाते दृढ करण्याचा प्रयत्न करतो. प्राणीसंग्रहालयाचा विकास म्हणजे पर्यावरणाचे संरक्षण व भावी पिढ्यांसाठी शाश्वत जीवनमूल्यांची जपणूक.'' हा उपक्रम शहरातील पर्यावरणपूरक पर्यटनाला चालना देणार असून, शालेय विद्यार्थी, पर्यटक व नागरिकांसाठीही हे एक शैक्षणिक व मनोरंजनात्मक स्थळ ठरणार आहे, असे ते म्हणाले.

## सोलापूर शहर-जिल्ह्यात पावसाची दमदार हजेरी

### शेतकऱ्यांत समाधानाचे वातावरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

गेल्या २-३ दिवसांपासून आभाळी वातावरण होते. गेल्या महिन्याभरापासून गायब झालेला पाऊस आज चांगलाच बरसला. शहर व जिल्ह्यात सायंकाळी सुरू झालेला पाऊस रात्री उशीरापर्यंत सुरू होता. त्यामुळे शेतकऱ्यांतून समधान व्यक्त होत आहे.

सोलापूर शहर-जिल्ह्यात सोमवारी पावसाच्या तुरळक सरी पडल्या होत्या. मात्र मंगळवारी सायंकाळी पावसाने दमदार हजेरी लावली. मरगळलेल्या पिकांना जीवदान



**सोलापूर : शहरात मंगळवारी सायंकाळी जोरदार पावसाने हजेरी लावली. सिद्धेश्वर मंदिर परिसरातील छायाचित्र.**

मिळाले. मे महिन्यात तब्बल २३० मिमी पाऊस झाला होता. या पावसावर खरिपाच्या पेरण्याही झाल्या मात्र पुन्हा पाऊसच पडला नसल्याने पिकांनी माना टाकल्या. दरम्यान, आता पावसाने चांगली सुरूवात केल्याने आशा पल्लवित झाल्या आहेत. हवामान खात्याकडून चार दिवस मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. यापुढे चांगला पाऊस अपेक्षित आहे.




## बार्शीत जमीन खरेदीच्या नावाखाली सात लाखांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २२ जुलै-**

बार्शी शहरात जमीन खरेदीच्या नावाखाली सात लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. शिक्षक कॉलनी, कांदलगाव रोड येथील प्लॉटच्या बनावट खरेदीखताद्वारे गृहिणी वनमाला मनोज कोळी (वय ३९,रा. गाडेगाव रोड, शेटे प्लॉट, बार्शी) यांची फसवणूक झाल्याचा आरोप आहे. बार्शी शहर पोलिसांनी या प्रकरणी अमित अशोक ढाळे, केतन प्रकाश धामणेकर, खैसर मौला शेख, सुनिल सुदाम ढगे आणि गंगाबाई किसन वडेकर या पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आहे.

सौ. वनमाला कोळी यांनी दिलेल्या लेखी तक्रारीनुसार, त्यांचे पती मनोज कोळी यांच्या नोकरीवर त्यांचे कुटुंब अवलंबून आहे. गुंतवणुकीसाठी जमीन खरेदीच्या शोधात असताना त्यांनी एजंट संजय जाधव यांच्याशी संपर्क साधला. २०२२ मध्ये मनोज यांचे मित्र हनमंत जमदाडे आणि संजय जाधव यांनी शिक्षक कॉलनी येथील प्लॉट (सीटी सव्हे नं. ४२४/२ब, गट नं. ९४३/१, प्लॉट नं. ५९) विक्रीसाठी असल्याचे सांगितले. हा प्लॉट सुनिल सुदाम ढगे यांच्या मालकीचा असून, कोविडमुळे आर्थिक अडचणींमुळे ते तो विकत असल्याचे भासवले गेले. ढगे यांनी प्लॉटचा मालकी हक्क स्पष्ट असल्याचे खोटे सांगून विश्वास संपादन केला.




मार्च २०२२ मध्ये सात लाख रुपयांना हा व्यवहार ठरला. ८ मार्च २०२२ रोजी मनोज कोळी यांनी १५,०००/- रुपये रोख आणि स्टेट बँक ऑफ इंडियाच्या परांडा शाखेच्या खाते क्रमांक ११६९७ च्या चेकद्वारे (क्र. १७१०५९) १ लाख ६५ हजार रुपये शडव्हान्स दिले. उर्वरित ५ लाख २० हजार रुपये २१ मार्च २०२२ रोजी नोंदणी कार्यालयात दिले. खरेदीखत नोंदणीनंतर बार्शी तलाठी कार्यालयात सौ. वनमाला यांच्या नावे नोंद झाली आणि सातबारा उताऱ्यावर त्यांचे नाव दिसू लागले.

खरेदीनंतर प्लॉटवर गेले असता, सौ. वनमाला यांचे सासरे भारत नाना कोळी यांनी सांगितले की, हा प्लॉट त्यांचा मुलगा समाधान कोळी आणि सून रंजना कोळी यांनी ९ ऑगस्ट २०२१ रोजी शोभा गंगाधर साडेगावकर यांच्या वारसदारांकडून विकत घेतला आहे. त्यांनी याबाबतचे खरेदीखत दाखवले. सुनिल ढगे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी टाळाटाळ करत तलाठी कार्यालयात चूक झाली असेल असे सांगितले. पैसे परत मागितले असता, त्यांनी काय करायचे ते करा अशी धमकी दिली.

तपासातून कळले की, हा प्लॉट मूळ मालक गंगाबाई वडेकर यांनी ६ मे २००४ रोजी अमित ढाळे यांना कुलमुख्त्यार दिले होते. अमित यांनी २२ ऑक्टोबर २००८ रोजी हा प्लॉट शोभा साडेगावकर यांना विकला. मात्र, त्याच प्लॉटची त्यांनी पुन्हा ४ फेब्रुवारी २०१० रोजी केतन धामणेकर यांना, त्यांनी १ सप्टेंबर २०१० रोजी खैसर शेख यांना आणि खैसर यांनी १६ मार्च २०११ रोजी सुनिल ढगे यांना विक्री केली. या सर्व व्यवहारांच्या तलाठी कार्यालयात नोंदी झाल्या. दुसरीकडे, शोभा साडेगावकर यांच्या वारसदारांनी ९ ऑगस्ट २०२१ रोजी हा प्लॉट समाधान आणि रंजना कोळी यांना विकला. अशा प्रकारे एकाच प्लॉटची दोनवेळा विक्री झाल्याचे स्पष्ट झाले.

१८ जुलै २०२५ रोजी दुपारी ४:०० वाजता बार्शी शहर पोलिसांना लेखी तक्रार मिळाली आणि ५:०७ वाजता ठाणे दैनंदिनी (नोंद क्र. ०३०) मध्ये नोंद झाली. पोलिसांनी बनावट कागदपत्रे, सरकारी दप्तरातील खाडाखोड आणि संगनमताने फसवणूक केल्याप्रकरणी तपास सुरू केला आहे. तक्रारदाराने सर्व कागदपत्रे सादर केली असून, पोलिस या प्रकरणाच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न करत आहेत.

## पोलिस ठाण्यात बाजूने जबाब देत नसल्याने तरुणाला मारहाण

**सोलापूर, दि. २२ जुलै-**

पोलीस ठाण्यात दाखल तक्रारीबाबत बाजूने जबाब देत नसल्याने तिघांनी तरुणाला काठीने तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. ही घटना सोमवारी दुपारी चारच्या सुमारास मोहोळ एसटीस्थानकाच्या पाठीमागे करण्यात आली. यातील जखमी तरुण हा उपचारादरम्यान पळून गेला आहे. प्रभाकर श्रीमंत वाघमोडे (वय २८, रा. नजिक पिंपरी, ता. मोहोळ) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. पिंटू रणदिवे तसेच इतरांवर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल आहे. या तक्रारीत आमच्या बाजूने जबाब दे, म्हणून रणदिवे हा प्रभाकरकडे आग्रह करत होता. परंतु बाजूने जबाब देण्यास नकार दिल्याने चिडलेल्या पिंटू रणदिवे, बसवंत रणदिवे या दोघांनी प्रभाकर यास मोहोळ येथील एसटीस्थानकाच्या पाठीमागे नेऊन तेथे काठीने तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात सर्वांगास मुकामार लागल्याने रात्री १०.३० वाजता तो शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाला.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)